वि चरित्र
२०३

# आजचे लोकनायक

REFBK-0005968

शं. भा. गोंधळेकर

[redacted]

# आजचे लोकनायक

( व्यक्तित्वनिदर्शक स्फुट गोष्टी )

शं. भा. गोंधळेकर, एम्. ए., बी. टी.

आपल्या शाळेचे पंचप्राण; मोठ्या लोकांच्या छोट्या गोष्टी

इत्यादि पुस्तकांचे कर्ते ।

REF BK-0005968

किंमत ८ आणे

प्रकाशक—
शं. भा. गोंधळेकर, एम्.ए., बी.टी.
४३३ नारायण पेठ, पुणें २

आवृत्ति पहिली ( १९४० )

मुद्रक—
स. रा. सरदेसाई, बी.ए., एल्एल्.बी.
नवीन समर्थ विद्यालयाचा ' समर्थ भारत
छापखाना, ४१ बुधवार, पुणें २

# पुरस्कार

रा. गोंधळेकर यांनीं प्रस्तुत पुस्तक विद्यार्थ्यांसाठीं लिहिलें आहे. केवळ टिपणींचीं पुस्तकें प्रसिद्ध करण्यापलीकडे नजर जाणें हें एक सुचिन्हच गणलें पाहिजे. हें पुस्तक काढण्यापूर्वी असलेंच एक दुसरें पुस्तक त्यांनीं प्रसिद्ध केलें होतें. त्याची मान्यता बरी झाली. यावरून अशा पुस्तकांची भूक विद्यार्थ्यांस आहे यांत संशय नाहीं.

आपल्या देशांत शिक्षणाचा म्हणजे साक्षरतेचा प्रसार झपाट्यानें वाढत आहे, तरी अद्यापि येथली शेंकडा नव्वद हिस्से प्रजा कांहीं साक्षर झालेली नाहीं. साक्षर झाला म्हणजेच कोणी सभ्य व सुविद्य बनतो असें जरी नाहीं, तरी साक्षर होणें म्हणजे ज्ञानभांडाराची किल्ली हस्तगत करणेंच होय.

साक्षरतेनें विद्येची क्षुधा तीव्र होते. क्षुधा तीव्र झाली कीं, तिचें शमन करण्यासाठीं खाद्यांचा भरपूर पुरवठा केला पाहिजे. विद्येची भूक शमवा-वयाची तर पुस्तकांची 'अन्नपूर्णा' सदासिद्ध पाहिजे. त्यांतून बाळभूक मोठी कठिण असते. वेळींच पुरवली तरच त्या बाळांचा पिंड नीट भरेल. अर्थात् जनतेस साक्षर करण्याच्या उद्योगाबरोबरच जनतेसाठीं पुस्तकें लिहून तयार केलीं पाहिजेत.

खाद्यांच्या जशा पुष्कळ परी आहेत तशाच पुस्तकांच्या आहेत. तेथें 'षड्रसांचें राज्य' आहे तर येथें 'नवरसांचें साम्राज्य' आहे !! काय खावें, प्यावें, किती खावें, प्यावें आणि तें कोणीं याचाहि विवेक केला पाहिजे. प्रकृतिमान, वयोमान यांचाहि विचार त्यांत करावा लागतो. बाजारांत सर्व कांहीं असतें, पण म्हणून कांहीं सर्वांना सर्व चालेल असें थोडेंच म्हणतां येईल ! हाच न्याय पुस्तकांनाहि लागू पडतो. 'चहा-

चिवडा-चिरूट ' यांचें सेवन कदाचित् तुष्टिदायक वाटलें तरी ते पुष्टिदायक खचित नव्हे. तसेंच बासुंदीपुरी हें रोजचें जेवण नव्हे. केवळ मोठमोठ्या गहन किंवा गोड ग्रंथांचेंच सतत सेवन वेदाभ्यास-जडत्व उत्पन्न करील. उंसाचा रसच पिऊन, पाण्याशिवाय राहणें साधेल काय ? तात्पर्य, बौद्धिक आरोग्याची काळजी, शारीरिक आरोग्याच्या काळजीइतकीच महत्त्वाची असल्यानें आणि बौद्धिक आरोग्य ग्रंथसेवनानें साध्य होणार असल्यानें येथें ' युक्ताहारविहार ' करून ' युक्तचेष्ट 'च राहणें आपणांस भाग आहे. यालाच वाटलें तर **बौद्धिक आयुर्वेद** म्हणा आणि या बौद्धिक आयुर्वेदाचें अनुसरणच व्यक्तीच्या आणि समाजाच्या कल्याणास कारणीभूत होईल.

नित्याच्या आयुर्वेदांत जसा बालरोग-आरोग्य विचार येतो तसलाच एक अध्याय बौद्धिक आयुर्वेदांतहि समाविष्ट असणारच. या बौद्धिक बाला-युर्वेदांत चरित्रवाचन हें सदा समुन्नतिकारक गणलेलें आहे. अर्थात् रा. गोंधळेकरांसारखे चरित्र-ग्रंथ-लेखक यांची कामगिरी केव्हांहि उपयुक्त गणिली पाहिजे.

चरित्रें कोणाचीं लिहावीं, कोणीं लिहावीं, मोठें कोणांस म्हणावें, मोठे हे मोठे कशानें होतात, इत्यादि प्रश्नांचीं उत्तरें चरित्रवाचनानेंच कळून येतात. आपण थोर, कीर्तिशाली व्हावें, ही आकांक्षा लहानपणापासून मुलांमुलींच्या ठायीं आरोपित करून ती वाढीस लावणें हें त्यांच्या हितेच्छूंचें अवश्य कर्तव्य होय. थोर आणि मोठे प्राचीन काळींच होऊन गेले, आज-काळीं तसे थोर आढळावयाचे नाहींत, असा विपरीत ग्रह होऊं द्यावयाचा नसेल तर प्राचीन काळच्या विख्यात पुरुषांच्याप्रमाणें आजकाळच्या विख्यात स्त्रीपुरुषांचीं चरित्रें मुलांस वाचावयास मिळालीं पाहिजेत.

रा. गोंधळेकरांच्या प्रस्तुत पुस्तकांत विद्यमान जगांतील आठ प्रसिद्ध पुरुषांचीं चरित्रें दिलेलीं आहेत. यांतील चार भारतीयांचीं आणि चार अभारतीयांचीं अशी निम्मेनिम वांटणी केलेली आहे. आतां जगांत कांहीं

एवढे आठच पुरुषपुंगव आहेत असें नाहीं. निवड करतांना कांहींएक दृष्टि मनासमोर ठेवून त्या मर्यादेनेंच ती करावी लागते. असें दिसतें कीं, ज्यांचीं नांवें वर्तमानपत्रांतून आजकाल फार गाजत आहेत, राजकीय घडामोडी करण्याचें कार्य ज्यांनीं हातीं घेतलें आहे, आणि ज्यांच्या जीवनांत कांहीं धाडस, वीरवृत्ति किंवा सहज मनांत भरणारी अद्भुतता आहे, अशा आठांची निवड रा. गोंधळेकरांनीं केली आहे. मानवी मोठेपणा कांहीं राजकीय घडामोडींतच सामावलेला नाहीं. इतर अनेक कदाचित् अधिक चिरस्थायी, शुभंकर आणि महनीय कार्यक्षेत्रें अशीं आहेत कीं ज्यांतील धुरंधर कर्मवीर मानवी कल्याणांचे प्रणेते म्हणून कितीतरी पटीनें श्रेष्ठ ठरतील ! हवेंतील वायुतरंगांच्या साहाय्यानें 'नभोवाणिश्रवण' करविण्याची अद्भुत योजना ज्यानें सत्यसृष्टींत उतरविली किंवा दंशकजनित हिंवतापावर ज्यानें उतारा शोधून काढला अशांचा मानवी समाजावरील उपकार अधिक चिरंतन कीं हिटलर–मुसोलिनी आणि बोस–जवाहरांचा ? भगवद्गीतेचा संदेश सांगणारा श्रीकृष्ण, संस्कृत भाषेला व्याकरणाच्या सूत्रांत अडकविणारा पाणिनि आणि सर्व जगाला उच्छिष्ट करणारा व्यास यांच्या मोठेपणाच्या तुकाला किती मोठे तोलतील ? मोठेपणाच्या वजनामापांचें कोष्टक घालतां येत नाहीं, तरी मोठे म्हटलेल्यांच्या चरित्र-वाचनानें आणि मोठ्यांच्या सहवासानेंच तें कोष्टक उमजूं लागतें आणि मोठेपणाचा रस्ता दिसूं लागतो. चरित्रांचा हा उपयोग लहान म्हणावा काय ?

मोठ्यांचीं चरित्रें वास्तविक मोठ्यांनींच लिहावीं. भरतभूमीला 'मानदंड' म्हणून हिमालयच शोभतो. पण हें उमगायला देखील कालिदासी प्रतिभा लागते ! ! प्राकृतांची पांड-काठी कितीशी कामीं येणार ?

**" स्तवार्थ तुझिया तुझ्यासम कवी कधीं जन्मती ? "**

असा प्रश्न मोरोपंतांना पडला ! मोठे पुरुष हे, समर्थांच्या भाषेंत बोलावयाचें तर, 'ईश्वराचें देणें' होत ! तशांचीं तसलीं दिव्य चरित्रें लिहिणारेहि

'देण्या'च्याच कोटींतले ! ते होतील तेव्हां होवोत ! गरुडभरारी मारतां आली नाहीं म्हणून कांहीं चिमण्यादि पक्ष्यांनीं आकाशाचें 'शक्त्यनुसार' आक्रमण करूं नये काय ?

रा. गोंधळेकर यांचा हा 'चिमणा' प्रयत्न आहे. तो आपल्या स्वरूपाप्रमाणें आपलें कार्य करील. प्रथम थोडासा जीवन-वृत्तांत आणि नंतर चरित्र-विषयाच्या चरित्रांतील कांहीं ठळक विशेषांचें व प्रसंगांचें सांकळबंद पद्धतीनें निवेदन, अशी पद्धति रा. गोंधळेकरांनीं अंगिकारली आहे. यामुळें चरित्राची रूपरेखाहि समजते, मनोरंजक व ठळक प्रसंगहि ध्यानांत येतात आणि मोठ्या चरित्राचा संक्षेपहि साधतो. भाषाहि सोपी आणि साधारण वाचकांस कळेल अशी रा. गोंधळेकरांनीं लिहिली आहे. यामुळें हीं चरित्रें कंटाळवाणीं न होतां उद्बोधक आणि मनोरंजक वाटतील; पुढें याच पुरुषांचीं आणि अन्य मोठमोठ्या पुरुषांचीं चरित्रें वाचण्याची आतुरता वाढीस लागेल; त्यांच्या चरित्रांतील मर्म ध्यानांत येऊं लागेल; आणि कांहींतरी विशेष करून समर्थांनीं म्हटलेल्या 'आगांतुक गुणां'ची जोड करून घेण्याचा प्रयत्न करण्याची स्फूर्ति मिळेल. एवढा जरी उपयोग या ग्रंथाचा झाला तरी रा. गोंधळेकरांसच नव्हे तर सर्व समाज-हितचिंतकांस खचित समाधान वाटेल.

फा. शु. ४।६१,<br>पुणें.

दत्तो वामन पोतदार

# अभिप्राय

रा. रा. शं. भा. गोंधळेकर यांनीं आपलें नवें पुस्तक, 'आजचे लोकनायक', 'मोठ्या लोकांच्या छोट्या गोष्टी' या पहिल्या पुस्तकाच्या पद्धतीप्रमाणेंच लिहिलें आहे. हेतु असा दिसतो कीं, लहान लहान, उद्बोधक ऐतिहासिक माहितीचे प्रसंग चुटकेवजा गोष्टींच्या रूपानें मुलांच्या वाचनांत यावेत. हा हेतु चांगलाच सफल झाला आहे. दुय्यम शाळांतील, विशेषें-करून खालच्या इयत्तांतील, मुलांना या पुस्तकांतील गोष्टी फार आवडतील यांत संशय नाहीं. तसेंच साक्षरता-प्रसाराच्या कामींहि या पुस्तकाचा उपयोग केला गेल्यास नव्या विद्यार्थ्यांना चटकदार माहिती व थोडक्यांत आधुनिक मोठ्या माणसांची ओळख करून देतां येईल. आजच्या घाईच्या जीवनांत हीच पद्धति फार उपयुक्त असल्यामुळें पुस्तकाचें चांगलें स्वागत होईल अशी बळकट आशा वाटते.

ता.
४-३-१९४०

विष्णु नारायण कुंभारे
सुपरिंटेंडेंट, न्यू इं. स्कूल, पुणें.

# ज्या लहानमोठ्या पुस्तकांचा उपयोग मला झाला त्यांचा आभारपूर्वक निर्देश

१. महात्मा गांधी—( १ ) ले. श्री. सीताकान्त. ( २ ) मराठींतील रूपांतर–ले. तु. वि. ठाकूर. ( ३ ) श्री. आठल्ये. ( ४ ) पटवर्धनकृत ' आत्मचरित्रा 'चें भाषांतर–आत्मकथा. ( ५ ) 'Pallas' Series.

२. पं. जवाहरलाल नेहरू—( १ ) आत्मचरित्र ( मराठी )–अनुवादक, श्री. गोरे. ( २ ) आपटे गुरुजी. ( ३ ) श्री. रा. गो. भिडे.

३. सुभाषचंद्र बोस—( १ ) रा. प्र. कानिटकर. (२) रा. गो. भिडे.

४. बॅ. सावरकर—( १ ) चरित्र–प्रकाशक, महाराष्ट्र प्रकाशन संस्था. ( २ ) चरित्र–प्रकाशक, Messrs. B. G. Paul and Co., Madras. ( ३ ) स. रा. रानडे.

५. डी व्हॅलेरा—( १ ) प्रा. ना. सी. फडके. ( २ ) 'Pallas' Series.

६. हिटलर—( १ ) ' आशावादी '. ( २ ) 'Pallas' Series.

७. मुसोलिनी—( १ ) मुसोलिनी व फॅशिस्मो–ले. द. वि. ताम्हनकर. ( २ ) 'Pallas' Series. (३) रा. प्र. कानिटकर.

८. स्टॅलिन—'Pallas' Series.

# आरंभींचे दोन शब्द

सध्यां लहान मुलांच्या देखील तोंडीं गांधी, सावरकर, हिटलर, मुसोलिनी इत्यादि लोकांचीं नांवें वारंवार येतात; आणि त्यांच्यासंबंधीं अधिक माहिती मिळण्याची उत्सुकता त्यांच्या ठिकाणीं उत्पन्न होते. ही जिज्ञासा तृप्त करण्याच्या हेतूनें या पुस्तकाची योजना केली आहे. मोठे चरित्र-ग्रंथ त्यांच्या आवांक्याबाहेर असल्यानें या पुस्तकांतील धोरण **मोठ्या लोकांच्या छोट्या गोष्टी** या पुस्तकांतल्याप्रमाणेंच ठेविलें आहे. हें पुस्तक लिहितांना ज्या चरित्र-ग्रंथांचा मला उपयोग झाला त्या सर्व चरित्रलेखकांचा मी फार ऋणी आहें.

या पुस्तकाला सवड काढून ‘ पुरस्कार ’ लिहून दिल्याबद्दल प्राध्यापक द. वा. पोतदार यांचे मी मन:पूर्वक आभार मानतों. प्रा. वि. ना. कुंभारे, सुपरिन्टेन्डेन्ट, न्यू इंग्लिश स्कूल, पुणें, यांनीं हें पुस्तक प्रसिद्ध करण्यास मला उत्तेजन देऊन तें समग्र चाळून आपला अभिप्राय लिहिला व अनेक उपयुक्त सूचना केल्या याबद्दल त्यांचा मी फार ऋणी आहें. तसेंच हें पुस्तक तयार करण्याच्या कामीं माझे मित्र श्री. व. गो. दाते, श्री. रा. र. भिडे, श्री. अ. ह. लिमये व श्री. शा. तु. देशपांडे यांच्या हरतऱ्हेच्या मदतीबद्दल त्यांचा कृतज्ञतापूर्वक उल्लेख करणें माझें कर्तव्यच आहे. शेवटीं समर्थ भारतचे चालक श्री. स. रा. सरदेसाई यांनीं छपाईचें काम सुबक करून दिल्याबद्दल त्यांचे आभार मानून ‘ दोन शब्द ’ पुरे करतों.

शं. आ. पेंढारकर

# अनुक्रमणिका


पुरस्कार .... .... .... .... ३– ६
अभिप्राय .... .... .... .... ७
आरंभींचे दोन शब्द .... .... .... ९

१. महात्मा गांधी .... .... .... १–१८
२. पंडित जवाहरलाल नेहरू .... ....१९–२८
३. देशगौरव सुभाषचंद्र बोस .... ....२९–४०
४. स्वातंत्र्यवीर बॅ. सावरकर .... ....४१–५१
५. इमॉन डी व्हॅलेरा .... .... ....५२–६२
६. ॲडॉल्फ हिटलर .... .... ....६३–७४
७. बेनिटो मुसोलिनी .... .... ....७५–८६
८. जोसेफ स्टॅलिन .... .... ....८७–९६



माझ्या परमपूज्य व प्रेमळ आईस
आदरपूर्वक अर्पण.

# आजचे लोकनायक

## १. महात्मा गांधी

[ त्रोटक जीवन-वृत्तान्त:—मोहनदास करमचंद गांधी यांचा जन्म ता. २ ऑक्टोबर, १८६९ रोजीं पोरबंदर येथें झाला. यांचे वडील प्रथम पोरबंदर व नंतर राजकोटच्या दिवाण-पदावर होते. मोहनदास यांचें प्राथमिक शिक्षण राजकोटच्या गांवठी शाळेंत झालें. हायस्कुलांतील शिक्षण चालू असतांच त्यांचा विवाह झाला. १८८७ सालीं मॅट्रिक परीक्षा उतरल्यावर उच्च शिक्षणाकरितां इंग्लंडला जाण्याचा बेत ठरविण्यांत आला. इंग्लंडला जातांना आईला मांस, दारू इत्यादि गोष्टींपासून अलिप्त राहण्याबद्दल दिलेल्या वचनांची पूर्तता हातून कितपत होते याबद्दल त्यांना थोडी चिंता वाटत असे. पण निग्रही



स्वभावामुळें त्यांना मोह दूर लोटतां आला आणि आत्मवंचना टाळतां आली. त्यांच्या भिडस्त स्वभावामुळें त्यांना अनेक अडचणी सोसाव्या लागल्या, पण त्या त्यांनीं आनंदानें सोसल्या. इंग्लंडमध्यें असतांना ते पूर्ण शाकाहारी राहिले. सर्व गोष्टींत साधेपण आणण्याचा ते आटोकाट प्रयत्न करीत. तरीपण कांहीं काळ मोहानें त्यांना पछाडलेंच ! सुशिक्षित, सभ्य व प्रतिष्ठित इंग्रज लोकांत मान नें मिरवितां यावें म्हणून उंची उंची कपडे यांनीं स्वतःकरितां शिवले; शिवाय नृत्यकलाहि अवगत करण्याचा प्रयत्न

त्यांनीं थोडाफार केला. पण त्यांची चूक त्यांच्या लक्षांत येऊन त्यांनीं हे सर्व वेडेचार बंद करून अभ्यासाकडे विशेष लक्ष पुरवण्याचें ठरविलें. शेवटीं १८९१ मध्यें ते बॅरिस्टर झाले.

अशा रीतीनें सुमारें तीन वर्षें इंग्लंडमध्यें राहून मोहनदास स्वदेशी परत आले. पण वकिली कितपत चालेल याबद्दल ते सदैव सचिंत असत! शेवटीं दक्षिण आफ्रिकेंत एक कज्जा चालविण्यासाठीं म्हणून जाण्याची त्यांनीं तयारी केली. आफ्रिकेंत आल्यावर तेथील हिंदी लोकांचे चाललेले हाल पाहून त्यांचें मन द्रवलें; व तेथील लोकांना योग्य मार्ग दाखवून देण्याची व जरूर पडल्यास लढा लढण्याचीहि जबाबदारी त्यांनीं पत्करिली, त्यामुळें कज्जा सामोपचारानें मिटल्यानंतरहि त्यांना आफ्रिकेंत वास्तव्य करावें लागलें. अन्यायाचें उच्चाटण झालेंच पाहिजे, म्हणून गांधींनीं स्वतःचे प्राणहि पणास लावण्यास कमी केलें नाहीं! परमेश्वरावर पूर्ण विश्वासून त्यांनीं लोकजागृतीचें कार्य अत्यंत निर्भयपणें, कळकळीनें व निःस्वार्थ बुद्धीनें केलें. अहंभाव तर त्यांच्या ठिकाणीं कधींच दिसून आला नाहीं! अशा रीतीनें केलेलें कार्य निष्फळ कसें ठरेल? तेथून हिंदुस्थानांत येऊन येथील पुढाऱ्यांचा सल्ला व सहानुभूति मिळवून परत ते सहकुटुंब आफ्रिकेंत गेले. तेथील सर्व कार्य उरकल्यावर १९१५ त त्यांनीं हिंदुस्थानांत येऊन अमदावाद येथें 'सत्याग्रहाश्रमा'ची स्थापना केली.

'सत्याग्रहा'च्या शस्त्रावर पूर्ण विसंबून १९२० सालीं सरकारशीं असहकाराचें धोरण स्वीकारलें. १९२१ सालीं त्यांना कॉंग्रेसनें 'सर्वाधिकारी' (Dictator) नेमलें. प्रयोगादाखल बार्डोली तालुक्यांत कर न देतां स्वराज्या-साठीं सत्याग्रहाची मोहीम त्यांनीं जोरानें सुरू केली. याचा परिणाम असा झाला कीं, सरकारनें त्यांना सहा वर्षांची शिक्षा ठोठावून येरवड्यांत त्यांची रवानगी केली! पण त्यांची प्रकृति बिघडल्यामुळें सरकारनें त्यांना मुदत भरण्यापूर्वींच मुक्त केलें. पुढें म्हणजे १९३० सालीं सार्वत्रिक कायदेभंगास त्यांनी सुरुवात केली. या मोहिमेंत त्यांना पुन्हां एकदां अटक झाली. पण इंग्लंडमधील 'राउंड टेबल' परिषदेंत कॉंग्रेसनेंहि भाग घ्यावा म्हणून गांधींची मुक्तता करण्यांत आली; आणि महात्मा गांधी इतर अनुयायां-

बरोबर इंग्लंडला गेले. पण वाटाघाटी निर्णायक स्वरूपाच्या न होतां अनेक विषयांवर नुसती चर्चाच होऊन महात्मा गांधी स्वदेशीं परतले.

आपला देश गरीब, तेव्हां आपली राहणीहि तशीच असली पाहिजे, या तत्त्वाचा पुरस्कार सर्व देशभर त्यांनीं केला व लोकमान्यांच्या पश्चात् खेडोपाडींहि स्वातंत्र्याच्या लढ्याची लाट पोहोंचविण्याचें महत्कार्य त्यांनीं केलें ! खादीचा प्रसार, साक्षरताप्रसाराची मोहीम, उद्योगप्रधान व स्वावलंबी शिक्षण, सत्याग्रह, कायदेभंग इ. स्वराज्यप्राप्तीकरितां चाललेल्या चळवळींचें जनकत्व महात्मा गांधींकडेच येतें. ]

---

इंग्लिश पहिल्या इयत्तेच्या परीक्षेचे वेळीं त्या वेळचे इन्स्पेक्टर जाइल्ससाहेब यांनीं मुलांना पांच शब्द लिहिण्यास सांगितलें. त्यांत 'Kettle' हा शब्द होता. पण त्या शब्दाची वर्णरचना (Spelling) गांधींना लिहितां आली नाहीं. शिक्षक मधून हिंडत होते. त्यांनीं गांधींचा चुकीचा शब्द पाहून तो बरोबर करण्याबद्दल बुटाचे टोंकानें त्यांना सुचविलें. पण दुसऱ्याचा शब्द पाहून स्वतःचा दुरुस्त करण्याबद्दल शिक्षक सुचवितील, असें गांधींच्या मनांत देखील आलें नाहीं ! गांधींखेरीज सर्व मुलांचे सर्व शब्द बरोबर ! गांधी 'मूर्ख' ठरला ! ! सरळ मनाच्या विद्यार्थ्याला वाममार्ग कसा कळावा आणि रुचावा ?

* * *

संस्कृत ही भाषा गांधींना सहाव्या इयत्तेंत विशेष अवघड वाटली, म्हणून ते फारसी भाषा कशी काय आहे हें बघण्याकरितां संस्कृत वर्गांत न बसतां फारसीच्या वर्गांत जाऊन बसले. तास संपल्यावर संस्कृत शिक्षकांनीं त्यांना बोलावून विचारलें, "अरे, तूं कोणाचा मुलगा? तुझ्या धर्माची भाषा तू शिकणार नाहींस?...." गांधी अर्थात् मनांत ओशाळले व केलेल्या वर्तनाबद्दल त्यांची त्यांनाच

शरम वाटली ! व प्रेमळ शिक्षकानें केलेल्या सूचनेचा अव्हेर गांधींना करवला नाहीं. संस्कृत जास्त शिकले नाहींत म्हणून गांधींना अजूनहि कित्येक वेळां पश्चात्ताप होतो.

* * *

मांसाहाराचा प्रभाव गांधींच्या शाळेंतील मित्रानें त्यांना पटवला होता व गांधींना पटलाहि होता. पण मांसभक्षण हें पाप आहे, शिवाय ही गोष्ट आईवडिलांना रुचणार नाहीं, इतकेंच नव्हे, तर त्यांना ही गोष्ट कळली तर त्यांचें प्राणोत्क्रमणहि होईल, अशी भीति वाटत होती. तरीपण हें पाप त्यांचे हातून घडलेंच ! कांहीं दिवस लोटल्यावर गांधींना अशा या चोरट्या वागणुकीचा वीट आला आणि आईवडिलांना फसविणें ही गोष्ट त्यांना विशेष जाचूं लागली, म्हणून त्या वेळीं त्यांना मांसाहाराचें महत्त्व पटलें होतें तरी केवळ मातापित्यांच्या समाधानाकरितां त्यांनीं मांसाहार सोडला !

* * *

गांधींचें त्यांच्या आईवडिलांवर अलोट प्रेम होतें. त्यांची अहर्निश सेवा व्हावी याविषयीं ते विशेष आतुर असत. लहानपणीं त्यांनीं, श्रावण आपल्या आईबापांना कावडींत बसवून त्यांना यात्रा घडवीत आहे, अशाबद्दलचें चित्र पाहिलें; तेव्हां सहजस्फूर्तीनें त्यांच्या तोंडून 'मला पण श्रावणासारखें व्हावयाचें आहे' असे उद्गार बाहेर पडले. वडिलांची सेवा घडावी म्हणून शाळेंतून त्यांनीं व्यायामाच्या तासाची मोकळीक मोठ्या प्रयत्नानें मिळविली, आणि हा सर्व वेळ पितृसेवेंतच ते घालवीत !

* * *

लहानपणापासूनच सत्यवचनाच्या बाबतींत त्यांचा विशेष कटाक्ष असे. असत्याचरण जर चुकून झालेंच तर त्यांना रडूं कोसळे ! पापक्षालन

झाल्याशिवाय त्यांना कधींच चैन पडत नसे. एकदां त्यांनीं आपल्या इतर दुर्वर्तनी मित्रांच्या सहवासानें सोन्याचा दागिना चोरून विकला. ही चोरी केवळ अन्य कारणानें झालेल्या कर्जाची फेड करण्याकरितां त्यांना करावी लागली. कर्ज फिटलें; पण मन मारून रोजचा व्यवहार करीत राहणें ही गोष्ट त्यांना अगदीं असह्य झाली. वडिलांपाशीं तोंडानें गुन्हा कबूल करण्याचें धैर्य तर होईना. शेवटीं एका चिठ्ठीवर सर्व वृत्तान्त लिहून इतःपर अशा तऱ्हेचा गुन्हा न करण्याची प्रतिज्ञाहि कळविलेली होती. ही चिठ्ठी स्वतःच त्यांनीं वडिलांच्याजवळ दिली; त्यांनीं ती वाचली व त्यांच्या डोळ्यांतून अश्रू गळाले ! गांधींनाहि खरा पश्चात्ताप झाला होता; तेहि गहिंवरून आले. अशा रीतीनें त्यांनीं पापाचें क्षालन केलें.

* * *

वडील दिवाण असल्यानें त्यांचेकडे नानाधर्मीय लोक येत व त्यांचेबरोबर वादविवाद चाले. गांधी हे पितृसेवेंत नेहमीं गुंतलेले असल्यानें असल्या मैफलींचा त्यांच्या मनावर विशेष परिणाम झाला. हिंदुधर्मांतर्गत अनेक सांप्रदाय व मुसलमानी व इतर धर्म यांविषयीं त्यांच्या मनांत समभाव उत्पन्न झाला. कोणत्याहि धर्माविषयीं बोलतांना ते नेहमीं आदरानें बोलत. ख्रिस्ती धर्म मात्र याला अपवाद होता !

* * *

सत्यामध्यें सर्व नीतींचा अंतर्भाव होतो, ही शिकवणूक त्यांच्या मनांत विशेष रुजली. नीतिविषयक पुढील श्लोक त्यांच्या मनांत नेहमीं घोळे :

पाणी आपने पाय, भलुं भोजन तो दीजे;
आवी नमावे शीश, दंडवत कोडे कीजे............
गुण केडे तो गुण दशगणो, मन वाचा कर्मे करी,
अवगुण केडे जे गुण करे, ते जगमां जीत्यो सही.

अपकाराची फेड अपकारानें न करितां उपकारानेंच करावी— हें अमोलिक वचन त्यांचें एक जीवनसूत्रच बनलें !

* * *

विलायतेला जाण्यापूर्वी आपल्या प्रेमळ मातेला मांस, मद्य व परस्त्री या गोष्टींपासून अलिप्त राहण्याचें त्यांनीं वचन दिलें होतें. हें वचन त्यांनीं आईची प्रेमळ मूर्ति वरचेवर आठवून शेवटपर्यंत पाळलें !

* * *

गांधींचा लाजाळू व भिडस्त स्वभाव फार. भोजनास बसले असतांना अधिक मागितल्यास चुकतें कीं काय या भीतीनें ते अर्धपोटींहि राहत ! लिहून आणलेलें भाषण देखील स्वतः वाचून दाखविण्याचें धैर्य त्यांना नसे ! अध्यक्षांनीं तें दुसऱ्या कोणाकडून तरी वाचून घ्यावें !

* * *

इंग्लंडमध्यें विद्यार्थी विवाहित असला तरी त्याला आपण विवाहित आहोंत असें सांगण्याची लाज वाटते. याचें मुख्य कारण असें कीं, ज्या कुटुंबांत तो राहत असेल त्या कुटुंबांतील तरुण मुलीं-बरोबर हिंडण्या-फिरण्याला व गप्पागोष्टी करण्याला मोकळीक मिळत नाहीं. अर्थात् या वागणुकींत अनीतिकारक कांहींच नसल्यानें, अशी सवलत घेण्यांत वावगें कांहीं नाहीं, या समजुतीनें कित्येक हिंदी विद्यार्थी खोटें बोलतात. गांधी याला अपवाद नव्हते ! पण प्रकरण भलत्याच थराला जाण्याचा संभव दिसतांच गांधींनीं असत्य' भाषण केल्याचें मनांतील शल्य मोठ्या धैर्यानें काढून टाकलें.

* * *

बॅरिस्टरची परीक्षा झाली तरी कोर्टांत काम कितपत वठेल याविषयीं ते नेहमीं चिंतातुर असत. प्रथमच जेव्हां त्यांनीं कोर्टांत पाऊल टाकलें त्या वेळीं त्यांना, ते प्रतिवादीतर्फे असल्यानें उलट-

तपासणी करावयाची होती. ते उभे राहिले खरे, पण त्यांचे पाय लटपटूं लागले, डोकें फिरूं लागलें. तयारी केली होती तरी प्रश्न काय विचारावयाचे हें सुचेना ! अखेरीस पक्षकाराचे पैसे परत करून त्यांनीं घर गांठलें ! इतका त्यांचा भिडस्त, संकोची व लाजाळू स्वभाव !

* * *

१८९३ सालीं म्हणजे वयाच्या केवळ २४ वे वर्षी आपल्या नशिबाची परीक्षा पाहण्याकरितां एका कज्जाच्या निमित्तानें गांधी आफ्रिकेंत गेले.

* * *

आफ्रिकेंत जे गरीब लोक कांहीं करार करून मोलमजुरीकरितां जात, त्यांना इंग्रज लोक ‘ कूली ’ या नांवानें संबोधीत. पुढें पुढें ‘ कूली ’ या शब्दाचा ‘मजूर’ हा अर्थ नाहींसा होऊन कोणत्याहि हिंदी माणसाला ही संज्ञा इंग्रज लोक लावीत. अर्थात् गांधींना ‘ कूली बॅरिस्टर ’ असें नामाभिधान मिळालें !

* * *

प्रथम त्यांना ‘काळा अदमी’ म्हणून वकिलीची सदनच मिळेना. अखेर सुप्रीम कोर्टाच्या शिफारशीनें ती मिळाली. सनद मिळाल्यावर ते इंग्रजी पद्धतीप्रमाणें सर्व पोषाख करून व डोक्यावर टोपी मात्र गुजराथी पद्धतीची चढवून कोर्टांत गेले. कोर्टांत गेल्यावर “ आधीं ती टोपी काढा व मग काय तें बोला ! ” अशी सलामी मिळाली ! गांधींनीं हा हिंदी पेहरावाचा अपमान समजून टोपी काढण्याचें साफ नाकारलें व ते घरीं निघून गेले ! पुढें कोर्टानेंच हा टोपीवरील बहिष्कार काढून घेतला !

* * *

आफ्रिकेंत इंग्रज लोक हिंदी माणसांना तुच्छतेनें वागवीत. गांधींच्या जवळ पहिल्या वर्गाचें तिकीट होतें, तरी त्यांचें सामान पहिल्या वर्गाच्या डब्यांतून काढून टाकून त्यांनाहि धक्के मारून उतरविलें ! मुख्य कारण असें कीं, गौरकाय इंग्लिश मनुष्याला कृष्णवर्णाच्या हिंदी मनुष्याच्या नजीक बसणें अपमानास्पद वाटे ! गांधींनीं सबंध रात्र स्टेशनवरील विश्रांतीच्या खोलींत थंडीनें कुडकुडत काढली.

* * *

आफ्रिकेंत हबशी लोकांना पायवाटेवरून (Foot-path) चालण्याची मनाई असे. गांधी एकदां अशाच पायवाटेवरू जात असतां एका शिपायानें सूचना न देतां यःकश्चित् काळा अदमी समजून त्यांना धक्का देऊन लाथ मारली ! त्या शिपायावर खटला भरण्याची सुसंधि एका इंग्लिश अधिकाऱ्याच्या साक्षीनें आली असतांनाहि गांधींनीं ती नाकारली ! शिपायानें माफी मागितली; गांधींनीं ती देऊन टाकली.

* * *

एका ख्रिस्ती धर्मगुरूनें गांधींच्या गळ्यांत वैष्णवाची कंठी पाहिली. असली कंठी सुशिक्षित माणसाच्या गळ्यांत शोभत नाहीं, म्हणून ती तोडून टाकण्याची सूचना केली. पण गांधींनीं उत्तर दिलें, " ही कंठी तुटतां कामा नये, मातुःश्रींची भेट आहे. ही नसली तर कांहीं अनिष्ट घडेल असें मला वाटत नाहीं; पण मातुःश्रींनीं प्रेमपूर्वक बांधलेल्या कंठीचा त्याग विनाकारण होणार नाहीं...."

* * *

आफ्रिकेंतील हिंदी लोकांची दैन्यावस्था पाहून गांधींना अतिशय दुःख झालें. हिंदी लोक—ब्रिटिश प्रजाजन—तुच्छतेनें वागविले जावेत

ही गोष्ट त्यांना सहन झाली नाहीं. यांत हिंदुस्थानचा अपमान आहे, केवळ मूलभूत नागरिकत्वाचे हक्क हिंदी लोकांना मिळूं नयेत ही शरमेची गोष्ट आहे, हें अपमानाचें शल्य गांधींना आफ्रिकेंत पाऊल ठेवल्यापासून जाचत होतें. हें शल्य काढून टाकण्याकरितां हिंदी लोकांची संघटना पाहिजे, म्हणून स्थानिक प्रतिष्ठित लोकांच्या विचारानें गांधींनीं एक सभा भरविली व त्यांच्यापुढें हिंदी लोकांच्या परिस्थितीचें भेसूर चित्र रेखाटलें. या वेळीं केलेलें गांधींचें हेंच सार्वजनिक कार्यांतील **पहिलें परिणामकारक असें भाषण !**

* * *

गांधींनीं सार्वजनिक कार्य करणें सुलभ जावें म्हणून 'नाताळ–इंडियन–कॉंग्रेस 'ची स्थापना केली व या सार्वजनिक संस्थेमार्फतच लोकजागृतीचें कार्य, संघटनेचें कार्य व प्रतिकाराचें कार्य जोमानें सुरू केलें.

* * *

आफ्रिकेंत कांहीं मुदतीच्या करारानें जे कामकरी जात त्यांनीं दरसाल २५ पौंड कर देण्याबद्दल कायदा नाताळ-सरकार करूं पाहत होतें. या कायद्याचा मसुदा वाचून गांधी तर अगदीं दिङ्मूढ होऊन गेले. याचा प्रतिकार करण्याकरितां म्हणून त्यांनीं कॉंग्रेस बोलाविली व तिच्यापुढें तो मसुदा विचाराकरितां ठेविला आणि या बाबतींत चळवळ करण्याचें निश्चित केलें. शेवटीं पंचवीस पौंडांची मजल तीन पौंडांपर्यंत आली !

* * *

समाजांतील खालच्या थराचीहि सेवा करावयाची असल्यास त्या लोकांची भाषा अवगत पाहिजे, म्हणून गांधींनीं तामीळ भाषेचा अभ्यास द. आफ्रिकेंतील तुरुंगांत व उर्दूचा येरवड्याच्या तुरुंगांत

केला. अशा तऱ्हेचा अभ्यास करण्याला लागणारी फुरसत तुरुंगाबाहेर त्यांना क्वचितच मिळे !

*　　*　　*

गांधी राजनिष्ठा हें एक ऋण मानीत. किंबहुना ते राजनिष्ठेच्या बाबतींत इंग्रजांनाहि मागें सारीत ! ' गॉड सेव्ह दि किंग.... ' हें इंग्रजांचें राष्ट्रगीत गांधी स्वतः म्हणत, इतकेंच नव्हे तर हें गाणें त्यांनीं आपल्या मुलांनाहि शिकविलें होतें. पण राजनिष्ठेचा व्यापार करण्याचें त्यांनीं कधींच मनांत आणलें नाहीं. त्या राष्ट्रगीतावरील प्रेम अर्थात् काळानुरूप कमी कमी होत गेलें.

*　　*　　*

गांधींना शुश्रूषा करण्याची विशेष हौस होती. रुग्णालयांत दररोज नियमितपणें जाऊन ते काम करीत व दुःखी हिंदी लोकांची मनःस्थिति समजावून घेत. आपल्या पत्नीच्या बाळंतपणांत त्यांनीं सुइणीचें काम स्वतः केलें. युद्धाच्या वेळीं त्यांनीं अनेक शुश्रूषा-पथकें उभारून जखमी सैनिकांची उत्तम तऱ्हेनें शुश्रूषा केली.

*　　*　　*

गांधींना आफ्रिकेंतील लोकांच्या चळवळीला पाठिंबा मिळविण्याकरितां हिंदुस्थानांतील पुढाऱ्यांचीहि सहानुभूति मिळवावयाची होती. पुण्यांत येऊन ते प्रथम लो. टिळकांना भेटले. टिळकांनीं अर्थात् सहानुभूति तर दर्शविलीच; शिवाय असेंहि त्यांनीं सांगितलें कीं, " मजकडे संकोच न मानतां केव्हांहि येत जा." हीच गांधी व टिळक यांची पहिली भेट.

*　　*　　*

ज्या कार्याकरितां गांधी टिळकांना भेटले त्या कार्याकरितां त्यांना ना. गोखल्यांना भेटावें लागलें. ना. गोखल्यांनीं गांधींना पूण मदतीचें आश्वासन दिलें. ना. गोखल्यांची व त्यांची ही पहिलीच

भेट, व ती जुने मित्र अनेक वर्षांनीं भेटावे त्याप्रमाणें झाली ! गांधी ना. गोखल्यांनाच राजकारणांतील गुरु मानीत; याचें मुख्य कारण गोखल्यांचा गोड व सिधा स्वभाव आणि सात्त्विक वृत्ति हेंच असावें.

*　　　　*　　　　*

पुढील अवतरण विशेष मौजेचें वाटेल—

“ सर फिरोजशहा तर मला हिमालयासारखे वाटले; लोकमान्य सागरासारखे वाटले; गोखले गंगेसारखे वाटले. तिच्यांत मला स्नान करतां येण्यासारखें होतें. हिमालय चढून जाणें अशक्य; समुद्रांत बुडण्याची धास्ती असते. पण गंगेच्या मांडीवर खुशाल क्रीडा करावी... ”

*　　　　*　　　　*

हिंदुस्थानांतील पुढाऱ्यांची सहानुभूति मिळवून गांधी परत आफ्रिकेला गेले. पण आफ्रिकेंतील इंग्लिश लोकांनीं एकच गिल्ला करून त्यांचें जीवित धोक्यांत आणण्याचा प्रयत्न केला. गांधींनाहि मोठ्या मुष्किलीनें स्वत:चा बचाव करावा लागला. या बचावाच्या प्रयत्नांत पोलिस अधिकाऱ्यांचें पूर्ण साहाय्य होतें. गांधींनीं पळून जातांना पोलिस शिपायाचा वेष धारण करून डोक्यावर मार बसूं नये म्हणून पितळेची ताटली ठेवून त्यावर फेटा गुंडाळलेला होता. त्यांच्या बरोबर असलेल्या डिटेक्टिव्हांनींहि अशाच तऱ्हेचा पोषाख केला होता. एकदां तर गांधींवर होत असलेला दगडांचा वर्षाव पाहून पोलिस सुपरिंटेंडेंटची पत्नि मिसेस अलेक्झंडर यांनीं त्यांना वांचविलें !

गांधींनीं आफ्रिकेंत असतांना आपली राहणी साधी व काट-कसरीची करण्याबद्दल विशेष काळजी घेतली. शर्टची कॉलर त्यांनीं स्वत: घरीं धुतली व तिला इस्त्री केली. ती कॉलर घालून ते कोर्टांत

गेले. कॉलरला खळ जास्त झाल्यानें ती कोटांत गळून पडत होती. यामुळें बॅ. गांधी इतर बॅरिस्टरांच्या थट्टेचा विषय होऊन बसले, तरीसुद्धां गांधी बिलकूल खजील झाले नाहींत !

*     *     *

तसेंच एकदां गांधी केस कापण्याच्या इंग्लिश दुकानांत गेले. तेथील हजामानें केस कापण्याचें तर नाकारलेंच आणि मोठ्या तुच्छतेनें त्यांना वागविलें. गांधींनीं लगेच बाजारांतून केस कापण्याचें यंत्र विकत आणून स्वतःच आपले केस कापले ! दाढी करायला कोणीहि शिकेल, पण केस कापण्याला कोण शिकत असतील कोण जाणे ! गांधींचें स्वावलंबनाचें तत्त्व अशा वागणुकींतच सांठविलेलें आहे.

*     *     *

गांधी १९०१ मध्यें कलकत्त्याच्या काँग्रेसच्या अधिवेशनाला गेले होते. तेथें राहण्यासवरण्याची जरा गैरसोय होती. शौचकूप बेताचेच होते; त्यामुळें चहूंकडे दुर्गंधि पसरली. गांधींनीं हा प्रकार एका स्वयंसेवकास दाखविला. त्यानें लागलीच उत्तर दिलें, "हें तर भंग्याचें काम !" गांधींनीं त्याच्याजवळ खराट्याची मागणी केली; पण स्वयंसेवकानें तीहि मागणी पुरी न करतां त्यांचेकडेच डोळे मोठे करून तो पाहूं लागला. गांधींनीं खराटा मिळवून शौचकूप साफ केला !

*     *     *

ट्रान्सव्हाल प्रांतांत हिंदी लोकांना सरकारी परवाने काढल्याखेरीज राहतां येत नसे. ही सक्ति म्हणजे केवळ अन्याय व जुलूमच होता. त्याविरुद्ध गहजब होऊन सत्याग्रह पुकारला गेला व तो पुष्कळसा यशस्वीहि झाला. गांधींनीं तडजोड सुचविली. सत्याग्रहींची

मुक्तता झाली. यानंतर एका पठाणानें विचारलें कीं, " स्वखुषीच्या परवान्यावर दाही बोटांचे छाप द्यावयाचे काय ? " त्यावर गांधींनीं उत्तर दिलें कीं, " त्यास कांहीं हरकत नाहीं. तरीपण असे छाप न देतां परवाने मिळण्याची खटपट केली जाईल." पण ही गोष्ट पठाणाला न रुचून " छाप देऊन परवाना मिळविणाऱ्या पहिल्या माणसाला ठार करीन " अशी त्यानें शपथ घेऊन प्रतिज्ञा केली. गांधींनीं या धमकीला पुढील उत्तर दिलें, " या कामांत मीं पैसे घेतले नाहींत आणि पहिला परवाना दहा बोटांचे छाप देऊन मी स्वत: काढणार आहें व त्यासाठीं मला माझ्या स्वदेशबांधवांच्या हातून मरण आल्यास त्यासारखी दुसरी पुण्याई ती कोणती ? "

* * *

१९०८ सालच्या दुसऱ्या सत्याग्रहाचे वेळीं गांधींना सश्रम कारावास घडला. या वेळीं त्यांनीं जमीन खणणें, शौचकूप साफ करणें, इ. कामें अगदीं निमूटपणें केलीं.

* * *

सत्याग्रही कुटुंबांच्या खर्चांत काटकसर करावी म्हणून गांधींनीं मोठी जागा खरेदी करून तिला 'टॉलस्टॉय फार्म' असें नांव दिलें. या ठिकाणीं सर्व धर्मांचीं कुटुंबें मोठ्या आनंदानें राहिलीं. स्वावलंबन, सहिष्णुता व सेवा या गोष्टी सर्वांच्या ठिकाणीं सारख्याच बाणल्या होत्या. या फार्मवर मोठे मुलगे व मुली मोकळेपणानें वागत. गांधींची देखरेखहि या ठिकाणीं विशेष असे. तरीपण कांहीं मुलांनीं दोघां मुलींची थट्टा केल्याचें गांधींच्या निदर्शनास आलें. गांधींनीं असा प्रकार पुन्हां होऊं नये म्हणून दोघां मुलींची समजूत घालून त्यांचे केस कापले. याचा इष्ट असाच परिणाम इतरांवर झाला.

* * *

१९१३ सालीं ट्रान्सव्हालमध्यें परवाना न काढतां गेल्यामुळें गांधींच्या पत्नी कस्तुरबाई, मुलगा व पुतण्या यांना तीन महिन्यांची शिक्षा झाली.

* * *

ना. गोखले आफ्रिकेंत गेले असतांना त्यांनीं मराठींत भाषणें केलीं, व त्याचा सारांश गांधींनीं हिंदींत सांगितला. ना. गोखल्यांना कौतुक वाटून त्यांनीं विचारलें, "तुम्ही इतके मराठी कोठें शिकलांत?" गांधींनीं "हिंदीइतकेंच मराठी समजतें" असें सांगितलें.

* * *

ना. गोखल्यांचे पुढील उद्गार खरोखर मननीय आहेत; ते म्हणतात—"गांधी हे खरोखर महात्मा आहेत. माझे गुरु महर्षि रानडे किंवा राजा राममोहन राय हेच सबंध हिंदुस्थानांत फार झालें तर त्यांच्या जवळ जवळ येऊं शकतील." **'महात्मा' ही पदवी ना. गोखल्यांनीं आपल्या शिष्याला प्रथम बहाल केली.**

* * *

आफ्रिकेंतील सत्याग्रहाची मोहीम यशस्वी झाली. जो ज. स्मट्स् गांधींशीं बोलण्यास तयार नसे त्यानेंच गांधींच्या झगड्यांतील न्यायीपणा, निःस्वार्थीपणा, सहिष्णुता, सेवा इ. गोष्टी पाहून त्यांनाच भेटीस बोलाविलें, व नवा कायदा करण्याचें आश्वासन दिलें. नवा कायदा होऊन जुन्यांतील सर्व जुलमी कलमें गाळण्यांत आलीं.

* * *

आफ्रिकेंतील कार्य उरकल्यावर गांधी हिंदुस्थानांत आले, व येथेंहि त्याच धर्तीवर राष्ट्रसेवा करण्याचें त्यांनीं ठरविलें.

* * *

चंपारण्य जिल्हा हा हिमालयाच्या पायथ्याशीं आहे. तेथें नीळीचा धंदा युरोपियन लोकांनीं प्रस्थापित केला होता. त्यांच्या मळ्यांत काम करणाऱ्या शेतकऱ्यांना युरोपियन मळेवाले गुलामांप्रमाणें वागवीत व वेळीं मारहाणहि करीत. ही स्थिति सुधारण्याकरितां गांधी व इतर पुढाऱ्यांनीं सत्याग्रहाचा चंग बांधला. शेवटीं सरकारनें चौकशी-समिति नेमून व तिच्या खुलाशावर विश्वसून शेतकऱ्यांची गुलामगिरी कायद्यानें नष्ट केली.

* * *

रौलट बिलाचा* निषेध म्हणून महात्मा गांधींनीं सत्याग्रहाची तयारी केली. सर्व हिंदुस्थानभर फिरून अनेक पुढाऱ्यांच्या गांठी घेऊन त्यांचीं प्रतिज्ञापूर्वक आश्वासनें मिळवून ६ एप्रिल १९१९ रोजीं सर्व हिंदुस्थानांत हरताळ पाळण्याचें महात्मा गांधींनीं जाहीर केलें. हाच हिंदुस्थानांतील पहिला प्रचंड हरताळ !

* * *

लोकमान्यांच्या पश्चात् १९२० सालीं महात्मा गांधींनीं मोठ्या प्रमाणावर असहकारितेच्या धोरणाचा पुरस्कार झाल्यास ‘एका वर्षांत स्वराज्य’ या महामंत्राचा घोष केला. विद्यार्थ्यांना शाळा व कॉलेजें सोडण्याचा उपदेश होऊं लागला. अशा रीतीनें सबंध हिंदुस्थानभर खळबळ सुरू झाली.

* * *

लो. टिळकांच्या निधनानंतर त्यांच्या पुण्यस्मरणार्थ म. गांधींनीं एक कोट रुपयांचा निधि जमविण्याचें ठरविलें. म. गांधींच्या पुरस्कारा-

---

* क्रांतिकारक चळवळीचे खटले ताबडतोब निकालांत काढण्याकरितां सरकारनें तयार केलेलें बिल.

मुळें आणि लोकमान्यांबद्दल असलेल्या निरतिशय प्रेमामुळें हा एवढा प्रचंड निधि हां हां म्हणतां जमला हेंच निधीचें वैशिष्ट्य होय.

* * *

१९२१ सालीं कॉंग्रेसनें महात्मा गांधींची 'सर्वाधिकारी' म्हणून नेमणूक केली. या वेळेपासूनच महात्मा गांधी हेच हिंदुस्थानचे पुढारी म्हणून समजले जात.

* * *

महात्मा गांधींचें समाजावरील वजन ओळखून त्यांना डांबून ठेवण्याच्या हेतूनें व त्यांची चळवळ बंद पाडण्याच्या बुद्धीनें मुंबई सरकारनें त्यांचे तीन लेख आक्षेपार्ह ठरवून त्यांना सहा वर्षांची शिक्षा ठोठावली ! गांधींनीं आपली शिक्षा ऐकून त्यावरील आपला अभिप्राय पुढील शब्दांत व्यक्त केला, " कै. लोकमान्य टिळकांच्या चौकशीचें उदाहरण डोळ्यांपुढें ठेवून तुम्हीं माझा बहुमान केला आहे. कारण या बाबतींत लो. टिळकांशीं तुम्हीं माझी तुलना केली हें मी महद्भाग्य समजतों...."

* * *

१९२४ सालीं महात्मा गांधी हे कॉंग्रेसचे अध्यक्ष होते. त्यांनीं कॉंग्रेसच्या प्रत्येक सभासदानें चरख्यावर सूत काढलें पाहिजे असा ठराव केला. शिवाय परदेशी मालावर बहिष्कार व खादीचा प्रसार याच गोष्टींवर मुख्यतः भर देण्यांत आला.

* * *

१९३० सालीं महात्मा गांधींनीं मोठ्या प्रमाणावर कायदेभंगाची चळवळ हातीं घेतली. वयाची साठी उलटली तरी मिठाचा कायदा मोडण्याकरितां म्हणून अनेक स्वयंसेवकांसह दांडी या गांवाहून म. गांधी निघाले. कांहीं दिवसांनंतर सरकारनें त्यांना अटक केली. सर्व हिंदुस्थानभर एकच खळबळ उडून गेली !

* * *

महात्मा गांधींचें सारें जीवन किंवा राजकीय मतें सत्य व अहिंसा या दोन तत्त्वांवर आधारलेलीं आहेत. सत्य आणि अहिंसा या दोन तेजस्वी तत्त्वांनींच हिंदुस्थानचा भविष्काळ उजळला जाईल अशी त्यांची खात्री आहे.

* * *

महात्मा गांधी गोल-मेज-परिषदेकरितां इंग्लंडमध्यें गेले असतां निरनिराळ्या ठिकाणीं त्यांचा मोठा बहुमान होई. महात्मा गांधी व इतर पुढाऱ्यांना एकदां बादशहाकडून चहाकरितां बोलावणें आलें, त्या वेळीं महात्माजींनीं आपल्या पोषाखांत कांहींहि बदल केला नाहीं. पंचा नेसून व वहाणा घालूनच बादशहांशीं हस्तांदोलन करून त्यांची भेट त्यांनीं घेतली !

* * *

सोमवार हा म. गांधींचा मौनव्रताचा दिवस आहे; या दिवशीं ते कांहींच बोलत नाहींत आणि ईश्वराच्या चिंतनांत सर्व काळ घालवितात. बोलण्याची अगदींच जरूर पडल्यास मनांतील विचार ते लिहून दाखवितात.

* * *

अस्पृश्यांचा उद्धार करण्याकरितां म. गांधींनीं १९३२ सालीं उपवास सुरू केला. सत्याग्रहाप्रमाणें उपवास हेंहि त्यांचें एक शस्त्र आहे आणि या शस्त्राचा उपयोग करून त्यांनीं स्पृश्य हिंदुसमाजाला जागें करून अस्पृश्यांचा प्रश्न अंशतः सोडविला. उपवास ही एक तपश्चर्या आहे, आणि या तपश्चर्येनें आत्मशुद्धि होते असा त्यांचा दृढ समज आहे. ‘ अस्पृश्य ’ शब्दाला ‘ हरिजन ’ हा प्रतिशब्द त्यांनींच रूढ केला.

* * *

महात्माजींविषयीं परस्थांनीं काढलेले उद्गार खरोखर अभिमानास्पद आहेत. रे. जॉन हेन्स होम्स म्हणतात, “ ख्रिस्ताचा अवतार पुन्हां होणार असें भविष्य आहे. हें भविष्य खरें होईल असें मला वाटत नाहीं; पण माझा विश्वास असता तर ख्रिस्त गांधींच्या रूपानें अवतरला आहे असें प्रतिपादन मीं निःसंशय केलें असतें. ”

*  *  *

एक जपानी दैनिक लिहितें, “ म. गांधींचे जितके अनुयायी आहेत तितके जगाच्या पाठीवर आजपर्यंतच्या इतिहासांत एकाहि व्यक्तीला मिळालेले नाहींत.”



# २. पंडित जवाहरलाल नेहरू

[ त्रोटक जीवन-वृत्तान्त:—जवाहरलाल यांचा जन्म अलाहाबाद येथें १४ नोव्हेंबर १८८९ रोजीं झाला. यांचे वडील मोतिलाल हे एक



सुप्रसिद्ध व कर्तबगार असे वकील होते. जवाहरचें बालपण अत्यंत लाडांत व सुखांत गेलें. शिक्षणाकरितां ते कोठल्याहि शाळेंत गेले नाहींत. त्यांच्याकरितां आरंभीं एक युरोपिअन गव्हर्नेस व नंतर इंग्लिश मनुष्याची शिक्षक म्हणून योजना केली होती. लहानपणीं त्यांना वाचनाची अतिशय गोडी लागली. पुढें वयाच्या १४व्या वर्षींच त्यांची शिक्षणाकरितां इंग्लंडला पाठविण्याची वडिलांनीं योजना केली. हॅरो व केंब्रिज येथें शिक्षण घेऊन ते पदवीधर झाले. आय्.सी.एस्.च्या परीक्षेकडे न वळतां त्यांनीं बॅरिस्टरीची परीक्षा दिली व सात वर्षांनीं ते मायभूमीला परतले. इंग्लंडमध्यें असतांनाच त्यांचीं राजकीय मतें जहाल गटाकडे झुकत होतीं. आपल्या वडिलांच्या मवाळ मतांबद्दल त्यांना मनांतून विषाद वाटत असे.

हिंदुस्थानांत पाऊल ठेवल्यावर त्यांचें लक्ष प्रथम संयुक्त प्रांतांतील किसानांच्या हलाखीच्या स्थितीकडे वळलें. येथूनच त्यांच्या सामाजिक व राजकीय कामगिरीला सुरुवात झाली. नंतर म. गांधींचा सत्याग्रह व कायदेभंगाच्या मोहिमेकडे जवाहरलालजींचें लक्ष वेधलें गेलें. पारतंत्र्यांत खितपत पडलेल्या आपल्या मायभूमीचा उद्धार करण्यांत आपलें जीवित वेंचण्याचें

त्यांनीं ठरविलें. घरीं सुदैवानें गजान्त लक्ष्मी असतांना सतीचें वाण घेऊन सत्याग्रहाच्या होमकुंडांत उडी ठोकण्याचें त्यांनीं ठरविलें! जवाहरचा निश्चय पाहून घरांतील मंडळींनीं देशसेवेचें व्रत स्वीकारलें. अशा रीतीनें सर्व नेहरू कुटुंब स्वातंत्र्य-संग्रामांत गढून गेलें. तुरुंगवास तर प्रत्येकाच्या अंगवळणीं पडून गेला. खुद्द जवाहरलालनीं अनेक वेळां कारावास पत्करला. नेहरू कुटुंबाचें ' आनंदभुवन ' हें **स्वराज्यभवन** झालें! पुढें जवाहरलाल यांनी काँग्रेस-कमिटीच्या चिटणिशीचें काम अव्याहत अनेक वर्षें केलें. काँग्रेसच्या अध्यक्षपदाचा मान प्रथम १९२९ सालीं त्यांना मिळाला. आणि याच वेळीं काँग्रेसनें ' पूर्ण स्वातंत्र्य ' हें ध्येय निश्चित केलें. हिंदुस्थानचा लढा केवळ हिंदुस्थानांतच लढून उपयोगी नाहीं, तर आपल्या देशाबद्दल सहानुभूति मिळविण्याचें कार्य परदेशांतहि सुरू केलें पाहिजे म्हणून, विलायतेंत जाऊन त्यांनीं निरनिराळ्या देशांत हिंदुस्थानसंबंधीं माहिती देऊन हिंदुस्थानचा दर्जा वाढविण्याचा प्रयत्न केला. त्याचप्रमाणें समाजवादाचे पुरस्कर्ते म्हणून जवाहरलाल यांनी काँग्रेसमध्येंहि त्याचीं तत्त्वें प्रसृत करण्याचें श्रेय घेतलें.

' **आत्मवृत्ता** 'खेरीज त्यांनीं आपल्या आवडत्या मुलीकरितां जगाची ओळख सोप्या भाषेंत करून देण्याच्या हेतूनें **इंदिरेस पत्रें** हें छोटें पुस्तक लिहिलें आहे. ]

पंडित जवाहरलाल नेहरू यांचें मूळचें आडनांव ' नेहरू ' नसून ' कौल ' असें आहे. अठराव्या शतकांत नेहरूंच्या पूर्वजांना दिल्लीच्या बादशहाकडून कालव्यानजिक मोठी जहागिर मिळाली. तेथेंच त्यांनीं बरींच वर्षें वास्तव्य केलें. हिंदींत कालव्याला ' नहर ' म्हणतात. ' नहर 'च्या कांठीं वास्तव्य करणारे ते ' नेहरु ' म्हणून त्यांचें नांव नेहरू हें रूढ झालें.

* * *

जवाहरलालांचे वडील मोतिलाल हे प्रख्यात वकील म्हणून नांवाजलेले. त्यांची मासिक कमाई तीस ते चाळीस हजारांपर्यंत

गेलेली होती. तेव्हां जवाहरलाल हे गर्भश्रीमंत असल्यामुळें त्यांचें सर्व लालनपालन बादशाही थाटांत झालें असल्यास नवल नाहीं. शिवाय हें पहिलेंच पुत्ररत्न असल्यामुळें त्याच्या कोडकौतुकाला काय पारावार !

* * *

लहानपणीं मुलाचें संगोपन अतिशय चांगल्या तऱ्हेनें व्हावें म्हणून मोतिलालनीं आपल्या मुलांकरितां युरोपियन ‘गव्हर्नेस’ ठेविली होती. त्यामुळें लहानपणींच जवाहरला चांगलें इंग्लिश बोलतां येऊं लागलें.

* * *

मोतिलालनीं आपल्या मुलाला कोणत्याच शाळेंत पाठविलें नाहीं. त्याच्या आरंभींच्या शिक्षणाची सर्व जबाबदारी एका विद्वान् इंग्रज इसमाकडे सोंपविण्यांत आली ! शाळेंतील घोळक्यांतलें शिक्षण व विद्वान् अशा स्वतंत्र शिक्षकांकडून मिळालेलें शिक्षण यांत कितीतरी तफावत पडणार. असें भाग्य सर्वांना थोडेंच लाभणार !

* * *

मोतिलालजींच्या तापट स्वभावामुळें जवाहरलाल भीतीमुळें त्यांच्या समोर उभे राहण्यास कचरत असत; पण वडील जितके रागीट तितकेच प्रेमळहि होते. जवाहरला आपल्या वडिलांविषयीं अलोट आदर वाटे; व आपण वडिलांच्याच प्रमाणें व्हावें अशी त्यांनीं मनाशीं खूणगांठ बांधली होती.

* * *

लहानपणीं जवाहरनें आपल्या वडिलांची ‘झरणी’ (Fountain Pen) लांबविली, व ती ‘घेतलीं नाहीं’ असें खोटेंच सांगितलें. ही गोष्ट अर्थातच त्यांच्या वडिलांना रुचली नाहीं; व त्यांनीं आपल्या

मुलाला—एकुलत्या एक मुलाला—इतका बेदम मार दिला कीं, आईला मध्यें पडून मुलाला बाजूला करणें प्राप्त झालें. शिवाय डॉक्टरला बोलावणें पाठवावें लागलें तें निराळेंच! "हा सर्व मार केवळ खोटें बोलण्याबद्दलचा" असें मोतिलालजींनीं निक्षून सांगितलें.

* * *

मुलाची दृष्टि व्यापक व्हावी म्हणून मोतिलालनीं आपल्या मुलाला १४ व्या वर्षींच शिक्षणाकरितां विलायतेंत पाठविण्याचें ठरविलें. जवाहरचे आई व वडील हे दोघेहि मुलाला पोहोंचविण्या-करितां म्हणून थेट विलायतेंत गेले होते! संपत्तीचा ओघ अखंड चालू असल्यावर कमतरता कशाची?

* * *

वडील जरी तापट असले तरी जवाहरलालला आपल्या वडिलां-बद्दल अतिशय आदर वाटे. ते शक्ति, शौर्य व बुद्धिमत्ता यांचे साक्षात् पुतळे आहेत अशी त्यांची कल्पना असे; आणि मनांतल्या मनांत वडिलांप्रमाणें आपण व्हावें असें त्यांनीं ठरविलें होतें. राजकारणांत पुढें त्यांनीं 'बापसे बेटा सवाई' म्हणवून घेतलें!

* * *

श्रीमंत आईबापांचे एकुलते एक चिरंजीव म्हणून जवाहरचे वाढदिवस मोठ्या थाटानें साजरे करण्यांत येत. जवाहर या दिवशीं विशेष खुषींत असे. वाढदिवसाच्या दिवशीं त्याची तुला करण्यांत येई व दुसऱ्या ताजव्यांत घातलेले गहूं व इतर कांहीं जिनसा गरिबांना वांटून टाकल्या जात. जवाहरची यासंबंधानें मुख्य तक्रार म्हणजे 'वाढदिवस फार अंतराअंतरानें येतो;' म्हणून वाढदिवस अधिक वेळ करण्यांत यावेत अशी चळवळ देखील त्यांनीं सुरू केली होती!

* * *

प्रत्यक्ष राजकारणांत प्रवेश करीपर्यंत जवाहरलाल हे अतिशय लाजाळू व घाबरट होते. कॉलेजांतील वादविवादमंडळांत एकहि भाषण त्यांनीं केलें नाहीं. उलट सबंध टर्ममध्यें भाषण न केल्यास विद्यार्थ्यांस दंड द्यावा लागे, तो दंडहि त्यांनीं भरला !

* * *

हॅरो येथील शिक्षणसंस्थेंत दोन वर्षें शिक्षण घेऊन जवाहरलाल केंब्रिजच्या विश्वविद्यालयांत दाखल झाले. तेथें बी. ए. ची पदवी मिळवल्यावर पुढें कोणता शिक्षणक्रम घ्यावा हाहि त्यांच्यापुढें प्रश्न उभा राहिलाच. आय. सी. एस. न होण्याचें त्यांनीं अनेक कारणांनीं ठरविल्यावर बॅरिस्टरीची परीक्षा त्यांनीं दिली. एकंदरींत शिक्षणाप्रीत्यर्थ जवाहरलालनीं विलायतेंत सात वर्षें वास्तव्य केलें !

* * *

विलायतेंत असतांना जवाहरलालनीं हिंदुस्थानच्या राजकीय परिस्थितीचें अवलोकन केलें. त्यांच्यासारख्या तरुण व तडफेच्या विद्यार्थ्याला मवाळांचें मवाळी राजकारण कधींच पसंत पडत नसे. जहाल पक्षाच्या कार्यक्रमाकडे असलेला जवाहरचा कल त्यांच्या वडिलांना मुळींच आवडला नाहीं. शिवाय त्यांनीं आपल्या वडिलांच्या मवाळी राजकारणाबद्दलहि त्यांना थोडा दोष दिला !

* * *

हिंदुस्थानांत परत आल्यावर आपल्या मायभूमीची दैन्यावस्था पाहून जवाहरचें मन अधिकच खिन्न होत गेलें. राजकारणाचे बाबतींत पिता-पुत्र यांचा छत्तिसाचा आंकडा असे ! राजकारणांत व्यवहारी दृष्टि ठेवलेल्या पित्यापुढें उसळणाऱ्या रक्ताच्या तरुण पुत्रानें पड कशी घ्यावी ? घराबाहेर चाललेल्या राजकारणांतील खटक्यांनीं घराच्या प्रांगणांत प्रवेश केला ! शेवटीं आईनें मुलाची समजूत

पाडण्यापर्यंत पाळी आली कीं, जवाहरनें जड अंतःकरणानें म्हणावें. " हिंदुस्थान स्वतंत्र नाहीं, तोंपर्यंत हें ' आनंदभवन ' मला दुःख-भवन वाटतें आहे....दादाजी जर मनांत आणतील तर इंग्रजांशीं जोराचा सामना देऊन आपल्या देशाला आझाद करतील. .."

* * *

भविष्यकाळाच्या उदरांत आश्चर्यकारक घटना घडत होत्या. जे मोतिलाल आपल्या मुलाचीं जहाल मतें खोडून टाकण्याचा प्रयत्न करीत तेच मोतिलाल कांहीं कालानंतर जहाल मतें उराशीं बाळगण्यास तयार झाले. मुलगा तर आरंभापासून जहाल प्रवृत्तीचा होता. मोतिलालजींचें राजकीय मतांतील परिवर्तन पाहून एका प्रसिद्ध व्यक्तीनें विनोदानें जवाहरलाल यांचें 'Physical son and political father of Motilal' असें खोंचदार वर्णन केलें आहे. पितापुत्र दोघेहि महात्मा गांधींचे पूर्ण अनुयायी बनले.

* * *

संयुक्त प्रांतांतील शेतकऱ्यांना 'किसान' ही संज्ञा आहे. त्यांची स्थिति अतिशय खालावलेली होती. दारिद्र्यामुळें व जुलुमामुळें त्यांना तोंड वर करण्याची सोय नव्हती. अशा परिस्थितींत शेतकरी समाजाची पाहणी करण्याचा सुयोग जवाहरलाल यांना अचानकपणें आला; व त्यांनीं किसानांची हृदयद्रावक परिस्थिति त्यांच्यांत पूर्ण मिसळून समजावून घेतली, आणि त्यांना दुःखाच्या गर्तेतून वर काढण्याबद्दल आश्वासन दिलें.

* * *

१९२१ सालच्या हिंदुस्थानव्यापी सत्याग्रह चळवळींत जवाहरलाल मग्न होऊन गेले. सत्याग्रहांत नांव दाखल करणें म्हणजे आपण स्वतः तुरुंगाचे दरवाजे खोलून प्रवेश करून घेणें होय. अतिशय

श्रीमंत बापाच्या पोटीं जन्माला येणाऱ्या एकुलत्या एक मुलानें तुरुंगांत स्वत: जाऊन हालअपेष्टा भोगाव्या यांत त्यागाची कल्पना केवढी असली पाहिजे !

* * *

वृद्ध पित्याला व प्रेमळ मातेला न बधणारा जवाहर म. गांधींना बधला. म. गांधींनीं थोर विचार करून असा सल्ला दिला कीं, जवाहरनें तूर्त सत्याग्रहांत भाग घेऊं नये. या धोरणी सल्ल्याचा परिणाम असा झाला कीं, नेहरू घराण्यांतील प्रत्येक व्यक्तीचा विश्वास महात्माजींवर पूर्ण बसला; आणि वेळ येतांच त्या घराण्यांतील प्रत्येक व्यक्तीनें अतुल स्वार्थत्याग करून पारतंत्र्यांत खितपत पडणाऱ्या मायभूमीची अमोल सेवा केली !

* * *

सत्याग्रह-स्वयंसेवकांच्या यादींत पितापुत्रांचीं नांवें झळकत होतीं. सरकारनें राजपुत्राच्या स्वागतांत विघ्न येऊं नये म्हणून दोघांना अटक केली. कैदेंत असतांना जवाहरलालनीं आपल्या वृद्ध पित्याची सेवा करण्याची सुसंधि दवडली नाहीं.

* * *

तुरुंगांतून सुटून आल्यावर सरकारनें त्यांना शिक्षण-मंत्र्याची जागा देण्याचें आमिष दाखवून स्वातंत्र्याच्या लढ्यापासून त्यांना परावृत्त करण्याचा प्रयत्न केला. पण ज्या जवाहरनें केवळ स्वातंत्र्याचा लढा यशस्वी करण्याकरितां आपल्या सहज मिळणाऱ्या बादशाही सुखावर लाथ मारली, प्रेमळ मातापितरांचे बोल सहन करून खाईंत उडी घेतली व भर तारुण्यांतहि आपल्या गोड पत्नीनें पुढें केलेला नाजुक हात झिडकारला तो जवाहिर सरकारनें पुढें टाकलेला आमिषाचा तुकडा थोडाच चघळणार ?

* * *

सायमन कमिशनवर बहिष्कार जवळ जवळ सर्व हिंदुस्थाननें पुकारला. तें कमिशन जेथें जेथें जाई तेथें तेथें काळीं निशाणें व 'परत जा' अशा आरोळ्यांनीं त्याचें स्वागत होई! अशा या बहिष्काराच्या मिरवणुकींतच जवाहरलालजी होते; व त्यांना लाठी-वाल्या शिपायांकडून चांगलाच प्रसाद मिळाला, तरी ते स्थानभ्रष्ट झाले नाहींत.

* * *

राजकारणांत बाप-लेकांत अनेक वेळां खटके उडत. जवाहर यांचें म्हणणें असें पडे कीं, ध्येय ठरविण्याच्या बाबतींत आपलं धोरण संकुचित असूं नये; म्हणून 'पूर्ण स्वातंत्र्य' हें ध्येय असावें. मोतिलालजींनीं म्हणावें कीं, शक्याशक्यतेचा विचार करून आपल्याला आपलें पाऊल मागें घेण्याची पाळी न येईल अशा तऱ्हेनें आपली मागणी असावी. म्हणून तूर्त 'वसाहतीचें स्वराज्य' हें ध्येय असावें.

* * *

कोणाहि भारतीय सेवकानें ज्या मानाचा अभिलाष धरावा व ज्याची प्राप्ति झाली असतां 'आज कृतार्थ झालों' असे सहजो-द्गार बाहेर पडावे तो मान म्हणजे काँग्रेसच्या अध्यक्षपदाचा. १९२९ सालीं लाहोर येथें भरणाऱ्या काँग्रेसच्या अध्यक्षपदाच्या जागेकरितां खुद्द महात्मा गांधींनीं जवाहरलाल नेहरूंचें नांव सुचविलें व तें सर्व-सम्मतहि झालें. पिताजी, माताजी, प्रेमळ पत्नी व बहिणी यांचीं अंतःकरणें प्रेमातिशयानें भरून आल्यास आश्चर्य काय!

* * *

मोतिलालजींनीं अध्यक्षस्थान सोडतेवेळीं "बापाचें राहिलेलें काम मुलगा पुरें करील" असे अर्थपूर्ण शब्द उच्चारून अध्यक्षाची खुर्ची मुलाकरितां मोकळी केली. खरोखर धन्य ते पिता-पुत्र!

* * *

लाहोर येथें पूर्ण स्वातंत्र्याचा ठराव पास झाल्यावर उच्च ध्येयाचा ध्वज सतत फडकत राहावा म्हणून अध्यक्षांनीं '२६ जानेवारी' हा दिवस स्वातंत्र्य-दिन म्हणून साजरा करावा, असें जाहिर केलें. तेव्हांपासून आपण हा ' दिन ' पाळत आलों आहोंत.

* * *

अलाहाबाद नगरपालिकेच्या अध्यक्षपदाचा मान जवाहरलालनीं घेतला. पण काम मोठ्या उत्साहानें त्यांनीं सुरू करावें आणि त्यांत कायदेशीर अनेक अडथळे उत्पन्न व्हावेत, यामुळें मनांत कितीं सुधारणा घडवून आणण्याचें असलें तरी कायदेशीर बंधनांनीं हात जखडले जात; त्यामुळें नाइलाजानें त्यांनीं अध्यक्षपद सोडलें.

* * *

जवळजवळ राजकारणांत पडल्यापासूनच अनेक वर्षें जवाहरलाल यांची कॉंग्रेसच्या चिटणिसाच्या जागेवर नेमणूक होई, त्यामुळें कॉंग्रेसच्या राजकारणाशीं त्यांचा अतिशय निकटचा संबंध येत असे. त्यांचीं मतें कॉं. राजकारणाशीं शंभर टक्के तंतोतंत जुळणारीं नसलीं तरीसुद्धां चिटणिशीचीं कामें स्वतः जवाहरलालनाच करावीं लागत; इतका गांधींचा व इतर पुढाऱ्यांचा त्यांच्यावर विश्वास असे.

* * *

जवाहरलालांनीं वकिली सोडून दिल्यामुळें स्वतंत्र रीतीनें त्यांनीं कधींच पैसा मिळवला नाहीं. या आर्थिक परावलंबनाची जाणीव त्यांना त्रास देऊं लागली. वडिलांसमोर यासंबंधीं प्रत्यक्ष बोलण्याचें धैर्य त्यांना होईना. शिवाय त्यांच्या मनालाहि दुःख होऊं नये म्हणून अनेक आडवळणांनीं अतिशय सौम्य शब्दांत निरोप पोहोंचविण्याची त्यांनीं व्यवस्था केली. वडिलांनीं निरोपाची बोळवण पुढील शब्दांत केली, " तुझ्या पत्नीला व माझ्या पत्नीला आणि तुला

वर्षभर पुरतील इतके पैसे चार दिवस काम केलें कीं मी सहज मिळवीन." ही गोष्ट जरी खरी असली तरी जवाहरलालजींचें समाधान या उत्तरानें थोडेंच होणार! तरीसुद्धां ते वडिलांच्या म्हणण्याबाहेर वागले नाहींत.

* * *

जवाहरलाल यांना काँग्रेसच्या अध्यक्षपदाचा मान तीनदां मिळाला! अगदीं पहिल्या खेपेस अध्यक्षपदावर त्यांचीं निवडणूक झाली असें म्हणण्यापेक्षां गांधींनीं 'नेमणूक' केली असें म्हटलें तरी चालेल. यामुळें ते जरा मनांत खट्टू होते. पण वडिलांच्या पाठोपाठ मुलगा अध्यक्षाचे जागेवर चढावा हें अभूतपूर्व दृश्य पाहून लोकांना मोठें कौतुक वाटलें. काँग्रेसच्या सर्व अध्यक्षांत ते वयानें लहान होते असा समज होता, पण हा गैरसमज असल्याचें जवाहरलालनींच लिहिलें आहे.

* * *

तुरुंगाच्या दीर्घकालीन एकांतवासांत जवाहरलालनीं 'आत्मचरित्र' लिहिलें. 'आत्मचरित्र' लिहिणें हें काम फारच कठीण असतें. आपल्या संबंधानें लिहितांना वाजवीपेक्षां अधिक दोष आपल्याकडे घेतला तर मन निश्चिंत असत नाहीं, आत्मस्तुति केली तर निंदा चुकत नाहीं; यथास्थित वर्णन झालें तरच ठीक आहे. म्हणून आत्मवृत्ताचा प्रकार फारसा रूढ नाहीं. महात्मा गांधी, महर्षि अण्णासाहेब कर्वे, साहित्य-सम्राट् नरसोपंत केळकर, जवाहरलाल नेहरू यांच्या-सारख्या महान् विभूतींनींच 'आत्मचरित्रें' लिहावींत.

# ३. सुभाषचंद्र बोस

[ त्रोटक जीवन-वृत्तान्तः—सुभाषचंद्र बोस यांचा जन्म १८९७ मध्यें झाला. यांचे वडील जानकीनाथ हे सुविद्य व थोर अंतःकरणाचे



गृहस्थ म्हणून त्यांची ख्याति होती. सरकारी नोकरींत राहून त्यांनीं पुष्कळच पैका कमाविला होता. त्यांची आईहि प्रेमळ, परोपकारी व धर्मशील अशी होती. हिनें 'अष्टपुत्रा सौभाग्यवती' हा आशीर्वाद सार्थ करून दाखविला. सुभाषचंद्राच्या मनावर त्याच्या आईचीच विशेष छाप पडलेली दिसते. अशा सुस्थित घराण्यांत सुभाषबाबूंचा जन्म झाल्यामुळें त्यांचा विद्याभ्यास चांगल्या तऱ्हेनें होऊं शकला. मॅट्रिकच्या परीक्षेंत उत्तम यश संपादून त्यांनीं उच्च शिक्षणाला सुरुवात केली; पण हें शिक्षण निरनिराळ्या कारणांनीं सुरळीत होऊं शकलें नाहीं. शेवटीं बी. ए. ची परीक्षा पहिल्या वर्गांत पास होऊन त्यांनीं इंग्लंडला आय्. सी. एस्. करितां प्रयाण केलें. त्यांचें बुद्धिवैभव जसें इतर परीक्षांतून दिसून आलें तसें याहि परीक्षेंत त्यांनीं स्पृहणीय यश संपादन केलें. सुभाषबाबूंच्या मनाची घडण अगदी सामान्य माणसांच्या मनाप्रमाणें नसल्यामुळें आपण

कांहीं विशेष करून दाखविलें असें त्यांना वाटेच ना. एकामागून एक जशा गोष्टी सहजासहजीं घडत जाव्यात त्याप्रमाणें आय्. सी. एस्. ची परीक्षा झाल्याबरोबर सरकारी तनखा सुरू झाला, अधिकाराची जागा मिळाली, राजीनामा दिला नसता तर हलके हलके मोठ्या अधिकाराच्या पदावर आरूढ झाले असते. पण हिंदुस्थानच्या सुदैवानें असा मोहरा सोनेरी ताटाच्या चमचमाटानें दिपणारा नव्हता ! हा पार्थिव देह नश्वर आहे; या जन्माची सार्थकता म्हणजे ब्रह्मज्ञानाची प्राप्ति अशा तऱ्हेची हिंदूंच्या उच्च संस्कृतीला अनुरूप असणारी विचारप्रणालि त्यांच्या ठिकाणीं पूर्ण भिनलेली होती. तेव्हां सरकारी सेवेंत त्यांचें मन कसें रमणार ? असहकारितेच्या चळवळीची लाट उसळतांच हीच सुवर्ण संधि ओळखून सुभाषबाबूंनीं सरकारी नोकरींतील सहजसुलभ अशा ऐहिक सुखावर लाथ मारावी यांत काय आश्चर्य !

आपली मायभूमि पारतंत्र्यांत पिचत पडलेली पाहून तिचा उद्धार करण्याकरितां या तेजस्वी वीरानें शिरकमळ हातांत घेऊन स्वातंत्र्याच्या लढ्यांत उडी ठोकली. देशबंधु चित्तरंजन दास, बंगालचे एकमेव पुढारी, यांची गुरुस्थानीं योजना करून सुभाषबाबूंनीं राजकारणाचे धडे गिरविण्यास सुरुवात केली, व गुरूंच्या पश्चात् त्यांचें मानाचें स्थान यांनीं पटकाविलें. सुभाषबाबूंच्या, तरुण रक्ताला अनुसरून असणाऱ्या जहाल मतांमुळें आणि समाजवादाकडे त्यांचा कल झुकत असल्यामुळें त्यांचे इतर मुरलेल्या पुढाऱ्यांबरोबर खटके उडत. त्यामुळें त्यांना सहमत असणाऱ्यांचा राष्ट्रीयसभांतर्गत असा नवीन पक्ष स्थापन करावा लागला. सरकारला ही व्यक्ति ‘ भयंकर ’ वाटून हिला निर्वासित करण्याचे प्रसंग वरचेवर आणावे लागले. सुभाषबाबूंची प्रकृति तुरुंगांत अनेक वेळां विकोपास जाई व हवापालट करण्याकरितां विलायतेस देखील जावें लागे. परदेशांत असतांना त्यांनीं हिंदुस्थानबद्दल सहानुभूति मिळविण्याचें कार्य केलें. राष्ट्रीय सभेच्या चिटणिशीचें काम अनेक वेळां त्यांनीं केलें. विद्यार्थि-परिषद हिंदुस्थानांतील कोणत्याहि प्रांतीं भरो, युवकांचे आवडते पुढारी सुभाषबाबू हे अध्यक्षस्थानीं असावयाचेच. नंतरच्या काळांत त्यांनीं आपल्या जहाल

मतांना थोडी मुरड घातल्यानें म. गांधींनीं त्यांची योजना राष्ट्रीय सभेच्या अध्यक्षस्थानीं केली. पुढील वर्षींहि त्यांचीच योजना झाली, पण या खेपेस गांधींचा पाठिंबा नसतांना ते बहुमतानें निवडून आले. विरोधी परिस्थितीमुळें त्यांना तें काम मध्येंच सोडावें लागलें ही गोष्ट निराळी.]

---

सुभाषबाबूंची लहानपणापासून हुशार विद्यार्थी म्हणून ख्याति होती. त्यांचें सर्व शिक्षण कटक येथें झालें व ते वयाच्या १६ व्या वर्षीं प्रवेशपरीक्षा उत्तीर्ण झाले. या परीक्षेंत त्यांचा दुसरा क्रमांक लागला. आपल्या बुद्धीची चमक अशा तऱ्हेनें त्यांनीं दाखविल्यावर त्यांच्या वडिलांनीं त्यांना कलकत्त्याच्या 'प्रेसिडेन्सी' कॉलेजमध्यें पाठविण्याचें ठरविलें.

* * *

सुभाषबाबूंच्या मनावर त्यांच्या मातोश्रींची उत्तम छाप पडलेली दिसून येते. त्यांची आई अतिशय प्रेमळ, धर्मशील आणि सच्छील वागणुकीची होती. कॉलेजमध्यें असतांना विलासी वर्तनाचा ते तिरस्कार करीत. दुःखितांचीं दुःखें निवारण्यांत त्यांना सात्त्विक आनंद मिळे; आणि हाच आनंद मिळविण्याकडे त्यांचा कटाक्ष असे.

* * *

धार्मिक विचारांकडे त्यांचें इतकें लक्ष ओढलें गेलें कीं, शेवटीं कॉलेजचा अभ्यासक्रम बाजूला सारून संन्यस्त वृत्तीनें राहावयाचें त्यांनीं ठरविलें. एवढ्याकरितां घर सोडून देऊन आध्यात्मिक उन्नतीचा मार्ग दाखविणाऱ्या गुरूच्या शोधार्थ त्यांनीं तीर्थाटनास सुरुवात केली. मथुरा, वृंदावन, काशी, हरिद्वार इत्यादि ठिकाणीं वैराग्यवृत्तीनें वास्तव्य करणाऱ्या साधुसंतांच्या सान्निध्यांत कांहीं काळ घालविला; पण सुभाषबाबूंचें मन तेथील ढोंगी-

पणामुळें पार विटून गेलें, आणि त्यांनीं परत घरचा रस्ता सुधारला. या वेळीं त्यांचें वय अवघें अठरा वर्षांचें होतें.

* * *

अकालींच विरक्त वृत्तीनें राहूं पाहणारा आपला मुलगा परत घरीं आलेला पाहून आईला अतिशय आनंद झाला. सुभाषनें पुन्हां कॉलेजचा अभ्यास सुरू केला. ब्रह्मज्ञानाच्या मागें लागणाऱ्या सुभाषनें बी. ए. करितां तत्त्वज्ञान हा ऐच्छिक विषय निवडल्यास आश्चर्य नाहीं.

* * *

'प्रेसिडेन्सी' कॉलेजांतील एक अध्यापक सी. एफ्. ओएटेन यांना हिंदी लोकांबद्दल जिव्हाळा तर नाहींच, पण उलट तिटकारा वाटे. एकदां त्यांनीं हिंदी विद्यार्थ्यांविषयीं बेफिकीरपणें अपमानकारक शब्द काढले. अर्थात् मानी विद्यार्थ्यांना ही गोष्ट असह्य झाली, आणि त्यांनीं अध्यापकांवर जवळजवळ चालच केली ! सर्व विद्यार्थी नंतर घरोघर निघून गेले. दुसऱ्या दिवशीं सर्वांनीं सुभाषबाबूंच्या हुकमतींत कॉलेजवर हरताळ पाडला. याचा परिणाम असा झाला कीं, सुभाषबाबूंना कॉलेज सोडावें लागलें. शिक्षणक्रमांत हा दुसरा व्यत्यय.

* * *

बी. ए. होण्याची त्यांची इच्छा असल्यानें कलकत्त्याचे व्हाइस्-चॅन्सेलर सर आशुतोष मुकर्जी यांच्या मध्यस्थीनें सुभाषनें 'स्कॉटिश चर्चेस कॉलेज'मध्यें प्रवेश मिळवून बी. ए.ची परीक्षा दिली. आपल्या बुद्धिमत्तेची चमक त्यांनीं याहि परीक्षेंत दाखविली; ते पहिल्या वर्गांत उत्तीर्ण झाले.

* * *

# सुभाषचंद्र बोस

१९१९ मध्यें सुभाषबाबू हे आय्. सी. एस्.च्या परीक्षेकरितां इंग्लंडला गेले. या परीक्षेंत त्यांचा चवथा क्रमांक लागला. या परीक्षेच्या यशामुळें ते सरकारी सेवेच्या सुवर्णशृंखलांनीं बद्ध झाले. परीक्षेंत उत्तम यश मिळालें म्हणून जरी त्यांना आनंद झाला, तरी त्यापासून होणाऱ्या आर्थिक लाभानें किंवा व्यावहारिक वैभवानें ते कधींच हुरळून गेले नाहींत. उलट अशा ऐश्वर्याचा त्यांना मनापासून तिटकाराच वाटे.

*　　　*　　　*

१९२१ सालच्या असहकारितेच्या प्रचंड चळवळीमुळें सारी जनता हर्षोत्फुल्ल झालेली होती. मातृभूमीची सेवा करण्याची सुवर्ण-संधि विचारवंतांनीं गमावली नाहीं. सुभाषबाबूंनीं सामान्य माणसाला नेहमीं भुलवत ठेवणारी सुवर्णशृंखला ताडकन् तोडून ते भूमातेच्या सेवेला हजर झाले. येथूनच त्यांच्या राजकीय जीवनाला आरंभ झाला.

*　　　*　　　*

बंगालचे पुढारी चित्तरंजन दास यांना सुभाषबाबूंच्या त्यागी वृत्तीचें कौतुक वाटलें, आणि त्यांच्यासारखा बुद्धिवान्, कर्तबगार, निर्लोभी, बाणेदार व धडाडीचा मनुष्य राष्ट्रसेवेला मिळाल्यामुळें त्यांना अत्यानंद झाला.

*　　　*　　　*

असहकारितेच्या चळवळीच्या आरंभीं राष्ट्रीय विद्यापीठें व राष्ट्रीय महाविद्यालयें स्थापन झालीं. बंगालमध्यें स्थापन झालेल्या राष्ट्रीय कॉलेजच्या प्रिन्सिपॉलच्या जागीं सुभाषचंद्रांची योजना झाली.

*　　　*　　　*

देशाभिमानानें प्रेरित होऊन मातृभूमीची सेवा करण्यास तळ-मळणाऱ्या युवकांचें स्वयंसेवक-पथक तयार करण्याचें कार्य सुभाष-बाबूंनीं प्रथम हातीं घेतलें. पण ही चळवळ जरा कोठें अंग धरते

न धरते तोंच, सरकारला ही चळवळ पसंत न पडल्यामुळें सुभाष-बाबूंना अटक होऊन सहा महिन्यांची सक्तमजुरीची शिक्षा झाली. दोन वर्षांपूर्वींचे सरकारी अधिकारी सरकारचे 'पाहुणे' झाले !

* * *

बंगालच्या ' फॉरवर्ड ' पत्राचें संपादकत्व कांहीं काळ सुभाष-बाबूंकडे होतें, व हें काम सोडल्यावर कलकत्ता कॉर्पोरेशनच्या चीफ ऑफिसरची जागा त्यांनीं पत्करिली. सुभाषबाबूंना अटक केल्यावर चित्तरंजन दास यांनीं पुढील उद्गार काढले.

* * *

कैदेंत असतांना सुभाषबाबूंना क्षयरोगाची व्यथा जडली व त्यांची प्रकृति काळजी करण्यासारखी झाली, म्हणून हवापालट करण्याचा सल्ला डॉक्टरनें दिला. पण सरकारनें त्यांना हिंदुस्थानांतील कोठल्याहि बंदरीं न उतरतां स्वित्झर्लंडला तडक जाण्याची परवानगी दिली. सुभाषबाबूंनीं मानहानिकारक सशर्त योजनेचा तीव्र शब्दांत निषेध केला, आणि परमेश्वरावर विसंबून ते स्वस्थ बसले.

* * *

मंडाले येथील तुरुंगाच्या ज्या कोठडींत लोकमान्यांचें वास्तव्य होतें त्याच ठिकाणीं सुभाषबाबूंना राहण्याचा योग आला, याबद्दल त्यांना विशेष अभिमान वाटतो.

* * *

बंगालच्या गव्हर्नरनें आपल्या खास डॉक्टरांच्याकडून सुभाष-बाबूंची प्रकृति तपासून घेतली व डॉक्टरांच्या अभिप्रायानुसार त्यांची बिनशर्त सुटका केली. मंडालेहून येतांना गव्हर्नरसाहेबांनीं आपली स्वतःची मोटर-बोट 'क्वीन मेरी ' ही पाठवून त्यांच्या सुख-सोयीकडे विशेष लक्ष पुरविलें.

* * *

१९२७ च्या मद्रास कॉंग्रेसमध्यें सुभाषबाबूंनीं आपलीं जहाल मतें जवाहरलाल नेहरूंच्या बरोबरीनें मांडलीं, आणि संपूर्ण स्वराज्याच्या ठरावाला जोराचा पाठिंबा दिला. अर्थात् ही विचारसरणी जुन्या मुत्सद्यांना तंतोतंत पटली नाहीं. कॉंग्रेसमध्यें देखील जहाल व किंचित् मवाळ असे भेद आहेत.

*　　　*　　　*

ऑल-इंडिया कॉंग्रेस कमिटीच्या बैठकींत पं. मोतिलाल नेहरूंनीं सुभाषबाबूंना चुकीची माहिती दिल्याबद्दल त्यांना दोष दिला. सुभाषबाबूंना हा अपमान वाटून ते ताबडतोब सभेंतून निघून गेले आणि आपल्या सभासदत्वाचा राजीनामा दिला. बाणेदारपणा हा त्यांच्या अंगीं पूर्णपणें बाणलेला होता.

*　　　*　　　*

लाहोर-कॉंग्रेसच्या प्रकट अधिवेशनांत सुभाषबाबूंनीं ब्रिटिश राज्यव्यवस्थेला अनुसरून कॉंग्रेस राज्यघटना सुरू करावी, अशी स्वातंत्र्याच्या ठरावाला उपसूचना म्हणून मांडली. त्या वेळीं ते म्हणाले, 'बहिष्काराचा अर्धवट कार्यक्रम हातीं घेणें निरुपयोगी आहे.... ब्रि. राज्यघटनेशीं समांतर अशी आपली वेगळी राज्यघटना हवी... म. गांधींनीं 'ही उपसूचना तत्त्वतः चांगली आहे व ती पुढें मांडणाराच्या अंगीं असणारी कर्तबगारीहि सुभाषबाबूंच्या अंगीं आहे, तरीपण असली योजना हातीं घेण्याची वेळ दूर आहे.' असें सांगून उपसूचना मागें खेचली.

*　　　*　　　*

वारंवार मतभेद होत असल्यामुळें सुभाषबाबूंनीं नवीनच पक्ष स्थापन करण्याचें धैर्य दाखविलें. त्याचें नांव 'कॉंग्रेस डेमोक्रॅटिक पार्टी'. हा पक्ष कॉंग्रेस-अंतर्गत असला तरी त्यांचीं मतें विशेष

जहाल होतीं. जवाहरलाल नेहरू व सुभाषबाबू यांचें कांहीं बाबतींत आरंभीं मतैक्य असलें तरी तें पुढें टिकूं शकलें नाहीं.

* * *

सुभाषचंद्र बोस यांनीं व्हिएन्ना येथें 'सेंट्रल इंडो-युरोपियन सोसायटी' स्थापन केली. या संस्थेचा मूळ उद्देश हिंदुस्थानांतील चाललेल्या राजकीय चळवळींना युरोपांतील देशांकडून सहानुभूति मिळविणें व चाललेल्या चळवळींची यथातथ्य माहिती प्रसृत करून खोट्यानाट्या व बदनामीकारक प्रवादांना आळा घालणें हा होय.

* * *

झेकोस्लोहाकिया, ऑस्ट्रिया, हंगेरी, जर्मनी, युगोस्लाविया, आयर्लंड इ. देशांत हिंडून सुभाषबाबूंनीं प्रचार-कार्य केलें. परदेशांत प्रचार करणें व सहानुभूति मिळविणें हीं कार्यें करण्याकरितां कॉंग्रेसनें स्वतंत्र खातें निर्माण करण्याची अवश्यकता प्रतिपादिली.

* * *

सुभाषबाबूंची प्रकृति अतिशय बिघडल्यामुळें त्यांची तुरुंगांतून सुटका करण्यासंबंधीं सभा भरली असतांना बी. सी. चतर्जी यांनीं त्यांसंबंधीं पुढील उद्गार काढले आहेत, "पोलिस किंवा गुप्त हेर यांच्यापेक्षां मी सुभाषचंद्रांना शतपटीनें अधिक ओळखतों. ते अत्याचारविरोधी आहेत, हें मला पक्कें ठाऊक आहे. सरकारनें जर त्यांना बंधमुक्त केलें तर देशांत अनत्याचारी वातावरण निर्माण होण्यास निःसंशय बहुमोल मदत होईल....बंगालचे मुख्य मंत्री होण्याचा मान खरोखर जर कुणाचा असेल तर तो सुभाषबाबूंचाच आहे !..."

* * *

हिंदुस्थान सरकार सुभाषबाबूंना हिंदुस्थानांत मोकळें राहूं देत नव्हतें, म्हणून कित्येक दिवस त्यांना युरोपांतच जुलमानें वास्तव्य

करावें लागलें. धड तेथें पण मन येथें अशी त्यांची कुचंबणा करणारी स्थिति झाली !

*　　　*　　　*

सुभाषबाबूंचे वडील मृत्युशय्येवर आहेत, अशी तार आल्यावर शेवटचें दर्शन घेण्याकरितां म्हणून विमानानें वायुवेगानें ते आले; पण जानकीनाथांचा—त्यांच्या वडिलांचा—प्राणवायु केव्हांच पंचमहाभूतांत विलीन होऊन गेला होता ! अत्यंत दुःखद अशा परिस्थितींत सरकारनें त्यांना पोलिसांच्या बंदोबस्तांत घरीं पोहोंचवून आठ दिवसांचे आंत परत युरोपला जाण्याविषयीं हुकूम दिला !

*　　　*　　　*

सुभाषबाबूंचीं मतें निरनिराळ्या प्रांतांतील तरुण विद्यार्थ्यांच्या मतांशीं पुष्कळ अंशीं जुळणारीं अशीं आहेत. त्यामुळें अनेक प्रांतांतील युवकपरिषदांचें अध्यक्षस्थान त्यांना मंडित करावें लागलें. पंजाब, मध्यप्रांत, बहार, वऱ्हाड, संयुक्त प्रांत व महाराष्ट्र इ. प्रांतांतील तरुणांचीं मनें त्यांनीं आपल्या अध्यक्षीय भाषणांनीं काबीज केलीं होतीं. १९३३ मध्यें युरोपांत रोम शहरीं भरलेल्या भारतीय विद्यार्थी परिषदेचें अध्यक्षस्थानहि सुभाषबाबूंनाच देण्यांत आलें होतें.

*　　　*　　　*

युरोपांत जरी सुभाषबाबू अनेक वेळां गेले तरी त्यांना खुद्द इंग्लंडमध्यें जाण्याला बंदी असे आणि ज्या वेळीं अशी मनाई नव्हती तेव्हां ते मित्रमंडळींना भेटण्याकरितां म्हणून गेले त्या वेळीं तेथें त्यांचें अपूर्व स्वागत झालें. इंग्लंडमधील मजूरपक्षातर्फे त्यांना थाटाची मेजवानी देण्यांत आली. केंब्रिज व ऑक्सफोर्ड विद्यापीठांनीं त्यांचा गौरव करून सत्कार केला. खुद्द लॉर्ड आयर्विन यांनीं

सुभाषबाबूंचें फेडरेशनसंबंधीं काय म्हणणें आहे हें समजून घेण्याकरितां त्यांची मुलाखत घेतली. आयर्लंडचे स्वातंत्र्यवीर डी व्हॅलेरा यांनीं देखील सुभाषबाबूंशीं खाजगी चर्चा केली. सुभाषबाबू ही हिंदुस्थानांतील प्रचंड शक्ति आहे याची जाणीव सर्वांना होत आहे.

* * *

" गांधींशीं समरस न होण्याचा अथवा ते व त्यांची प्रभावळ यांच्यापुढें मान न लवविण्याचा जोंपर्यंत सुभाषबाबूंचा बाणा होता तोंपर्यंत त्यांना कॉंग्रेसमध्यें त्यांची योग्य जागा कधींच मिळाली नाहीं " असे एका वर्तमानपत्रानें काढलेले उद्गार अनेक काढतात. सुभाषबाबूंच्या विचारसरणींत जेव्हां नरमाई दिसून आली तेव्हांच गांधींनीं त्यांचें नांव अध्यक्षपदाकरितां सुचविलें.

* * *

कॉंग्रेसच्या अध्यक्षपदाचा मान मिळणें म्हणजे जन्माला येऊन मायभूमीच्या सेवा-वृत्तीचें साफल्य होय. असा मान मिळण्याची आकांक्षा भारतमातेचा कोणता सुपुत्र करणार नाहीं? सुभापबाबूंना हा मान १९३८ मध्यें म्हणजे यांच्या वयाच्या अवघ्या एकेचाळिसाव्या वर्षीं मिळाला. हरिपुरा येथें भरलेल्या कॉंग्रेसचे ते अध्यक्ष होते.

* * *

१९३९ सालीं पुन्हां त्यांनाच कॉंग्रेसचें अध्यक्षस्थान मंडित करावें लागलें. कॉंग्रेसच्या अध्यक्षाची निवडणूक सहसा अटीतटीनें कधींच होत नाहीं. दोनतीन नांवें यदाकदाचित् पुढें आल्यास त्यांतील समंजस पुढारी आपलीं नांवें मागें घेतात व उरलेला उमेदवार बिनविरोध निवडून येतो, अशी नेहमीं योजना असते. पण १९३९ सालच्या कॉंग्रेसच्या अध्यक्षाची मोठ्या चुरशीनें

निवडणूक झाली! सुभाषचंद्र बोस यांचा कार्यक्रम धडाडीचा म्हणून कांहींचा कल यांच्याकडे असे, पण पट्टाभिसीतारामय्या यांना म. गांधी, वल्लभभाई पटेल इ. महान् श्रेष्ठींचा पाठिंबा, शेवटीं सर्व हिंदुस्थाननें सुभाषबाबूंनाच पुन्हां बहुमतानें निवडून दिलें!

* * *

जाहीर अधिवेशनाचे वेळीं सुभाषबाबूंची प्रकृति इतकी ढांसळली होती कीं, ते हजर राहूं शकतात कीं नाहीं याचीच प्रत्येकाला चिंता लागून राहिली होती. शेवटीं सभामंडपांत त्यांना खुर्चीत बसूनच यावें लागलें. कर्तव्याची जाणीव असलेल्या मनुष्यास शरीराचेंहि भान राहत नाहीं, हें विधान सुभाषबाबूंच्या बाबतींत तंतोतंत खरें ठरतें. अंगांत १०३° डिग्री ताप फणफणत असूनहि ते हजर राहिले!

* * *

सुभाषबाबू धरून ते एकंदर **आठ बंधू** होत! हे सर्व बंधू आपआपल्या परीनें नांवारूपास चढले आहेत. त्यांत सुभाषबाबूंची कीर्ति दिगन्तीं पोहोंचली हें पाहून मातापितरांना अतिशय धन्यता वाटली. त्यांचे एक बंधु शरच्चंद्र हे निष्णात बॅरिस्टर आहेत. सुभाषबाबूंचे हे कट्टे अनुयायी असून राजकारणांतहि त्यांना साहाय्य करतात. आणखी एक त्यांचे बंधु डॉ. सुनीलचंद्र हे एम्.डी. असून त्यांची गणना उत्तम डॉक्टरांत होते. अशा एकंदर आठ सुपुत्रांना जन्म देणारी माता खरोखर धन्य होय!


* * *

"हिंदुस्थानचा उद्धार जर कशानें व्हावयाचा असेल तर तो समाजवादानेंच होईल अशी माझी दृढ निष्ठा आहे....पण पाश्चात्य समाजवाद जशाचा तसा आपल्याला लागू पडणार नाहीं....त्याला

नवें स्वरूप द्यावें....'' असें सुभाषबाबू उद्गारतात, तरी 'आधीं स्वातंत्र्य मग समाजसत्तावाद' इतकेंच स्थान ते त्याला देतात.

* * *

विद्यार्थ्यांनीं राजकारणाचा अभ्यास करून त्यांत भाग घ्यावा ह्या मताचे सुभाषबाबू आहेत. त्यांचें म्हणणें असें कीं, विद्यार्थि-दशेपासून जर राजकारणाचा विचार केला नाहीं तर राष्ट्राला विचारवंत कार्यकर्ते व पुढारी कोठून मिळणार ?



# ४. बॅरिस्टर सावरकर

[ त्रोटक जीवन-वृत्तान्त:—बॅ. विनायकराव सावरकर यांचा जन्म इ. स. १८८३ मध्यें झाला. घरची साधारणपणें सुस्थिति असल्यानें



त्यांच्या शिक्षणांत कोणतीच अडचण उपस्थित झाली नाहीं. यांचे वडील दामोदरपंत हे विद्वान् व धार्मिक प्रवृत्तीचे होते, शिवाय ते कवीहि होते. छोट्या विनायकानें आपल्या वडिलांच्या सान्निध्यांत महाकाव्यें व इतिहास यांचें अध्ययन केलें. या अध्ययनाचा बाल-मनावर परिणाम होऊन आपली भरतभूमि पारतंत्र्यापासून मुक्त कशी करावी याचा ध्यास विनायकाला लहानपणापासूनच लागला. समवयस्क मित्र जमवून खेळांतहि लढायांचे खेळ खेळावेत अशी त्याची मनोवृत्ति होऊन बसली. केसरी, पुणें-वैभव, काळ इत्यादि वर्तमानपत्रें वाचून त्याच्या मनानें राष्ट्रसेवेंत आयुष्य खर्चून सत्कारणीं लावावें असें घेतलें व या हेतूनें विनायकानें देवीच्या देवळांत तशी प्रतिज्ञाहि केली. राजकारण समजून घेण्याकडे जरी त्याचें लक्ष होतें तरी आयत्या वेळीं जरूर तेवढें पुस्तकी ज्ञान संपादून ते परीक्षा सहज पास होत. मॅट्रिकच्या परीक्षेनंतर फर्ग्युसनमधून ते बी.ए. च्या परीक्षेला बसले व उत्तीर्ण झाले. फर्ग्युसनमध्यें असतांना संघटना, देशसेवा, व्याख्यानें, कविता रचणें इत्यादि गोष्टी चालतच. लो. टिळक

व 'काळ' कर्ते परांजपे यांच्यासारखे पुढारी मार्गदर्शक म्हणून गुरुस्थानीं असल्यावर जबर उत्साहाच्या व तीव्र तळमळ असणाऱ्या कार्यकर्त्याला कशाची उणीव? थोडक्यांत, सर्व नाशिक भाग व थोड्या प्रमाणांत महाराष्ट्रहि त्यांच्या नांवानें दुमदुमून राहिला. बी.ए. नंतर कायद्याचा अभ्यास करण्याच्या निमित्तानें, पण राष्ट्रीय चळवळ इंग्लंडपर्यंत पोहोंचवावी या प्रमुख हेतूनें, विनायकराव विलायतेस गेले. तेथें गेल्याबरोबर त्यांनीं हिंदी लोकांची संघटना करून व्याख्यानें, पत्रकें, वर्तमानपत्रें इत्यादि साधनांनीं इतकी जागृति केली कीं, हिंदुस्थानांत काय किंवा इंग्लंडमध्यें काय, कोठेंहि अत्याचार झाला कीं त्याचा धागादोरा सावरकरांपर्यंत पोहोंचे. शेवटीं बॅरिस्टरीची परीक्षा पास होऊनहि त्यांना सनद मिळणें कठीण झालें. अर्थात् सावरकरांनींहि त्याची फिकीर केली नाहीं. शेवटीं सावरकरांवर 'क्रांतिकारक' म्हणून आरोप ठेवून सरकारनें खटला भरण्याचें टरविलें व संधि मिळतांच त्यांना अटक करून हिंदुस्थानांत कडक बंदोबस्तानें पाठवून दिलें. तरी मोठ्या धैर्यानें सावरकरांनीं स्वतःची सुटका करून फ्रान्सच्या स्वतंत्र देशांत प्रवेश केला; पण हा प्रयत्न पूर्ण यशस्वी झाला नाहीं. हिंदुस्थानांत आल्यावर त्यांचेवर दोन खटले भरून सरकारनें दोन जन्मठेपींची म्हणजे एकंदर पन्नास वर्षांची सजा दिली. तुरुंगांतहि त्यांनीं शक्य तों कार्य केलेंच. अंदमानांत चौदा वर्षें काढल्यावर सरकारनें त्यांना हिंदुस्थानांत आणून येरवडा व रत्नागिरी येथें सनिर्बंध ठेविलें. पुढें १९३७ मध्यें त्यांची बिनशर्त सुटका होऊन ते पुन्हां मातृभूमीच्या सेवेस लागले. सावरकर सुटतांच सारा हिंदुस्थान हर्षभरित होऊन गेला. काळाच्या जबड्यांत गेलेले सावरकर पुन्हां परत येतांच कोणाचें अंतःकरण उचंबळून येणार नाहीं? हिंदुमहासभेचें धुरीणत्व हल्लीं त्यांच्याकडेच आहे. खुद्द व्हाइसरॉयांनीं हिंदुमहासभेचें धोरण व दृष्टिकोन समजून घेण्याकरितां त्यांना पाचारण केलें होतें.]

---

लहानशा विनायकानें लहानपणींच रामायण, महाभारत इ. पौराणिक ग्रंथांचें वाचन केलें, तसेंच शिवाजीसारख्या स्वातंत्र्या-

साठीं तळमळणाऱ्या अनेक वीरांच्या चरित्रांचेंहि मनन केलें. विनायकाची दृष्टि लहानपणापासूनच फांकलेली होती. ऐतिहासिक वीरांच्या कथा वाचून त्याच्यासारख्यांच्या बालमनावर परिणाम होऊन त्याला विशिष्ट वळण लागल्यास नवल नाहीं.

*   *   *

लहानपणीं विनायकाचा आवडता खेळ म्हणजे लुटुपुटीची लढाई. बरोबरीचे अनेक मित्र जमवावे, त्यांचे तात्पुरते गट तयार करून त्यांना विशिष्ट नांवें द्यावींत आणि लढाईला सुरुवात करावी. लढाई-नंतर पळपुटे, भित्रे, चुकार सवंगडयांना जमवून त्यांच्याशीं खऱ्या सैनिकाच्या किंवा सेनापतीच्या आंगीं असणाऱ्या गुणांची चर्चा होई.

*   *   *

विनायकाचे वडील कवि असल्यामुळें काव्य करण्याची स्फूर्ति विनायकाला लहानपणापासूनच झालेली होती. दुर्गादेवीचें विस्तृत स्तवन त्यानें लहानपणींच रचलें. शीघ्रकवित्वाचें बीज त्याच्यांत लहानपणींच रुजलेलें होतें.

*   *

विनायकाच्या वयाच्या मुलांना जे विचार कधीं येणार नाहींत अशा विचारांनीं विनायकाचें मन भारून जात असे आणि त्याच विचारांत तो नेहमीं गर्क असे. केसरीसारख्या वर्तमानपत्रांतील अग्रलेखांचें पारायण करण्यांत तो गुंग होऊन जाई. राजकारणाचा अभ्यास करून हिंदुस्थानला स्वातंत्र्य कधीं मिळेल याचीच त्याला तळमळ लागे. या वेळीं त्याचें वय सारें चौदा वर्षांचें होतें.

*   *   *

भगूर गांवच्या देवीच्या देवळांत जाऊन विनायकानें भावनावश अशा लहान वयाला अनुसरून देवीसमोर 'स्वातंत्र्याच्या झगड्यांत

वेळीं प्राणार्पणहि करीन' अशी प्रतिज्ञा केली. 'मुलाचे पाय पाळ-ण्यांत दिसतात' ही म्हण सावरकरांचे बाबतींत पूर्ण लागू पडते.

* * *

लो. टिळकांनीं सुरू केलेल्या गणेशोत्सवाचें व वीरांच्या जयन्तीचें मर्म ओळखून विनायकानेंहि आपल्या गांवांत इतर मित्रांच्या साहाय्यानें श्रीगणेशोत्सव व शिवाजी-जयन्ति यांची प्रथा पाडली. समयाला अनुसरून अनेक स्तवनें व पोवाडे त्यानें या काळांत रचलेले आहेत. त्याच्या काव्यानें कोणीहि आज मोहित होऊन जाईल यांत शंका नाहीं.

* * *

अगदीं लहान वयांतच सावरकरांनीं आपल्या सार्वजनिक कार्यास सुरुवात केली. उत्सवप्रसंगीं व्याख्यानें देणें, मेळे काढणें, मेळ्यां-करितां पदें रचणें, वर्तमानपत्रांत लेख लिहिणें, स्वदेशी चळवळींत पुढाकार घेणें इ. अनेक चळवळींत सावरकर मातृभूमीची अनन्यभावें सेवा करण्याच्या हेतूनें प्रामुख्यानें भाग घेत. लोकांनाहि सावर-करांच्या धडाडीबद्दल अतिशय कौतुक वाटे.

* * *

शाळेंतील कोणत्याच परीक्षेंत सावरकरांना अपयश माहीत नाहीं. अविश्रांत वाचन करून त्यांनीं ज्ञानार्जन केलें. जगांतील कोणत्याहि देशाचा इतिहास वाचावयाचा त्यांनीं शिल्लक ठेविला नाहीं. शिवाय मोरोपंत, वामनपंडित, रामदास इ. कवींचीं काव्यें त्यांनीं अभ्यासिलीं.

* * *

मॅट्रिक झाल्यानंतर सावरकरांनीं फर्ग्युसनमध्यें नांव दाखल केलें. कॉलेजांत देखील त्यांच्या सार्वजनिक कार्याला भरतीच येत गेली! कॉलेजांतील सर्व अध्यापकांचें सावरकरांच्या चळवळींवर

विशेष लक्ष असे. प्रा. वा. ब. पटवर्धन सावरकरांसंबंधीं नेहमीं म्हणत, 'He is bound to be a great demagogue.'

*  *  *

कॉलेजांत असतांच सावरकरांनीं परदेशी कपड्यांची प्रचंड होळी केली. कोणा एका पुढाऱ्यानें म्हटलें, " ही होळी म्हणजे अर्थशास्त्राच्या दृष्टीनें मोठा तोटा आहे. " त्यावर सावरकर तात्काळ उत्तरले, " पण मानसशास्त्रदृष्ट्या हा मोठा लाभ आहे." विलायती कपड्यांची हीच पहिली मोठी होळी ! आणि हां होळी सर्व वर्तमानपत्रांतून गाजली.

*  *  *

कायद्याचा अभ्यास करण्याकरितां विनायकराव सावरकरांनीं एक शिष्यवृत्ति मिळवून विलायतेस जाण्याची तयारी केली; जाण्यापूर्वीं त्यांनीं आपल्या कार्यकर्त्यांच्या संस्थेचें नांव 'अभिनव भारत' असें ठेविलें. या वेळीं त्यांचें वय अवघें बावीस वर्षांचें होतें.

*  *

बोटीवर असतांना त्यांच्याच वयाच्या एका हिंदु इसमाची त्यांच्याशीं ओळख झाली. पण तो इसम जरा हळव्या मनाचा असल्यानें, त्याला वरचेवर घरच्या माणसांची व आईची आठवण होई. शेवटीं त्यानें एडनहून परत फिरण्याचा बेत सावरकरांच्या जवळ बोलून दाखविला. सावरकरांनीं त्याची निरनिराळ्या तऱ्हेनें समजूत घालून म्हटलें, " ... आपल्या आयांची आई जी देशमाता तिची इच्छा काय आहे हेंहि नको कां बघायला ?..." इंग्लंडमध्यें गेल्यावर सावरकरांनीं तेथें सुद्धां 'Free India Society' ही संस्था स्थापून साप्ताहिक व्याख्यानाला सर्व हिंदी लोकांना मोकळीक ठेविली.

इंग्लंडचें लक्ष व जगाचें लक्ष हिंदुस्थानकडे लागावें या हेतूनें त्यांनीं अनेक चळवळी चालविल्या.

* * *

इटलीचा स्वातंत्र्यवीर जोसेफ मॅझिनी याच्या आत्मचरित्राचें मराठी भाषांतर सावरकरांनीं केलें. या ‘ सावरकरांच्या मॅझिनी ’ चें सर्वत्र स्वागत झालें, पण सरकारनें तें पुढें जप्त केलें. तसेंच ‘ स्वातंत्र्ययुद्धाचा इतिहास ’ हें पुस्तक छापण्यापूर्वींच त्याची हस्त-लिखित प्रत जप्त करण्यांत आली. साऱ्या जगांत अशा तऱ्हेचा मान सावरकरांच्या पुस्तकाला मिळाला ! मराठींत जरी हें पुस्तक प्रसिद्ध होऊं शकलें नाहीं तरी त्याचें इंग्रजी भाषांतर मात्र सर्रास प्रसिद्ध होऊन प्रसृत झालें. द. अमेरिकेंत एकदां या पुस्तकाच्या एका प्रतीची दीडशें रुपये किंमत आली !

* * *

सावरकरांच्या कार्याचा इंग्लंडमध्यें इतका बोलबाला झाला कीं, विलायती वर्तमानपत्रांच्या वार्ताहरांना त्यांची भेट घेऊन मुलाखती व त्यांचीं वर्णनें प्रसिद्ध करण्याचें जणूं वेड लागून गेलें ! एका प्रसिद्ध वर्तमानपत्राच्या बातमीदारानें त्यांच्याकडे जाऊन त्यांनाच विचारलें कीं, “ सावरकर कोठें आहेत, त्यांना मला भेटावयाचें आहे.” सावरकरांनीं “ ज्याला सावरकर म्हणतात तो मीच.” असें सांगि-तल्यावर तो इसम अगदीं आश्चर्यचकित झाला व म्हणाला, “खरेंच कां ? आमची आपल्या वयोमानाची व आकाराविषयींची कल्पना अगदीं उलट होती. आमचें वृत्तपत्र आपल्यासारख्या मिसूरहि पुरती न फुटलेल्या गृहस्थाचा इतके दिवस इतका प्रतिरोध करीत आहे हें आम्हांस ठाऊक नव्हतें !” यावर सावरकर शांतपणें

उत्तरले, “ आतां ठाऊक झाल्यावर विरोध करण्याचें सोडून दिलेंत म्हणजे झालें!”

*　　　*　　　*

हिंदुस्थानसंबंधीं खरी वस्तुस्थिति जगांतील इतर देशांना पूर्णपणें कळावी म्हणून सावरकरांनीं लेख लिहून त्यांचीं भाषांतरें फ्रेंच, पोर्तुगीज, चायनीज, रशियन, आयरिश इत्यादि भाषांत करवून घेऊन त्या त्या भाषेच्या वर्तमानपत्रांत तीं ते प्रसिद्ध करीत. हें कार्य सतत तीन वर्षे चालू होतें.

*　　　*　　　*

विलायतेंत असतांना सावरकरांना हिंदुस्थानांत त्यांच्या भावांवर व भावजयीवर आकाश कोसळल्याच्या बातम्या ऐकूं येत, पण ‘ बुद्धयाचि वाण धरिलें करिं हें सतीचें ’ असे म्हणणारे सावरकर निरुत्साही कधींच झाले नाहींत. उलट आपल्या भावजयीला लिहिलेल्या काव्यरूप पत्रांत ते गहिंवरून पण कुशलतेनें म्हणतात:—

*　　　*　　　*

“....अनेक फुलें फुलतीं । फुलोनिया सुकोनि जातीं ॥
कोणी त्यांची महती गणती । ठेविली असे ॥
परि जें गजेन्द्र-शुंडेनें उपटिलें । श्रीहरीसाठीं मेलें ॥
कमल फूल तें अमर ठेलें । मोक्षदायी पावन ॥
अशींच सर्व फुलें खुडावीं । श्रीरामचरणीं अर्पण व्हावीं ॥
कांहीं सार्थकता घडावी । या नश्वर देहाची ॥
अमर होय ती वंशलता । निर्वंश जीचा देवाकरितां ॥
दिगन्तीं पसरे सुगंधता । लोकहित-परिमलाची ॥....”

*　　　*　　　*

विनायकराव सावरकर बॅरिस्टरीची परीक्षा पास झाले; पण त्यांचेवर खटला भरला असल्यानें त्यांना सनद द्यावी कीं नाहीं

असा प्रश्न उद्भवला. शेवटीं सावरकरांना असें कळविण्यांत आलें कीं, त्यांनीं राजद्रोह करणार नाहीं असें लिहून दिल्यास त्यांना सनद देण्यांत येईल. यावर सावरकर म्हणाले, "मीं राजद्रोह केला, तर सरकारचीं कोर्टें माझी चवकशी करून मला तुरुंगांत डांबतीलच!" असें म्हणून त्यांनीं लिहून देण्याचें अर्थात् नाकारलेंच. बॅरिस्टरीची परीक्षा उतरून सनद न घेणारे पहिले वीर सावरकरच!

* * *

लंडनमध्यें मदनलाल धिंग्रा या तरुणावर खुनाचा आरोप ठेविला गेला. या कृत्याचा निषेध म्हणून जाहीर सभा भरली. खुनाचा आरोप शाबीत होऊन त्याला शिक्षा व्हावयाच्या आधींच घाई करूं नये, असें सावरकरांचें म्हणणें होतें; पण ही सूचना नापसंत होऊन ठराव एकमतानें पास झाला, असें जाहीर करण्याच्या अगोदर सावरकरांनीं एकटयानें विरोध केला. हा विरोध सहन न होऊन सभेंत एकच दंगल माजली. एका युरेजियनानें ठोसा दिल्यानें सावरकरांच्या नाकांतून रक्त वाहूं लागलें, व कांहीं काळ ते बेशुद्धहि पडले. शुद्धीवर आल्यावर "तरीहि माझें मत ठरावाविरुद्ध आहे" असें त्यांनीं ठासून सांगितलें. दुसरे दिवशीं सावरकरांनीं 'टाइम्स'मध्यें आपल्या धोरणाचा खुलासा केला. कित्येक पत्रांनीं सावरकरांचें वर्तन समर्थनीय ठरविलें. खुद्द सुरेंद्रनाथ बानर्जींनीं सावरकरांचें म्हणणें न्याय्य गणलें.

* * *

सावरकर संपादीत असलेलें 'तलवार' हें इंग्रजी साप्ताहिक लंडनमध्यें छापायला कोणीच तयार होईना; म्हणून तें पॅरिसमध्यें छापून प्रसिद्ध होई, आणि इतरत्र प्रसृत होई.

पॅरिसमध्यें गेल्यावर सावरकरांचें वास्तव्य सुविद्य पारशी स्त्री कामाबाई यांच्या घरीं असे. या बाईंनीं हिंदुस्थानकरितां तिरंगी सुंदर ध्वज तयार करून प्रथम तो जर्मनींत समाजवाद्यांच्या प्रचंड सभेंत हिंदुस्थानचा राष्ट्रीय ध्वज म्हणून फडकविला. साऱ्या सभेनें त्यास आदरानें अभिवादन केलें.

* * *

लंडनमध्यें अटक झाल्यावर सावरकरांना पुढील भीषण परिणाम दिसूं लागला आणि त्यांनीं आपल्या भावजयीला 'माझें मृत्युपत्र' म्हणून हृदयंगम काव्य करून पत्र धाडलें. त्यांतील एक ओळ, 'धर्मार्थ देह वदलों ठरलें नितांत। तो बोल फोल नचि बालिश बायकांत॥ ''

* * *

अतिशय कडक बंदोबस्तांत सावरकरांना हिंदुस्थानला पाठविण्याची व्यवस्था झाली. नेहमींचा मार्ग बदलून बोट बिस्केच्या उपसागरांतून मार्सेलिसला थांबली. सावरकरांनीं मनांत निश्चित ठरविलें कीं, सुटून जावयाची संधि मिळाली तर ती हीच, म्हणून मनांत ते अतिशय धडपड करीत होते. शौचकूपांतच त्यांना थोडी मोकळीक मिळे. याचा फायदा घेण्याचें ठरवून सूर्योदयापूर्वींच पहारेवाल्या शिपायास "शौचास घेऊन चल" म्हणून त्यांनीं इशारत दिली. शिपायानें अधिकाऱ्यास उठवून ते दोघे सावरकरांबरोबर शौचकूपापर्यंत गेले. आंतील इसम काय करतो हें दिसावें म्हणून समोर आरशाची व्यवस्था केलेली होती. शौचकूपाच्या वरच्या बाजूस 'पोर्ट होल' म्हणजे एक वाटोळी खिडकी होती. तिचें मोजमाप त्यांनीं आधींच अंदाजून ठेविलें होतें. शौचास येतांना हेतुपूर्वक घातलेला लांब अंगरखा समोरच्या दारावर टाकून वरच्या

असा प्रश्न उद्भवला. शेवटीं सावरकरांना असें कळविण्यांत आलें कीं, त्यांनीं राजद्रोह करणार नाहीं असें लिहून दिल्यास त्यांना सनद देण्यांत येईल. यावर सावरकर म्हणाले, " मीं राजद्रोह केला, तर सरकारचीं कोर्टें माझी चवकशी करून मला तुरुंगांत डांबतीलच !" असें म्हणून त्यांनीं लिहून देण्याचें अर्थात् नाकारलेंच. बॅरिस्टरीची परीक्षा उतरून सनद न घेणारे पहिले वीर सावरकरच !

* * *

लंडनमध्यें मदनलाल धिंग्रा या तरुणावर खुनाचा आरोप ठेविला गेला. या कृत्याचा निषेध म्हणून जाहीर सभा भरली. खुनाचा आरोप शाबीत होऊन त्याला शिक्षा व्हावयाच्या आधींच घाई करूं नये, असें सावरकरांचें म्हणणें होतें; पण ही सूचना नापसंत होऊन ठराव एकमतानें पास झाला, असें जाहीर करण्याच्या अगोदर सावरकरांनीं एकटयानें विरोध केला. हा विरोध सहन न होऊन सभेंत एकच दंगल माजली. एका युरेजियनानें ठोसा दिल्यानें सावरकरांच्या नाकांतून रक्त वाहूं लागलें, व कांहीं काळ ते बेशुद्धहि पडले. शुद्धीवर आल्यावर "तरीहि माझें मत ठरावाविरुद्ध आहे" असें त्यांनीं ठासून सांगितलें. दुसरे दिवशीं सावरकरांनीं 'टाइम्स'मध्यें आपल्या धोरणाचा खुलासा केला. कित्येक पत्रांनीं सावरकरांचें वर्तन समर्थनीय ठरविलें. खुद्द सुरेंद्रनाथ बानर्जींनीं सावरकरांचें म्हणणें न्याय्य गणलें.

* * *

सावरकर संपादीत असलेलें 'तलवार' हें इंग्रजी साप्ताहिक लंडनमध्यें छापायला कोणीच तयार होईना; म्हणून तें पॅरिसमध्यें छापून प्रसिद्ध होई, आणि इतरत्र प्रसृत होई.

* * *

पॅरिसमध्यें गेल्यावर सावरकरांचें वास्तव्य सुविद्य पारशी स्त्री कामाबाई यांच्या घरीं असे. या बाईंनीं हिंदुस्थानकरितां तिरंगी सुंदर ध्वज तयार करून प्रथम तो जर्मनींत समाजवाद्यांच्या प्रचंड सभेंत हिंदुस्थानचा राष्ट्रीय ध्वज म्हणून फडकविला. साऱ्या सभेनें त्यास आदरानें अभिवादन केलें.

* * *

लंडनमध्यें अटक झाल्यावर सावरकरांना पुढील भीषण परिणाम दिसूं लागला आणि त्यांनीं आपल्या भावजयीला ' माझें मृत्युपत्र ' म्हणून हृदयंगम काव्य करून पत्र धाडलें. त्यांतील एक ओळ, ' धर्मार्थ देह वदलों ठरलें नितांत । तो बोल फोल नचि बालिश बायकांत ॥ "

* * *

अतिशय कडक बंदोबस्तांत सावरकरांना हिंदुस्थानला पाठविण्याची व्यवस्था झाली. नेहमींचा मार्ग बदलून बोट बिस्केच्या उपसागरांतून मार्सेलिसला थांबली. सावरकरांनीं मनांत निश्चित ठरविलें कीं, सुटून जावयाची संधि मिळाली तर ती हीच, म्हणून मनांत ते अतिशय धडपड करीत होते. शौचकूपांतच त्यांना थोडी मोकळीक मिळे. याचा फायदा घेण्याचें ठरवून सूर्योदयापूर्वींच पहारेवाल्या शिपायास " शौचास घेऊन चल " म्हणून त्यांनीं इशारत दिली. शिपायानें अधिकाऱ्यास उठवून ते दोघे सावरकरांबरोबर शौचकूपापर्यंत गेले. आंतील इसम काय करतो हें दिसावें म्हणून समोर आरशाची व्यवस्था केलेली होती. शौचकूपाच्या वरच्या बाजूस ' पोर्ट होल ' म्हणजे एक वाटोळी खिडकी होती. तिचें मोजमाप त्यांनीं आधींच अंदाजून ठेविलें होतें. शौचास येतांना हेतुपूर्वक घातलेला लांब अंगरखा समोरच्या दारावर टाकून वरच्या

खिडकीशीं थोडी दंगामस्ती करून आपलें सर्व अंग बाहेर काढून घेऊन त्यांनीं **समुद्रांत उडी ठोकली.** झालें ! पहारेकऱ्यानें आरडा-ओरड केल्यामुळें सगळे लोक जागे झाले ! समुद्रांत गोळ्या झाडण्यांत आल्या; पण सावरकर सावधानानें मधून मधून डुब्या मारून फ्रान्सच्या किनाऱ्याच्या तटास लागले. तट चढून फ्रेंच पोलिसच्या शोधार्थ ते धांवूं लागले. मागाहून पोलिसहि पाठलाग करीत होतेच. शेवटीं फ्रेंच पोलिस मिळाला, पण सावरकरांच्या म्हणण्यावर त्याचा विश्वास बसेना किंवा कांहीं कारणांनीं तो विश्वास ठेवीना. सरते-शेवटीं ब्रि. पोलिसांनीं सावरकरांना खेचून परत बोटीवर आणलें ! सावरकरांच्या मनोराज्याच्या ठिकऱ्या उडाल्या ! !

* * *

नाशिकास आल्यावर कडक बंदोबस्तांत असूनहि एक वर्तमान-पत्र त्यांच्या हातांत पडलेंच ! त्यांत फ्रान्सनें सावरकरांची मागणी केलेली होती इ. मजकूर त्यांना पाहावयास मिळाला. आपल्या कृतीमुळें सारें जग खडबडून जागें झालें, यांतच त्यांच्या मनाचें समाधान झालें.

* * *

सरकारनें खटला सुरू केल्यावर सावरकरांनीं ब्रिटिश कोर्टाला खटला चालवायला अधिकार नाहीं असें म्हणून त्यांनीं त्यांत भाग घेण्याचें अजिबात नाकारलें. न्यायाधिशानें दोन खटल्यांबद्दल मिळून दोन जन्मठेपींच्या शिक्षा सांगून त्यांची अंदमानांत रवानगी केली !

* * *

तुरुंगांत असतांनाहि बॅरिस्टर सावरकरांनीं अनेक लोकांना साक्षर व सुशिक्षित केलें. शेंकडा ७३ लोक सावरकरांमुळें शिक्षित झाल्याचें तुरुंगाच्या अधिकाऱ्यांचें म्हणणें आहे !

* * *


सरकारनें सावरकरांना अंदमानांतून आणून कांहीं दिवस येरवड्याच्या तुरुंगांत व नंतर रत्नागिरीस स्थानबद्ध केलें होतें. शेवटीं १९३७ च्या मे महिन्यांत म्हणजे लोकशाही मंत्रिमंडळ सत्ताधीश होतें तेव्हां बॅ. जम्नादास मेहेता यांच्या खटपटीमुळें बॅ. सावरकर हे बिनशर्त मोकळे झाले! दोन जन्मठेपींची शिक्षा झालेले सावरकर मुक्त झाल्यावर प्रत्येक हिंदूचें अंतःकरण आनंदातिशयानें भरून आलें; आणि त्यांचे कित्येक सत्कार-समारंभ झाले. महाराष्ट्राच्या वतीनें त्यांना मानपत्र व बारा हजार रुपयांची थैली अर्पण करण्यांत आली.

* * *

सावरकरांनीं मातृभूमीची सेवा विविध तऱ्हेनें केली. त्यांच्या कार्याची दिशा:—स्पृश्यास्पृश्य भेदाला मूठमाती; सहभोजनाचा प्रचार; शुद्धीकरणास प्रोत्साहन व सक्रिय सहानुभूति; लिपी व भाषाशुद्धीची चळवळ; स्वदेशी व्रताचा पुरस्कार; हिंदूंच्या हिंदुत्वाचे रक्षणाविषयीं तत्परता.

* * *

हिंदुजनतेनें त्यांना लागोपाठ तीनदां अध्यक्षपद देऊन त्यांचा गौरवच केला. सावरकरहि स्वातंत्र्याच्या लढ्यांत हिंदुस्थानचें पुढें पाऊल कसें पडेल याकरितां अहोरात्र झटत आहेत.



# ५. इमॉन डी व्हॅलेरा

[ **त्रोटक जीवन-वृत्तान्तः**—इमॉन डी व्हॅलेरा याचा जन्म १८८२ मध्यें अमेरिकेंतील न्यूयॉर्क शहरीं झाला. याचे वडील अमेरिकेंत येऊन राहिले होते. हे मूळचे स्पेनचे रहिवाशी. यांचा प्रमुख धंदा चित्रकाराचा, पण संगीताचाहि अभ्यास त्यांनीं केला होता. याची आई मात्र अस्सल आयरिश रक्ताची होती. सौंदर्या-बद्दल हिची विशेष ख्याति होती. वडील लवकर निवर्तल्या-मुळें डी व्हॅलेराचें संगोपन व शिक्षण यांची सर्व जबाबदारी त्याच्या आईवर पडली; व तिनें आपल्या भावाच्या मदतीनें मुलाचें सर्व शिक्षण केलें. डी व्हॅलेरा हा चलाख मुलगा असून



त्याची तरतरीत बुद्धि त्याच्या शिक्षकांच्या नजरेस आल्याशिवाय राहिली नाहीं. त्याचा गणित हा अत्यंत आवडीचा विषय. बी.ए.ची परीक्षा उतरल्यानंतर त्यानें कांहीं वर्षे प्राध्यापकाचें काम केलें. पुढें त्यानें आयरिश भाषेचा अभ्यास जोरानें सुरू केला. अभ्यास करीत असतांनाच त्याची कुमारी सिनिड हिच्याशीं ओळख झाली; या ओळखीचें रूपांतर नंतर लग्नांत झालें. १९१३ मध्यें आयर्लंडनें स्वातंत्र्य मिळविण्याच्या हेतूनें स्वयंसेवकांचीं पथकें उभारलीं. डी व्हॅलेरानें आपलें नांव या पथकांत नोंदवून आपल्या राजकीय आयुष्यास सुरुवात केली.

पथकाच्या व सरकारी सैन्याच्या अनेक वेळां चकमकी झाल्या, व पथकांचा पराभव होऊन डी व्हॅलेराला कारावास पत्करावा लागला. तुरुंगांतून सुटका झाल्यावर त्यानें आयरिश स्वातंत्र्याचा झगडा जोरानें सुरू केला. त्याची बुद्धिमत्ता, धडाडी, स्वार्थत्याग इत्यादि गुणांनीं तो विशेष लोकप्रिय झाला. आणि लवकरच तो सिनफेन पक्षाचा अध्यक्ष झाल्यामुळें सर्व राजकीय चळवळींचीं सूत्रें त्याच्या हातांत गेलीं. पुढें आयर्लंडमध्यें लोकजागृतीचें कार्य करून इतर राष्ट्रांची सहानुभूति संपादन करण्याकरितां डी व्हॅलेरानें अमेरिकेस प्रयाण केलें. तेथें त्याचें अपूर्व स्वागत झालें; त्यामुळें आयर्लंडमधील चळवळींना विशेष जोर चढला. इंग्लंडमधील मुत्सद्द्यांनाहि आयर्लंडचा प्रश्न तातडीनें घेऊन सोडवावा असें वाटूं लागलें. इंग्लंडचे मुख्य प्रधान लॉइड जॉर्ज व आयर्लंडचा सूत्रधार डी व्हॅलेरा यांच्यांत बराच पत्रव्यवहार झाला. शेवटीं इंग्लंडनें मुत्सद्देगिरीनें आयर्लंडशीं तह केला. पण हा तह डी व्हॅलेराला मुळींच पसंत पडला नाहीं. शेवटीं लोकपक्षांत दुही माजून अपमानकारक तह डेल आयरेननें मान्य केला. डी व्हॅलेराच्या लोकप्रियतेला येथून कांहीं काळपर्यंत ओहोटी लागली. बंडें, तुरुंगवास, अज्ञातवास यांतच त्याचा पुष्कळ काळ निघून गेला. उत्कर्षाची ही घसरगुंडी सुदैवेंकरून कांहीं वर्षांनीं थांबली. १९३२ सालीं डी व्हॅलेरा हा पुन्हां 'डेल आयरेन'चा अध्यक्ष झाला. पुढें लगेच त्याला राष्ट्र-संघाच्या समितीच्या अध्यक्षपदाचा मान मिळाला. येथेंहि त्यानें प्रभावी वक्तृत्वाची जाणीव इतर राष्ट्रांना करून दिली.

आपल्या मातृभूमीची निःस्वार्थबुद्धीनें, पूर्ण स्वातंत्र्याचें उच्च ध्येय दृष्टीपुढें ठेवून, जी सेवा डी व्हॅलेरानें आरंभिली ती अद्यापपावेतों अविरत चालूच आहे. ]

---

डी व्हॅलेराची बुद्धि लहानपणापासूनच तरतरीत होती; व हा मुलगा पुढें निःसंशय नांव काढील अशीं चिन्हेंहि स्पष्ट दिसत होतीं. स्वतःच्या वर्गाचा अभ्यास तर तो सांभाळीच, शिवाय वरच्या

वर्गांतहि जाऊन बसून तेथील शिक्षक काय सांगतात तें मन लावून ऐके. कोठलाहि विषय नीट कळवून घेण्याकडे त्याच्या मनाचा कल असे. गणित हा त्याचा आवडता विषय; आणि या विषयाची प्रगति त्यानें इतकी केली कीं, वरच्या वर्गांना गणित शिकविण्याचें काम कित्येक वेळां त्याचेकडे सोंपविण्यांत येई !

* * *

डी व्हॅलेराला वाचण्याचा नाद अतोनात असे. जेवतांना देखील तो पुस्तक पुढें ठेवून जेवी ! 'तीन शिलेदार' ही कादंबरी त्याच्या विशेष आवडीची; त्यांतील अनेक प्रकरणें त्यानें मुखोद्गत केलीं होतीं. त्याच्या वाचनांत आलेले उत्तम उतारे अनेक वेळां तो मोठ्यानें वाची किंवा पाठ म्हणे.

* * *

भरपूर अभ्यासाबरोबरच भरपूर खेळहि तो खेळे. खेळाच्या भरांत त्याला वेळेचें किंवा सांगितलेल्या कामाचें भानहि राहत नसे. अभ्यासाच्या वेळीं एकाग्र चित्तानें अभ्यास करावा व खेळाचे वेळीं खेळाशिवाय दुसऱ्या कोणत्याच गोष्टींत मन जाऊं नये असें त्याचें धोरण असे.

* * *

डी व्हॅलेराला वेळ फुकट दवडणें माहितच नाहीं. शाळेंतून घरीं जातांना स्टेशनवर थांबण्याचा प्रसंग आला तर तो आपल्या घराकडे पायीं चालूं लागे ! "सर्वांत निंद्य उधळेपणा कोणता असेल तर मनुष्यानें आपला वेळ फुकट दवडणें हा होय" हें व्हॉल्टेअरचें वाक्य त्याचें एक ब्रीदवाक्य होतें, असें म्हणावयाला हरकत नाहीं.

* * *

कॉलेजांत गेल्यावर डी व्हॅलेरांनीं कसून अभ्यास करून अपूर्व यश संपादिलें. आपला अभ्यास संभाळून कॉलेजच्या कांहीं वर्गांत ते शिकवीत. अभ्यासक्रम पुरा झाल्यावर गणित व पदार्थविज्ञान-शास्त्र या विषयांच्या प्राध्यापकाची जागा कॉलेजच्या अधिकाऱ्यांनीं त्यांना दिली.

* * *

प्राध्यापक डी व्हॅलेरा हे आपल्या अंगच्या गुणांनीं व शिकविण्याच्या हातोटीनें लवकरच विद्यार्थि-प्रिय झाले.

* * *

प्राध्यापक असतांना त्यांना शिकारीचा विलक्षण नाद लागला. हातांत एकसारखी बंदुक खेळत राहिल्यानें ते बंदुकीच्या सर्व भागांचें सूक्ष्म निरीक्षण करीत. पुढें पुढें ते असेंहि म्हणत कीं, " बंदुकीइतकी दुसरी कोणतीच वस्तु मला विशेष प्रिय नाहीं. मी शिपाई होणार कीं काय कोण जाणे ! "

* * *

डी व्हॅलेरा व त्यांची भावी पत्नी या दोघांची गांठ प्रथम आयरिश भाषा शिकण्याच्या वर्गांत पडली. डी व्हॅलेरा यांना ग्रीक, लॅटिन, फ्रेंच, जर्मन या भाषा पूर्ण अवगत होत्या आणि कुमारी सिनिड नी फ्लॅनागेन या आयरिश भाषेंत निष्णात होत्या. आयरिश भाषा हस्तगत करून घेण्यांत डी व्हॅलेरा यांना कुमारी सिनिड यांची चांगलीच मदत होई, व डी व्हॅलेरा त्यांना जर्मन भाषा शिकवीत. अशा रीतीनें दोघांचें संघटन वाढत जाऊन त्याचें रूपांतर प्रेमांत होऊन लवकरच दोघें विवाहबद्ध झालीं.

* * *

डी व्हॅलेरा हे एकदां स्वयंसेवकांची कवाईत घेत असतां सरकारनें टेहळणी करण्यास पाठविलेले एक लॉर्ड हे त्या ठिकाणीं

आले व स्वयंसेवकांची रांग ओलांडण्याचा प्रयत्न करूं लागले. लागलीच डी व्हॅलेरांनीं त्यांना पुढील शब्दांनीं हटकलें, " सरकारी सैन्य रस्त्यानें जात असतां जशी सर्व लोकांना रस्ता ओलांडण्याची मनाई असते त्याचप्रमाणें ह्याहि ठिकाणीं मनाई आहे." सैन्याच्या शिस्तीपुढें गरीब व श्रीमंत सर्व सारखेच ! त्यांच्या बुद्धीची चमक रणक्षेत्रावरहि दिसून आली.

*　　　*　　　*

आयर्लंडांत बंडाचें निशाण उभारल्यावर झालेल्या पहिल्याच चकमकींत डी व्हॅलेरा कैद झाले व त्यांना झालेली देहांत शिक्षा पुढें जन्मठेपेची करण्यांत आली. पण राजकीय वातावरण निवळल्यामुळें डी व्हलेरा यांची सुटका लवकरच झाली. शरण येतांना देखील त्यांनीं सरकारी अधिकाऱ्यांस पुढील शब्दांत बजावलें, " मला तुम्ही वाटेल तर गोळी घालून ठार करा; पण माझ्या सैनिकांना मात्र धक्का लागतां कामा नये. "

*　　　*　　　*

' सिनफेन ' हें एका पंथाचें नांव आहे. याचा अर्थ ' आमचें आम्ही पाहून घेऊं, इतरांची लुडबुड नको. ' हा पंथ प्रथमतः शांततेनें राष्ट्राची सेवा करून त्याच्या उत्कर्षाबद्दल झटणारा असा होता. स्वदेश, स्वभाषा व स्वधर्म यांचें संरक्षण करणें हें मुख्य ध्येय या पक्षानें आपल्या डोळ्यांपुढें ठेविलें होतें. पण पुढें क्रांतिकारक चळवळी शस्त्राच्या जोरावर चालविण्याकडे या पक्षाचा कल झुकूं लागला.

*　　　*　　　*

सिनफेन पक्षाचें अध्यक्षपद डी व्हॅलेरा यांनीं आपल्या अंगभूत गुणांनींच मिळविलें. डी व्हॅलेरा हे त्या पक्षाचे अध्यक्ष व नेते झाल्यामुळें सरकारचा त्यांच्यावरील रोष विशेषच वाढत गेला.

*　　　*　　　*

डी व्हॅलेरांनीं एका प्रसंगीं काढलेले पुढील उद्गार विशेष मननीय आहेत, "सरकारनें मला पकडावें म्हणून कांहीं लोक भगीरथ प्रयत्न करतात; पण मला एकट्याला तुरुंगांत डांबून काय होणार? मी गेलों तर माझ्यासारखे आणखी दहा लोक तयार होतील, आणि त्यांची जागा भरून काढण्यास आणखी दहा लोक पुढें सरसावतील."

* * *

डी व्हॅलेरा यांना रात्रीं पकडून लिंकनच्या तुरुंगांत ठेवण्यांत आलें. लोकांनीं सभा भरवून सरकारचा निषेध करून डी व्हॅलेरांच्या सुटकेची मागणी जोरानें सुरू केली. सरकार त्यांच्या मुक्ततेविषयीं कांहींच बोलेना. डी व्हॅलेरांनीं मात्र आपल्या सुटकेची मोठ्या कौशल्यानें साहसी तयारी चालविली होती. कडेकोट बंदोबस्त असतांनाहि शेवटीं पिंजऱ्यांतील पक्षी उडून गेला! डी व्हॅलेरांच्या सुटकेबद्दल लोकांत मात्र पुष्कळच कुतूहल उत्पन्न झालें. लोकांचा आनंद गगनांत मावेनासा झाला. सरकार मात्र क्रोधानें मनांत चरफडत राहिलें. डी व्हॅलेरा सुटले कसे? हें एक गूढच सर्व लोकांना वाटत होतें.

* * *

अनेक वृत्तपत्रकारांना डी व्हॅलेरांची मुलाखत मिळण्याची अतिशय उत्कंठा लागून राहिली; पण त्याचा सुगावा सरकारला लागूं नये म्हणून अतिशय काळजी घ्यावी लागे. पुढें पुढें त्यांच्या मुलाखती रात्रीं होऊं लागल्या. 'डेली क्रॉनिकल' या पत्राचा बातमीदार असें लिहितो कीं, "ती मध्यरात्रीची वेळ होती. चहूंकडे दाट अंधार पसरलेला होता. मला एका मोटारींत बसवून मोटार अतिशय वेगांत सोडली, वेडींवांकडीं वळणें घेऊन मोटार थांबली व मला डी व्हॅलेरांचें दर्शन घडविलें."

* * *

१९१८ च्या निवडणुकींत डी व्हॅलेरांचा सिनफेन पक्ष प्रचंड बहुमतानें निवडून आला. डी व्हॅलेरा अज्ञातवासांत असतांना लोकांनीं त्यांची निवडणूक लढविली व ती यशस्वी केली. अनुकूल परिस्थिति पाहून डी व्हॅलेरा प्रगट झाले. आपल्या पक्षाची शक्ति व पाठबळ ओळखून त्यांनीं 'डेल आयरेन' ची सभा बोलावून, त्यांनीं 'आयरिश स्वातंत्र्याचा जाहिरनामा' प्रसिद्ध केला. यामुळें आयर्लंडचा कारभार पूर्णपणें आयरिश लोकांच्याच ताब्यांत आला, असा लोकांचा समज होई. या जाहिरनाम्याला पुढें विशेष महत्त्व प्राप्त झालें. यामुळेंच अमेरिकेंत डी व्हॅलेरांना चळवळ सुरू करतां आली; व ब्रिटिश मुख्य प्रधान लॉइड जॉर्ज यानें आपण होऊन डी व्हॅलेरांशीं विचारविनिमय करण्याची तयारी दर्शविली.

* * *

जाहिरनाम्यांतील पुढील उद्गार पहा—"आयर्लंडमध्यें परक्या लोकांनीं सत्ता चालविणें म्हणजे आमच्या मूलभूत हक्कांवर गदा आणण्यासारखें आहे व ही सत्ता आम्हांला केंव्हांहि सहन करतां येणार नाहीं. इंग्रज लष्करनें आमचा देश तात्काल सोडून जावें असें आम्ही बजावतों."

* * *

डी व्हॅलेरांनीं अमेरिकेंत जाऊन तेथील लोकमत तयार करण्याचें बिकट काम मोठ्या उत्साहानें पार पाडलें. अमेरिकेंत त्यांचें अपूर्व स्वागत झालें. कित्येक विश्वविद्यालयांनीं त्यांना मानाच्या पदव्या अर्पण केल्या. "हा सर्व सन्मान माझा नसून माझ्या देशाचा आहे, असें मी समजतों," अशा तऱ्हेचे उद्गार त्यांनीं अनेक वेळां काढलेले आहेत. अमेरिकेच्या कांहीं वर्तमानपत्रांनीं तर डी व्हॅलेरा यांना कशास कांहीं पत्ता नसतांना 'लोकसत्ताक आयर्लंडचे अध्यक्ष'

असें संबोधून त्यांचें स्वागत केलें. पण डी व्हॅलेराचें मन मात्र चरकलें व पुढील विचार त्यांचे मनांत आल्याशिवाय राहिले नाहींत : “ वर्तमानपत्रांनीं मला ‘ अध्यक्ष ’ केल्याबद्दल आयरिश लोक काय म्हणतील ? ”

* * *

अमेरिकेंत असतांना एके प्रसंगीं डी व्हॅलेरा यांना मोठ्या प्रेमानें कमींत कमी पंधराशें सद्‌गृहस्थांबरोबर हस्तांदोलन करावें लागलें !

* * *

अमेरिकेंत असतांना डी व्हॅलेरांनीं आपल्या प्रभावी वक्तृत्वानें तेथील लोकांवर विलक्षण छाप पाडली. त्यांच्या व्याख्यानाला लोकांच्या झुंडीच्या झुंडी जमत. एकदां शिकॅगो येथील व्याख्यानाला जनसंमर्द एक लाखावर होता. आर्चबिशप मॅनिक्स म्हणतात, “ डी व्हॅलेरांच्या भाषणानें जितका प्रचंड उत्साह श्रोतृसमुदायांत उत्पन्न होतो तितका दुसऱ्या कोणाच्याच भाषणानें उत्पन्न झालेला मीं आजपर्यंत पाहिला नाहीं....”

* * *

अमेरिकेंतील यशस्वी दौऱ्याचा असा परिणाम झाला कीं, डीं व्हॅलेरा आयर्लंडमध्यें परत आल्यावर लॉइड जॉर्जनें आपण होऊन समेट घडवून आणण्याकरितां त्यांस बोलाविलें व शरणागतीनें त्यांत असें म्हटलें कीं, “ तुमच्या मनास वाटेल त्या सहकाऱ्यांना आपल्याबरोबर आणावें....व आम्ही ज्याप्रमाणें तुमच्याशीं अतिशय प्रेमभावानें वागण्याची इच्छा करितों त्याप्रमाणेंच तुम्हीहि आमच्याशीं वागावें, अशी आमची विनंति आहे....”

* * *

यानें तसें एक बिल आणून ती जागा रद्द केली. त्याचप्रमाणें राजाची सत्ता देखील आंतर-व्यवस्थेच्या बाबतींत संपुष्टांत आणली. याचें नांव स्वातंत्र्य !

* * *

सुभाषचंद्र बोस यांना इंग्लंडमध्यें जेव्हां प्रवेश मिळाला नाहीं, त्या वेळीं स्वातंत्र्य उपभोगणाऱ्या आयर्लंडच्या राष्ट्रवीरानें त्यांना आश्रय दिला. डी व्हॅलेरा व सुभाष यांची अर्धा तासपर्यंत मोकळेपणानें मुलाखत झाली.

* * *

आयर्लंडचा राष्ट्रवीर डी व्हॅलेरा हा सत्ताधीश आहे, सर्व सूत्रें त्याच्या हातांत आहेत, पण राक्षसी महत्त्वाकांक्षेच्या आहारीं तो कधींच गेला नाहीं.


* * *

डी व्हॅलेरा हा अंगानें सडपातळ असून त्याची उंची पुरी सहा फूट आहे. त्याचें सरळ नाक व भव्य कपाळ त्याच्या ठिकाणीं असलेल्या बुद्धीची व तडफेची पूर्ण साक्ष देतात.

* * *

" मीं आजपर्यंत स्वतःला कधींहि ब्रिटिश प्रजाजन म्हणवून घेतलें नाहीं, व तसें म्हणवून न घेतांच मी मरेन ! " असे उद्गार त्यानें अनेक वेळां काढलेले आहेत.

* * *



# ६. अॅडॉल्फ हिटलर

[ त्रोटक जीवन-वृत्तान्त:—अॅडॉल्फ हिटलरचा जन्म ऑस्ट्रिया व जर्मनी यांच्या सरहद्दीवर असलेल्या ब्रूनो या गांवीं १८९० मध्यें झाला.



घरची सुस्थिति नसल्यानें अॅडॉल्फचें शिक्षण अगदींच बेताचें होऊन त्यानें आई-वडिलांच्या पश्चात् व्हिएन्ना शहरीं प्रयाण केलें. इतिहास-भूगोल, गायन व शिल्पकला हे त्याचे आवडते विषय होत. पण आयुष्याला वेगळेंच वळण लागत गेल्यानें या विषयांत त्याला फारशी प्रगति करतां आली नाहीं. त्याचे वडील हे स्वच्छंदी व रंगेल असल्यामुळें ते अॅडॉल्फकडे दुर्लक्षच करीत. त्याची आई मात्र ममताळू असल्यामुळें अॅडॉल्फ हा फार लाडावला गेला. आईच्या पश्चात् पैसे मिळवून पोट भरण्याची जबाबदारी त्याची त्यालाच पत्करावी लागली. पैशाकरितां त्याला अनेक हलकीं कामें करावीं लागलीं. याच काळांत त्याचें लक्ष राजकारणाकडे लागलें. पुढें महायुद्ध उद्भवल्यामुळें त्यानें आपलें नांव सैन्यांत दाखल केलें. युद्धक्षेत्रावर जबाबदारीचीं व धोक्याचीं कामें त्यानें केलीं, पण त्याची 'कॉर्पोरल'च्या हुद्द्यापलीकडे बढती गेली नाहीं. युद्ध संपल्यावर जर्मनी हा नामोहरम झाला. हिटलरनें त्या काळच्या परिस्थितीचें सूक्ष्म अवलोकन

करून नाझी पक्षाची स्थापना व नंतर संघटना केली. हिटलरनें आपल्या अंगभूत गुणांनीं लोकांचीं मनें आपल्या कार्याकडे आकर्षिलीं. त्यानें उभारलेलें म्युनिकचें बंड जरी अपयशी ठरलें तरी त्यानें त्यापासून एक धडा घेतला; व तुरुंगांतून सुटून आल्यावर सदनशीर मार्गानें ध्येय गांठा-वयाचें त्यानें ठरविलें. हा मार्ग त्याच्या कांहीं सहकाऱ्यांना पसंत न पडल्यामुळें नाझी पक्षांत मतभेदास सुरुवात झाली. हिटलरनें जर्मन पार्ले-मेंटमध्यें नाझी पक्षाचें बहुमत करण्याकरितां प्रचारकार्य जोरानें व जोमानें सुरू केलें. पहिल्या खेपेस जरी त्याला यावें तितकें यश आलें नाहीं तरी ५–७ वर्षांच्या अवधींत त्याचें हुकमी बहुमत झालें. जर्मन सत्तेचीं सर्व सूत्रें आपल्या हातांत घेऊन व्हर्सायच्या तहांतील अपमानकारक कलमांचा निकाल लावण्याचें हिटलरनें ठरविलें, व त्यांत त्याला जवळजवळ शंभर टक्के यशहि संपादितां आलें. सर्व सत्ता हातीं आल्यावर देशांत शांतता स्थापन करण्याच्या हेतूनें कम्युनिस्ट व सोशॅलिस्ट यांचा कांटा प्रथम त्यानें दूर केला; नंतर नाझी पक्षांतील त्याचे विरोधकहि नाहींसे करण्यांत आले. ज्यू लोकांबद्दलचा त्याचा तिरस्कार महशूरच आहे; त्यांच्यावर कडक निर्बंध घालून कित्येकांची त्यानें हत्या किंवा हकालपट्टीच केली. अशा रीतीनें आपला मार्ग अगदीं निष्कंटक केल्यावर त्यानें विधायक कार्यक्रम आंखले. मुख्यतः जर्मनीचे युद्धोत्तर तोडलेले लचके पुन्हां परत मिळ-विण्याकडे त्यानें लक्ष पुरवलें. सार, ऑस्ट्रिया, सुडेटन, डॅन्झिग इ. प्रांत जर्मन ' राइशस्टॅग 'मध्यें समाविष्ट करण्यांत आले.

अशा रीतीनें केवळ अंगभूत गुणांनीं एकट्या हिटलरनें जर्मनीचें गेलेलें वैभव परत जर्मनीला मिळवून दिलें. परिस्थिति मनुष्याला कार्यप्रवण करून थोर पदास चढविते, हें विधान सामान्यतः जरी खरें असलें, तरी हिटलरनें परिस्थितीला दास बनवून तो आपण वैभवगिरीवर आरूढ झाला. अर्थातच सर्व जगाचें लक्ष आजकाल हिटलरच्या पुढील कार्यक्रमावर खिळून राहिलें आहे. चालू युद्धांत हिटलरला जय मिळो अगर न मिळो, जर्मन साम्रा-ज्याच्या इतिहासांत हिटलरचें मानाचें स्थान अढळ राहील यांत शंका नाहीं.]

हिटलरच्या वडिलांनीं तीन वेळां लग्न केलें. त्यांची पहिली बायको आपल्या नवऱ्यापेक्षां चवदा वर्षांनीं मोठी होती ! हिटलर हा आपल्या वडिलांच्या तिसऱ्या बायकोपासून झाला. त्याचे वडील हे जरा फंदी असून त्यांचा आरंभीं चांभाराचा धंदा होता, पण पुढें ते कस्टम खात्यांत अधिकाऱ्याच्या जागेपर्यंत पोहोंचले. घरच्या मूळच्या गरिबीमुळें हिटलरच्या शिक्षणाची मोठी आबाळ झाली.

* * *

हिटलरचेंहि शिक्षणाकडे आरंभापासून दुर्लक्षच असे. त्याच्या आवडीचे विषय म्हणजे इतिहास व भूगोल; या विषयांखेरीज त्यानें कोणत्याच विषयांत प्रगति केली नाहीं. जगाचा नकाशा पुढें पसरून " जर्मनीच्या सीमाच मी नाहींशा करीत आहें. जर्मनीचें साम्राज्य मी खूपखूप विस्तृत करीत आहें...." असे तो म्हणे. चांभाराच्या पोराचे हे शब्द इतर मुलांना हास्यास्पद वाटल्यास नवल नाहीं.

* * *

हिटलरला आपल्या आईविषयीं अतिशय प्रेम वाटे, पण वडिलांबद्दल त्यांच्या रंगेल व हट्टी स्वभावामुळें त्याला कधींच कांहीं वाटलें नाहीं. आईच्या लाडामुळें त्याचें कोणतेंच शिक्षण पुरें न झाल्यामुळें त्याला अठराव्या वर्षापर्यंत भटकत दिवस काढावे लागले.

* * *

हिटलर व त्याचे वडील अलोइस यांच्या स्वभावांत जमीन अस्मानचें अंतर ! अलोइस हे दारूबाज तर हिटलर निर्व्यसनी, अलोइस हे स्वार्थी तर हिटलर निःस्वार्थी, अलोइस यांच्या तीन बायका झाल्या तरी हिटलरच्या पहिल्या लग्नाचा पत्ता नाहीं !

* * *

शिल्पकला व चित्रकला यांची हिटलरला विशेष आवड. या कलांचें शिक्षण जर त्याला मिळालें असतें तर त्याच्या जीवनाला वेगळीच दिशा लागली असती.

* * *

त्याची आई वारल्यानंतर त्याच्यापुढें भेसूर चित्र उभें राहिलें. 'पुढें काय ?' हा प्रश्न सोडविण्याच्या हेतूनें हिटलर व्हिएन्ना शहरीं गेला. जवळची पुंजी संपल्यावर त्याला दारिद्र्याची झळ चांगलीच भासूं लागली. पोटाची खळगी भरण्यासाठीं वाटेल तसलीं हलकीं कामें त्यानें केलीं. "आयुष्यांतील अडचणींनींच मला, जीवनाचा झगडा कसा झगडावा हें शिकविलें." असें हिटलर आपल्या आत्मचरित्रांत लिहितो.

* * *

हिटलर २०।२२ वर्षांचा असतांनाच त्यानें राजकारणांत लक्ष घालण्यास सुरुवात केली. ऑस्ट्रिया हा देश पूर्वीं जर्मन साम्राज्याचा भाग असल्यानें तो पुन्हां जर्मनीला जोडण्याबद्दल त्यानें खूप विचार केला. ऑस्ट्रियाबद्दल त्याच्या मनांत एक प्रकारची अढी बसल्यानें त्यानें व्हिएन्ना सोडून म्युनिकला प्रयाण केलें.

* * *

१९१४ च्या महायुद्धांत हिटलरनें बव्हेरियाच्या 'रिझर्व्ह' पलटणींत नांव दाखल केलें. त्याच्याकडे असलेलें जासुदाचें काम त्यानें मोठ्या धैर्यानें केलें. लढाईत प्रत्यक्ष भाग घेतल्यानें युद्धक्षेत्रा-वरील निरनिराळ्या कामांचा अनुभव त्याला आज उपयोगी पडत आहे.

* * *

महायुद्धानंतर झालेला व्हर्सायचा तह हा जर्मन लोकांना अति-शय झोंबूं लागला. त्यांतील अपमानास्पद अटी नष्ट करून जर्मनीला मानाचें जिणें जगायला कसें मिळेल, इकडेच तरुण राजकारणी

पुरुषांचें लक्ष लागलें. हिटलरनें नाममात्र असलेल्या ' जर्मन वर्कर्स पार्टी 'मध्यें नवजीवन ओतलें; आणि धडाडीनें लोकमत आपल्या बाजूला वळविण्याचा प्रयत्न सुरू केला. लोकांच्या हृदयांतील भावाच हिटलर बोलत असल्यानें त्याच्याकडे त्यांचीं हृदयें खेचलीं गेल्यास आश्चर्य नाहीं.

*           *           *

हिटलरचा पक्ष उत्तरोत्तर वाढत गेला, आणि त्याचें संपूर्ण नेतृत्व त्याच्याकडेच अबाधित राहिलें. सभेंतील गोंधळ टाळण्याकरितां हिटलरनें कायम स्वरूपाची स्वयंसेवक-संस्था 'स्टॉर्म ट्रुपर्स' म्हणून काढिली. हिचेंच रूपांतर पुढें हिटलरच्या खासगी सैन्यांत झालें. या संस्थेची संघटना करण्याचें कार्य प्रथमपासून गोअरिंग यानेंच केलें.

*           *           *

हिटलरचा नाझी पक्ष फारच प्रबळ होऊन दोन हात करण्याचीहि त्याची तयारी झाली. १० ऑक्टोबर १९२२ रोजीं शेतकरी संस्थांनीं कोबर्ट येथें ' जर्मन-दिन ' साजरा करण्याचें ठरवून हिटलरला आमंत्रण दिलें. हिटलरनें आपल्या पक्षाची संघटना लोकांच्या नजरेस आणण्याचा हेतूनें सर्व सहाशें स्वयंसेवकांच्यासह जाण्याचें ठरविलें, व त्यानें सबंध गाडी भाड्यानें घेतली. कोबर्ट हें कम्युनिस्ट लोकांचें केंद्र होतें, त्यामुळें त्या लोकांना हिटलरची ही मुसंडी आवडली नाहीं, आणि त्यांनीं हिटलरच्या स्वयंसेवकांवर दगडफेंकहि केली; पण या हल्ल्याचा यशस्वी प्रतिकार स्वयंसेवकांनीं मोठ्या शिताफीनें व शौर्यानें केला. कम्युनिस्टांच्या वर्चस्वाला अशा रीतीनें बसलेला धक्का पाहून हिटलरला अतिशय आनंद झाला. राष्ट्रीय लढ्यांतील हाच त्याचा पहिला विजय.

*           *           *

कम्युनिस्ट व सोशॅलिस्ट यांच्या मतभेदाबरोबरच हिटलरचा ज्यू लोकांबद्दलचा तिरस्कार वाढतच गेला. हिटलरनें सत्ता हातीं येतांच ज्यू लोकांचा कांटा नाहींसा करण्याच्या उद्देशानें अनेक जुलमी कायदे केले. त्यांना कोणत्याहि खात्यांत नोकरी मिळत नसे, एवढेंच नव्हे, तर ज्यू वकील, ज्यू दुकानदार, ज्यू डॉक्टर, ज्यू सावकार यांच्याशीं संबंध ठेवणारांना गुन्हेगार समजण्यांत येई. ज्यू स्त्रियांशीं विवाह केल्यास नोकरीवरून बडतर्फ करण्याची धमकी मिळे. प्रो. आइन्स्टाइन या जगद्विख्यात शास्त्रज्ञाला आपल्या विद्यालयांतील पदाला मुकावें लागलें. ज्यू लोकांची अमानुषपणें कत्तल करून उरलेल्या लोकांवर कडक निर्बंध घालून हिटलरनें ज्यू लोकांबद्दलचा आपला द्वेष व्यक्त केला.

* * *

१९२२ सालच्या सुमारास हिटलरनें मोठ्या मुत्सद्देगिरीनें मुसोलिनीशीं संगनमत केलें, व त्याची सहानुभूति मिळवून मदतीचें आश्वासन मिळविलें. एक गोष्ट लक्षांत ठेवण्यासारखी आहे कीं ही भेट दोघेहि सत्तारूढ होण्यापूर्वीं घडलेली होती. स्वतःच्या कर्तबगारीवर सर्व अधिकारसूत्रें आपल्या हातांत घेऊन देशांत एकतंत्री अंमल सुरू करून साम्राज्य-विस्तार करण्याच्या उद्देशांत दोघांची एकवाक्यता असल्यामुळें त्यांची गट्टी जमल्यास आश्चर्य नाहीं.

* * *

बव्हेरियांतील निरनिराळ्या राष्ट्रीय पक्षांनीं एकजूट करून बर्लिनचें वर्चस्व झुगारून देण्याच्या हेतूनें एक मोठी सभा भरविण्याचें ठरविलें. त्या वेळीं बव्हेरियन सरकारचे निरनिराळे अधिकारीहि या सभेस हजर राहणार होते; पण एवढ्या मोठ्या सभेंत

मोठी खळबळ उडवून देणारी अशी कोणतीच व्यक्ति नसल्यानें हिटलरनें ही सोन्यासारखी संधि वायां दवडली नाहीं. त्यानें आपल्या सशस्त्र स्वयंसेवकांसह सभागृहांत प्रवेश मिळवला. हिटलरनें व्यास-पीठावर उडी मारून हवेंत पिस्तुलाचे बार काढले व लोकांना शांत राहण्याची सूचना दिली व सांगितलें, " राष्ट्रीय क्रान्तीला सुरुवात झाली आहे. या सभागृहाला माझ्या सहाशें सशस्त्र स्वयं-सेवकांनीं गराडा दिला आहे. कोणालाहि बाहेर जातां येणार नाहीं. पार्लमेंटचे सभासद व पोलिस हे आम्हांला पूर्णपणें अनुकूल झालेले आहेत... " यांतील कांहीं मजकूर खरा व कांहीं खोटा होता. नंतर हिटलरच्या हुकमानें तेथें जमलेल्या चार अधिकारी पुढाऱ्यांना हिटलरच्या मागोमाग एका खोलींत जाणें भाग पडलें. खोलींत गेल्यावर हिटलरनें सर्व सत्ता आपल्या हातांत घेऊन इतर खात्यांची वांटणी केली आणि त्या अधिकाऱ्यांना त्यानें बजावलें कीं, " या पिस्तुलांत आणखी पांच गोळ्या आहेत. तुम्हीं जर माझें म्हणणें कबूल केलें नाहींत तर त्यांपैकीं चार गोळ्या तुमच्याकरितां राखून ठेवल्या आहेत आणि पांचवी वेळप्रसंग आल्यास माझ्याकरितां ! " हें '**बीरहॉल बंड**' म्हणून प्रसिद्ध आहे. पण हिटलरनें योग्य ती काळजी न घेतल्यानें बंडाची बातमी चोहोंकडे पसरली व लष्करी अधिकाऱ्यांनीं या बंडाचा बींमोड करून हिटलरला कैद केलें.

* * *

या सर्व धकाधकीच्या मामल्यांत हिटलरला तुरुंगांतच खरी विश्रांति मिळाली. तो म्हणे, "तुरुंगासारखें सुख नाहीं. आयुष्यांत ही पहिलीच माझी विश्रांति." हिटलरला पांच वर्षांची साधी कैद होती, तरी त्याला नऊ महिन्यांनंतरच सोडण्यांत आलें.

* * *

आपल्या ' आत्मवृत्ता 'चा (*Mein Kampf*) कांहीं भाग हिटलरनें तुरुंगांत लिहिला. या पुस्तकाच्या चाळीस लाखांवर प्रति खपल्या. इतक्या प्रति बायबलच्या खालोखाल जगांतील कोठल्याच पुस्तकाच्या खपल्या नाहींत !

* * *

तुरुंगांत असतांना हिटलरनें सत्ता काबीज करण्याचा निराळाच मार्ग आंखावा असें ठरविलें. अत्याचारी मार्गाचा अवलंब न करितां सनदशीर मार्गानें जाऊन ' राइशस्टॅग 'मध्यें—जर्मन पार्लमेंटमध्यें—आपलें बहुमत करावें, असा विचार करून हिटलर आपल्या पुढील कार्यास लागला. ही वैचारिक क्रांति लक्षांत ठेवण्यासारखी आहे. त्याच्या कांहीं अनुयायांनीं त्याला याबद्दल दोषहि दिला.

* * *

अनेक इतर संस्थांशीं व कार्यकर्त्यांशीं विचारविनिमय करून त्यांची सहानुभूति व आर्थिक मदत मिळवून हिटलरनें ' राइश-स्टॅग 'मध्यें नाझी पक्षाचें बहुमत करण्याचा प्रयत्न जोरानें सुरू केला, आणि त्याला त्यांत यशहि येत गेलें. प्रत्येक निवडणुकींत नाझी पक्षाला अधिकाधिक जागा मिळत गेल्या. १९३२ च्या निवडणुकींत हिटलरचें ' राइशस्टॅग 'मध्यें निर्विवाद बहुमत झालें. जाळपोळ, खून, बंडाळी इत्यादि मार्गांचा सत्ता काबीज करण्याकरितां अवलंब न करितां सरळ कायदेशीर मार्ग आक्रमून सत्ताधारी होण्याचें त्यानें ठरविलें.

* * *

१९३३ च्या जानेवारींत हर हिटलर हा जर्मनीचा (चान्सेलर) सर्वसत्ताधारी झाला. पण सत्ता टिकवणें हें कार्य कांहीं सोपें नाहीं, तेवढ्याकरितां मुख्यतः कम्युनिस्ट व सोशॅलिस्ट चळवळींवर कडक

नियंत्रण ठेवणें किंवा त्यांचें निर्मूलन करणें या महत्त्वाच्या गोष्टींकडे हिटलरला लक्ष पुरवावें लागलें.

* * *

सर्व सत्ता आपल्या हातांत अनियंत्रितपणें राहावी म्हणून नाझी पक्षानें प्रतिपक्षाच्या लोकांचें हत्याकांड सुरू केले. त्या पक्षाच्या निरनिराळ्या चळवळींवर कडक निर्बंध घातले गेले. इतकेंच नव्हे, तर हिटलरच्या खांद्याला खांदा भिडवून ज्यांनीं कामें केलीं, अशा स्वपक्षाच्या अनेक कार्यकर्त्यांची कत्तल मतभेद झाले म्हणून अमानुषपणें केली गेली. हिटलर व त्याचे हस्तक गोअरिंग व गोबेल्स यांनीं अनेक युक्त्या-प्रयुक्त्या योजून नाझी पक्षांतील अनेक बदसूर काढणाऱ्या लोकांवर बिनदिक्कत गोळ्या झाडल्या. ज्या 'स्टॉर्म ट्रूपर्स'च्या मदतीनें हिटलरनें अनेक विजय मिळविले त्याच सैनिकांना कायमची रजा देण्याचा घाट चालू झाला, व ज्याच्या हातांत ही प्रचंड संघटना होती तो रोएम् याचा खून करण्यापर्यंत पाळी आली! ३० जून १९३४ची काळरात्र म्हणून जर्मनीच्या इतिहासांत गणली जाईल. त्या रात्रीं नाझी पक्षांतील सात-आठशें विरोधकांचे अमानुषपणें खून होऊन रक्ताचे पाट वाहिले!

* * *

विध्वंसक कार्य संपवून हिटलर हा विधायक कार्याकडे वळला. हिटलरनें व्हर्सायिसचा तह धाब्यावर बसवून जर्मनीचें सामर्थ्य वाढवून १९१४ च्या महायुद्धांत गेलेला भाग परत मिळवण्याच्या प्रयत्नास सुरुवात केली. १९३३ मध्यें राष्ट्रसंघांतून व निःशस्त्रीकरण-परिषदेंतून जर्मनीनें आपलें अंग काढून घेऊन राष्ट्रसंघांतील मुत्सद्द्यांना चांगलाच शह दिला. १९३५ मध्यें लोकमत अजमावून फ्रान्सच्या ताबेदारींतून सार प्रांत परत मिळवला. त्याचप्रमाणें

कोणत्याहि राष्ट्राची पर्वा न करितां हिटलरनें सैन्य तर वाढवलेंच, पण वैमानिक दळ तयार करण्यास सुरुवात केली. १९३८ मध्यें हिटलरनें रक्ताचा एकहि थेंब न सांडतां ऑस्ट्रिया रिशस्टॅगमध्यें समाविष्ट केला. ही गोष्ट अर्थात् चुटकीसरशी होऊं शकत नाहीं. हिटलरनें मोठ्या कौशल्यानें व मुत्सद्देगिरीनें याची पूर्वतयारी लोकांच्या निदर्शनास न येतां चालविली. ऑस्ट्रियाच्या यशस्वी मोहिमेबद्दल हिटलरला जितका अभिमान वाटतो तितकाच जगांतील इतर मुत्सद्द्यांना त्वेष येतो. १९३५ सालीं झेकोस्लोव्हाकियाकडून जर्मनीचा सुडेटन प्रांत केवळ धमकीनें हिटलरनें घेतला, या कृत्याकडे साऱ्या जगानें मान डोलावली. हें कृत्य पचल्यावर पोलंड व डॅन्झिग बंदरासंबंधानें त्यानें चळवळ सुरू केली. मऊ लागेल तेथें कोपरानें खणावें, हेंच धोरण त्यानें शक्य तों चालू ठेविलें. अशा रीतीनें हिटलरनें व्हर्सायच्या तहांतील जाचक कलमें धुडकावून लावून जर्मनीला मानाचें स्थळ प्राप्त करून दिलें.

*　　*　　*

ज्या ठिकाणीं साम-दामाच्या योजना उपयोगी पडत नाहींत त्या ठिकाणीं युद्धाची तयारीहि हिटलर दाखवितो. सांगूनसवरून त्यानें पोलंडवर शस्त्र उगारलें आणि त्या देशाला नामशेष केलें.

*　　*　　*

साऱ्या जगाला थक्क करून सोडणारा मुत्सद्देगिरीचा कळस म्हणजे हिटलरनें रशियाशीं केलेला अनाक्रमणाचा करार! इंग्लंड, फ्रान्स, अमेरिका इत्यादि प्रमुख राष्ट्रांतील मुत्सद्द्यांनीं तोंडांत बोटें

घालून राजकारणांतील या कोलांटीउडीकडे नुसतें पाहत राहावें अशा नऱ्हेचा हा करार होय !

* * *

हिटलरचें वक्तृत्व हा एक नमुना आहे. त्याच्या भाषणांत आवेश असतो, त्याच्यांत भावनेचा ओलावा असतो, कित्येक वेळां एकमेव पुढारीपणाची झांक असते, भाषण चालू असतां विचारांची इतकी तुंबळ गर्दी जमते कीं पुढें काय बोलावें हें न समजून कांहीं काळ तो स्तब्धहि उभा राहतो; हिटलर भाषण चालू असतां भावनातिरेकानें अश्रुविमोचनहि करण्यास मागें पुढें पाहत नाहीं !

* * *

हिटलर अजून अविवाहित आहे, पण प्रेमाचे प्रसंग त्याच्या आयुष्यांत अनेकवार येऊन गेले.

* * *

हिटलरला खाजगी जीवन असें नाहींच. फक्त कित्येक वेळां तो एकांतवासाचा तहानेला असतो एवढेंच. हिटलरला वाचनाचा भारी नाद आहे. रात्रीचे तासन् तास तो वाचीत पडलेला असतो. त्याचप्रमाणें जगांतील वर्तमान व बातम्या जाणण्याची त्याची तीव्र इच्छा असते. प्रवासांत असतांना त्याच्या गाडींत व विमानांत रेडिओ असतो.

* * *


त्याची राहणी अगदीं साधी आहे; जेवणहि तसेंच साधें असतें. मांसाहारहि त्यानें सोडला आहे असें म्हणतात. कपड्यांच्या छानछुकीकडे त्याचें विशेष लक्ष नसतें.

* * *

करमणुकीच्या वेळीं तो आवडत्या शिल्पकलेकडे लक्ष देई, किंवा परदेशी चित्रपट पाही; चित्रपट पाहण्याचा त्याला विशेष नाद आहे.

* * *

हिटलरची त्याच्या मोटार ड्रायव्हरवर विशेष मर्जी असे. त्याच्या पश्चात् त्यानें त्याच्या नांवानें स्टॉर्म ट्रुपर्सची एक पलटण उभारली. ज्या ज्या वेळीं त्याच्या समोरून ती पलटण जाई तेव्हां तेव्हां त्याचे डोळे पाण्यानें भरून येत.



# ७. बेनिटो मुसोलिनी

[ त्रोटक जीवन-वृत्तान्त:—बेनिटो मुसोलिनी याचा जन्म इटलींतील डोव्हिया या खेडेगांवीं ता. २९ जुलै १८८३ मध्यें झाला. याच्या



वडिलांचें नांव अलेक्झांडर व आईचें नांव रोझा असें होतें. वडील आपला लोहारीचा धंदा संभाळून राजकारणांतील अनेक विषयांवर वादविवाद करीत. पुढें डोव्हिया गांवचा तो 'मेयर' झाला. बेनिटोची आई अतिशय प्रेमळ होती. तिच्या हाताखालीं त्याचें प्राथमिक शिक्षण झालें. बेनिटोचें प्रवेशपरीक्षेपर्यंतचें शिक्षण झाल्यावर त्यानें शिक्षकाची नोकरी पत्करिली. मानधनावर व स्वातंत्र्यावर गदा आल्यानें त्यानें ती नोकरी सोडून परदेशीं प्रयाण केलें. बेकारीची तीव्र झळ त्याला भासल्यामुळें मिळेल ती नोकरी त्याला करावी लागली. गवंड्याच्या हाताखालीं सुद्धां त्यानें काम केलें. मध्यंतरीं वडील निवर्तल्यामुळें घरीं बसून खाणें त्याला प्रशस्त वाटेना; म्हणून तो घरीं कांहीं वर्षे परत गेलाच नाहीं. स्वित्झर्लंडमध्यें असतांना नोकरी सांभाळून त्यानें विश्वविद्यालयांत जाऊन व्याख्यानें ऐकलीं. त्यानें आपल्या वक्तृत्वाची चमक अनेक वेळां लोकांच्या निदर्शनास आणून दिली. इटलींत परत आल्यावर कांहीं काळ शिक्षक व प्राध्यापकाचें काम त्यानें केलें. मध्यंतरीं त्याला अनेक कारणांस्तव

कारागृहवास पत्करावा लागला. राजकारणांत त्यानें जेव्हां प्रवेश केला तेव्हां त्याचेजवळ वक्तृत्व, विचार, धडाडी व तळमळ एवढ्याच गोष्टींचें भांडवल होतें. पुढें त्यानें अनेक वर्तमानपत्रांचें संपादकत्व पत्करलें. त्याचा मुख्य कटाक्ष कामकरी, शेतकरी व शस्त्रधारी यांची संघटना करण्याकडे होता. पहिल्या प्रथम जरी तो समाजसत्तावादी होता तरी १९१४ च्या युद्धानंतर त्यानें 'फॅसिझम्' पंथाचा प्रसार सुरू केला. इटलीला महायुद्धांत भाग घेण्यास लावण्यांत मुसोलिनीचा बराच भाग आहे. युद्धानंतर त्यानें पार्लमेंटच्या निवडणुकी लढवल्या. पहिल्या प्रथम जरी त्याला अपयश आलें, तरी दुसऱ्याच खेपेस त्याची चळवळ लोकांस पसंत पडून राष्ट्रहिताची खरी कळकळ बाळगणारा म्हणून लोकांनीं त्याला व त्याच्या अनुयायांना निवडून दिलें. पुढें त्यानें फॅसिस्ट सैनिकांच्या मदतीनें राज्यसूत्रें हातीं घेण्याच्या इराद्यानें रोमवर चाल करण्याचें साहस आरंभिलें! इटलीच्या राजानें त्याची लोकप्रियता ओळखून पहिलें प्रधानमंडळ बरखास्त करून मुसोलिनीला आपलें प्रधानमंडळ बनविण्यास सांगितलें. अशा रीतीनें पूर्वीच्या भटक्या व बेकार मुसोलिनीनें इटलीचीं सर्व सूत्रें १९२२ च्या ऑक्टोबरांत आपल्या हातांत घेतलीं. बुद्धीची कुशाग्रता, भावनेची उत्कटता, मनाचा मानीपणा, तारुण्याचें साहस, कार्याची धडाडी, देश-सेवेची तळमळ, वीराचा निर्भयपणा, मुत्सद्देगिरी इ. गुणांमुळें मुसोलिनी इटलीचा सर्वसत्ताधीश बनला! ]

---

मुसोलिनीच्या वडिलांचा धंदा लोहारीचा. तेव्हां त्याला आपल्या वडिलांबरोबर काम करावें लागे. पण भाता फुंकतां फुंकतां छोटा मुसोलिनी जर पेंगू लागला किंवा त्याचें दुर्लक्ष झालें कीं वडील चडकाणी देण्यास चुकत नसत. शिस्त म्हणजे शिस्त! या कडक शिस्तीची शिकवणूक मुसोलिनीस पुढील आयुष्यांत चांगलीच उपयोगी पडली. त्याचे वडील नेहमीं म्हणत कीं, "दुसऱ्याकडून खेटरें खाण्यापेक्षां घरच्याच लाथा खाऊन मुलांनीं शहाणें व्हावें."

रोझा हें मुसोलिनीच्या आईचें नांव. तिचा धंदा शिक्षकिणीचा. तिनें लग्नानंतरहि आपला धंदा सोडला नाहीं. मुसोलिनीचा प्राथमिक अभ्यास त्याच्या आईनेंच करून घेतला.

* * *

मुसोलिनीचें नांव ' बेनिटो '. हें नांव ठेवण्यास थोडा इतिहास आहे; तो असा : १८६७ सालीं मेक्सिको देशांतील बेनिटो जुआरेज या इसमानें राजाविरुद्ध बंड उभारून त्याला पदच्युत केलें, व स्वतः त्यानें अध्यक्षपद घेतलें. ह्याच्या वडिलांना वाटलें कीं, आपला मुलगाहि असाच पराक्रमी निघावा, म्हणून त्यानें आपल्या मुलाचें नांव ' बेनिटो ' असें ठेवलें.

* * *

प्रवेशपरीक्षेपर्यंतचें मुसोलिनीचें शिक्षण फाएन्झा गांवीं झालें. तेथें त्यानें झटून अभ्यास केला. त्याची हुशारी व बहुश्रुतपणा पाहून तेथील त्याच्या शिक्षकांना कौतुक वाटे. उत्तम विद्यार्थी म्हणून त्याची ख्याति झाली. वादविवादांत तो कोणाचीच पर्वा करीत नसे. एकदां " प्रजेनें राजाचा वध करणें ही गोष्ट अन्यायाची आहे ", असें एका शिक्षकानें म्हटलें; त्यावर मुसोलिनीनें पुढील युक्तिवाद केला—" राजा हा तर प्रजेचा नोकर, आणि नोकराच्या हातून अक्षम्य चूक झाल्यास तो शिक्षेस पात्र समजला पाहिजे. तर मग राजाच तेवढा या नियमाला अपवाद कां ?"

* * *

शाळेंतील शिक्षण पुरें झाल्यावर मुसोलिनीनें शिक्षकाच्या धंद्याची परीक्षा दिली, व शिक्षकाची नोकरी त्यानें वयाच्या अठराव्या वर्षीं पत्करली. याच वेळीं त्यानें नृत्यकला व तंतुवाद्य वाजविण्याची कला आत्मसात् केली. मुसोलिनीला पत्ते खेळण्याचा

भारी नाद असे. शाळेचें काम आटोपलें कीं तो पत्ते खेळे. ही गोष्ट त्याच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांना रुचत नसे. पण मुसोलिनीनें रोखठोक जबाब देऊन नोकरीवरहि पाणी सोडलें. तो म्हणाला, "शाळेच्या वेळेपुरता मी बांधला गेलों आहें. इतर वेळीं मी मनास मानेल तसा वागेन; ५६ लिऱ्याच्या ( सुमारें ३० रुपये ) भिकारड्या पगारासाठीं मी स्वातंत्र्य विकण्यास तयार नाहीं" इत्यादि. थोडक्या काळांत त्याला नोकरीस मुकावें लागलें.

* * *

ही शिक्षकाची नोकरी सुटल्यानंतर दुसऱ्या नोकरीच्या शोधार्थ स्वित्झर्लंडला जाण्याची त्यानें तयारी केली. प्रवासांत असतांनाच त्याला आपल्या वडिलांना अटक झाल्याची बातमी कळली. पण निरुत्साही न होतां किंवा घरींहि परत न जातां तो तसाच पुढें गेला !

* * *

बेकारीचे चटके त्याला चांगलेच बसूं लागले. धड झोंपायला जागा मिळेना, कीं खायला पोटभर मिळेना ! भीक मागण्याचाहि प्रसंग त्याच्यावर ओढवला ! एकदां त्यानें पुलाच्या कमानीच्या खालीं निवाऱ्याची जागा शोधली; पण डांस, बेडूक यांचा त्रास असह्य झाल्यामुळें तो उठून चालूं लागला. पुढें त्याला एक मोठी रिकामी पेटी दिसली, तींतच त्यानें प्रवेश केला व क्षणार्धांत तो गाढ झोंपीं गेला. पण सकाळ झाल्यावर पोलिसानें त्यावर 'भटकेगिरी'चा आरोप ठेवून त्याला एक दिवस तुरुंगवास पत्करावा लागला ! पोलिसांचा त्रास चुकावा म्हणून ज्यानें सार्वजनिक मुतारींतहि तासन् तास घालविले त्याला शेवटीं विटंबना सहन करावी लागलीच ! मुसोलिनीच्या मानी मनांतील खळबळीची कल्पनाच करणें बरें !

* * *

मुसोलिनीनें गवंड्याच्या हाताखालीं त्याला चुना-चिखलाच्या पाट्या देण्याचें काम केलें आहे ! त्याला मजुरी अगदीं कमी मिळे, पण, अगदींच उपाशी मरण्यापेक्षां प्रामाणिकपणें कष्ट करून दोन पैसे मिळविले तर त्यांत वाईट काय, असा विचार करून त्यानें तेंहि काम केलें. या कामांतहि त्यानें नैपुण्य संपादिलें.

* * *

पुढें त्यानें दारूच्या दुकानांत नोकरी पत्करिली. स्वित्झर्लंडांत थंडी अतिशय कडक, पण तशांतहि मुसोलिनीला घरोघरीं सकाळच्या प्रहरीं दारूच्या बाटल्या पोहोंचवाव्या लागत. या ठिकाणीं त्याला सुदैवेंकरून राहण्याला जागा व जेवण फुकट मिळे.

* * *

सकाळचा वेळ काम करण्यांत घालवून दुपारच्या फावल्या वेळांत मुसोलिनीनें उच्च शिक्षण घेण्याचें ठरविलें. त्याप्रमाणें जिनीव्हा येथील विश्वविद्यालयांत जाऊन तेथील व्याख्यानें त्यानें मन लावून ऐकलीं.

* * *

मुसोलिनीनें याच काळांत फ्रेंच भाषा चांगलीच आत्मगत केली, पण इंग्रजीकडे मात्र त्यानें लक्ष दिलें नाहीं. १९२५ सालपर्यंत त्याला इंग्रजी मुळींच येत नव्हतें. मुख्य प्रधान झाल्यावर इंग्रजीची नड भासूं लागल्याबरोबर त्या भाषेचाहि त्यानें अभ्यास सुरू करून ती आपलीशी केली.

* * *

समाजसत्तावादी लोक व मुसोलिनी यांच्या अनेक वेळां गांठी पडून वादविवाद होई. पुढेंपुढें तर मुसोलिनी हा क्रांतिकारक चळवळ्या म्हणून गणला जाई व शेवटीं स्वित्झर्लंड देश सोडून जाण्याची त्याच्यावर पाळी आली.

* * *

मुसोलिनी घरीं परत आल्यावर पुन्हां त्यानें शिक्षकाची नोकरी पत्करली. ही नोकरी चालू असतांनाच त्यानें पुष्कळसें वाचन केलें. वादविवाद कलाहि त्यानें पूर्वींच अवगत करून ठेविली होती. तिचा उपयोग ह्या काळांत विशेष होऊन त्याची चहूंकडे प्रसिद्धि होऊं लागली. पुढें त्यानें फ्रेंच भाषेच्या प्राध्यापकाचेंहि काम केलें. पण हा मान अल्पजीवी ठरल्यामुळें त्यानें ' प्राध्यापक ' ही उपाधि आपल्या नांवाला कधींच लावून घेतली नाहीं !

* * *

मध्यंतरींच्या काळांत त्याची लेखक, वक्ता, राजकीय चळवळ्या म्हणून बरीच ख्याति झाली. समाजसेवा करून अन्यायाचें उच्चाटन करण्याचें त्यानें कंकणच बांधलें. पुढें त्यानें स्वतःचें असें एक साप्ताहिक वर्तमानपत्रच सुरू केलें. या वेळीं मुसोलिनीचें वय अवघें अठ्ठावीस वर्षांचें होतें, ही गोष्ट लक्षांत ठेवण्यासारखी आहे.

* * *

मुसोलिनीनें आपल्या भावनाप्रधान वक्तृत्वानें तरुण मनें पूर्ण काबीज केलीं. समाजसत्तावादी वृद्ध कर्पीना देखील त्यानें प्रत्यक्ष प्रतिकारात्मक कृति (Direct action) करण्यास आव्हान देऊन त्यांना लाजविलें !

* * *

इटलींत अत्यंत आवश्यक वस्तु जी दूध ती अतिशय महागली; पण मुसोलिनीनें मेयरची गांठ घेऊन " दुधाची किंमत तात्काळ कमी करण्याची व्यवस्था न झाल्यास तुमची व इतर सभासदांची गठडी वळून खिडकीबाहेर फेंकून देण्यांत येईल " असें बजाविलें. मुसोलिनी व त्याचे साहाय्यक यांचा भयंकर आवेश पाहून मेयर ( म्युनिसिपालिटीचा अध्यक्ष ) नरमला. ' प्रत्यक्ष प्रतिकारात्मक

कृति ' हें नवीनच शस्त्र मुसोलिनीनें उपयोगांत आणलें. हें धोरण यशस्वी झाल्यानें त्याचा जयजयकार झाला.

* * *

इटलींतील ' मिलन ' शहरावर त्याचें विशेष प्रेम आहे. या शहरास तो ( Brain of Italy ) 'इटलीचें बुद्धिसर्वस्व' समजतो.

* * *

इटलीनें १९१४ च्या महायुद्धांत भाग घ्यावा म्हणून मुसोलिनीनें जोराची चळवळ आरंभिली, व ती यशस्वीहि झाली. मुसोलिनीनें अगदीं साधा सैनिक म्हणून आपलें नांव दाखल केलें. युद्धप्रसंगीं त्याला लहान-मोठ्या मिळून ४२ जखमा झाल्या होत्या; पण त्याची सहनशक्ति जबर असल्यानें त्यानें या सर्व यातना मोठ्या धीरानें सहन केल्या.

* * *

लष्करी अधिकाऱ्यांनीं त्याची ' स्पृहणीय चलाखी, उत्कृष्ट प्रसंगावधान, व मनाचा गंभीरपणा ' इत्यादि गुणांबद्दल प्रशंसा करून त्याला प्रथम ' कॉर्पोरल ' व नंतर ' सार्जंट ' करून त्याचा गौरव केला.

* * *

महायुद्धानंतर इटलींत सामाजिक व्यवस्था अगदीं विस्कळित झाली होती, ती घडी नीट बसविण्याकरितां त्यानें ' फॅसिस्मो 'ची चळवळ १९१९ मध्यें प्रथम मिलन शहरीं सुरू केली. या नवीन प्रकारच्या चळवळीचें जनकत्व प्रामुख्यानें मुसोलिनीकडेच येतें.

* * *

' फॅसिझम् 'चीं मुख्य तत्त्वें:—

( १ ) स्वदेशाभिमान व राष्ट्रहित. ( २ ) शिस्त व कर्तव्याचरण. ( ३ ) नागरिकांच्या हितसंबंधाचा सामुदायिक पद्धतीनें

विचार. ( ४ ) धर्माबद्दल आस्था बाळगणें. ( ५ ) देशांतील सर्व जातींच्या प्रगतीचा विचार. ( ६ ) कामकरी, शेतकरी व शस्त्रधारी यांची संघटना. (७) व्यक्तिहितापेक्षां राष्ट्रहित अधिक महत्त्वाचें, इ.

* * *

काळा शर्ट, हा ' फॅसिस्ट 'चा विशेष पोषाख. ' फॅसिज ' म्हणजे ' काठ्यांच्या जुडग्यांत बांधलेली कुऱ्हाड ', अलंकारिक अर्थ संघटन हा होय; म्हणून ' फॅसिझम 'चें चिन्ह, मध्यें परशू असलेला काठ्यांचा जुडगा हें आहे.

* * *

इटलीच्या पार्लमेंटला ' चेंबर ' म्हणतात. या पार्लमेंटच्या निवडणुकींत मुसोलिनी व त्याचे अनुयायी जेव्हां प्रथम उभे राहिले, तेव्हां त्यांच्यापैकीं एकहि निवडून आला नाहीं ! इतर लोकांनीं त्याची प्रेतयात्रा काढून त्याच्या घरासमोर मृतासाठीं म्हणावयाचीं गीतें गायिलीं !

* * *

पराभवानें मुसोलिनी नाउमेद न होतां तीन वर्षेंपर्यंत लोकमत तयार करून त्यानें पुन्हां निवडणुकी लढवल्या. या वेळीं त्याची चांगलीच सरशी होऊन त्याचा पंथ प्रभावी होऊं लागला.

* * *

इटलीचें प्रधानमंडळ बरींच वर्षें अस्थिर होतें. याचा फायदा घेऊन मुसोलिनीनें आपले काळे शर्टवाले अडीच लाख तरुण एकत्र जमवून रोमकडे मोर्चा वळविण्याचें ठरविलें. फॅसिस्टांच्या या साहसी कृत्याकडे इटलीचेंच काय पण साऱ्या जगाचें लक्ष खिळून राहिलें !

* * *

पहिल्या प्रधानमंडळाचे राजीनामे स्वीकारून इटलीच्या राजानें मुसोलिनीस प्रधानमंडळ बनविण्यास विनंति केली. ता. ३० ऑक्टोबर १९२२ ही फॅसिझमच्या इतिहासांत सुवर्ण-अक्षरांनींच लिहिली जाईल ! तीन वर्षांपूर्वी ज्याची खोटी प्रेतयात्रा निघाली तो इटलीचा मुख्य प्रधान बनतो !!!

* * *

प्रधानकीचीं वस्त्रें स्वीकारल्यानंतर प्रथम त्यानें रेल्वे-खात्याच्या मुख्याला बोलावून ४०,००० फॅसिस्ट सैनिकांची चोवीस तासांच्या आंत रवानगी करण्यास बजावलें. त्या अधिकाऱ्यानें "साहेब, तें अशक्य आहे", असें म्हणतांक्षणींच मुसोलिनीनें जरा निग्रही स्वरांत त्याला फर्माविलें कीं, "चोवीस तास हे माझे शब्द आहेत; अशक्य ही भाषाच मला माहीत नाहीं, माझ्या हुकुमाची अंमल-बजावणी झालीच पाहिजे." पण दुसऱ्याच क्षणीं आवाज कमी करून मित्राच्या नात्यानें त्यानें त्यास सांगितलें, "हें पहा, काम करावयाचें म्हणून ठरविल्यास तें सहज करतां येतें....."

* * *

मुसोलिनी दारू कधींच पीत नाहीं. त्याचा मुख्य आहार दूध, फळें व अगदीं साध्या फळभाज्या हाच होय. तो मुख्यतः शाकाहारी आहे, म्हटलें तरी चालेल. तसेंच धूम्रपानाचें व्यसन जरी त्याला पूर्वीं होतें तरी त्यापासून हल्लीं तो पूर्ण अलिप्त आहे. त्यानें सोळा वर्षांच्या आंतील मुलांना धूम्रपान करण्याची बंदी केली आहे.

* * *

एकांताची आवड मुसोलिनीला फार आहे. जेवतांना देखील तो एकटाच असतो.

* * *

मुसोलिनीला निरनिराळ्या देशांत मिळून एकंदर अकरा वेळां कारावास घडला. मुसोलिनीच्या चरित्रलेखिका सर्फाटाबाई यांनीं त्याच्या कैदप्रसंगांना 'Educational Primer in Eleven Chapters' असें नांव दिलें आहे.

* * *

१९२५–२६ सालांत मुसोलिनीच्या खुनाचे चार अयशस्वी प्रयत्न झाले! पण कोणत्याहि प्रसंगीं त्यानें मनाची चलबिचल दाखविली नाहीं.

* * *

'To live dangerously' (साहसाचें जीवन) हें त्याचें ब्रीद-वाक्य आहे; आणि त्याप्रमाणें त्याचें वर्तनहि घडलेलें आहे. "मनुष्याचें जीवित अतिशय रमणीय आहे आणि साहसानें तें अधिक रमणीय बनतें" असें त्याचें म्हणणें आहे.

* * *

घरून ऑफिसकडे किंवा ऑफिसमधून घराकडे जातांना तो ज्या मोटारींतून जातो त्या मोटारीच्या मागें व पुढें तशाच रंगाच्या चार चार मोटारी असतात. त्यामुळें मुसोलिनी कोणत्या मोटारींत बसला आहे हें नक्की कोणालाच कळत नाहीं. तसेंच राजवाड्यांतहि जातांना तो कोणत्या मार्गानें जाणार हें त्याच्या ड्रायव्हरशिवाय इतरांना कांहीं समजत नाहीं.

* * *

इटलींत मुसोलिनीनें संख्याबळ वाढविण्याच्या हेतूनें विवाहाची सक्ती करून अविवाहित लोकांवर जबर कर बसविले आहेत. प्रत्येक व्यक्तीनें स्वत:साठीं नसल्यास देशासाठीं तरी लग्न केलेंच पाहिजे आणि देशाचें बळ वाढविण्यासाठीं प्रजोत्पत्तीहि केली पाहिजे. मुसोलिनीनें वाढत्या कुटुंबांना बक्षिसें देण्याची पद्धति सुरू केली आहे.

* * *

नूतन-परिणित अशा जोडप्यांना इटलींत अनेक तऱ्हेच्या सवलती मिळतात. आगगाड्यांतून सवलतींचीं तिकिटें, घरभाड्यांत सूट, नवीन संसार थाटण्यासाठीं संसारोपयोगी सामान, दर मुलामागें पगारवाढ, इत्यादि.

*                    *                    *

मुसोलिनीनें एका व्याख्यानप्रसंगीं प्रसंगवशात् पुढील उद्गार काढले आहेत:—“If I advance, follow me; if I retreat, kill me; if I die, avenge me.” (मी पुढें सरसावलों तर माझ्या मागून या, माघार घेतली कीं ठार करा, व मी मेलों तर तुम्ही सूड उगवा.)

*                    *                    *

शिस्तीकडे मुसोलिनीचा विशेष कटाक्ष असे. पहिल्या प्रतीची करडी शिस्त स्वत:ला लावून घेतली पाहिजे, त्याशिवाय दुसऱ्याला शिस्त लावण्याचा अधिकार आपल्याला पोंचत नाहीं. शिस्तीखेरीज आपल्याला इतर राष्ट्रांत मान मिळणार नाहीं. पण शिस्त म्हणजे ‘होय बा’ वृत्ति नव्हे; तर त्या शिस्तींत कर्तव्याची जाणीव पूर्ण-पणें भासली पाहिजे.

*                    *                    *

‘पोपोलो डी इटालिया’ हें वर्तमानपत्र १९१४ मध्यें मुसो-लिनीनें साहसानें सुरू केलें. याच पत्रद्वारां इटलीला युद्धोन्मुख करण्याचें कार्य मुसोलिनीनें केलें. पुढें हें पत्र त्यानें आपल्या भावाच्या ताब्यांत दिलें. फॅसिस्टांचें मुखपत्र म्हणजे ‘पोपोलो’ च होय.


*                    *                    *

मुसोलिनीनें ' आत्मचरित्र ' लिहिलें आहे. त्यांत त्यानें काढलेल्या पुढील उद्गारांवरून त्याच्या व्यक्तित्वाची व स्वभावाची कल्पना येईल, "....माझ्यांतील अहंपणा मीं मारून टाकला असल्यानें मी इतर सामान्य नागरिकांप्रमाणें इटलीचा नम्र सेवक बनलों आहें.... रक्ताच्या प्रत्येक थेंबांतून इटलीच्या सेवेचे ध्वनि लोकांना ऐकूं जातील इतका मी जनतेचा सेवक बनलों आहें. इटालियन राष्ट्रानें माझ्याकडून सेवा करून घ्यावी....व माझ्यावर प्रेम करावें अशी माझी नम्र इच्छा आहे...."



# ८. जोसेफ स्टॅलिन

[ त्रोटक जीवन-वृत्तान्तः—जोसेफ स्टॅलिनचा जन्म दक्षिण रशियांतील जॉर्जिया प्रांतांतील गोरी नांवाच्या गांवीं सन १८७९ मध्यें झाला. याचे



वडील सामान्य शेतकरी होते. शिवाय अपुऱ्या उत्पन्नांत भर घालण्याकरितां त्यांना मधून मधून चांभाराचाहि धंदा करावा लागे. लहानपणीं स्टॅलिन हा हूड स्वभावाचा होता. आई-वडिलांनीं नाना तऱ्हेनें त्याला समजाविण्याचा प्रयत्न केला, पण त्याचा कांहींएक उपयोग झाला नाहीं. पण तो जेव्हां पाठशाळेच्या धार्मिक वातावरणांत गेला तेव्हांपासून त्याच्या मनोवृत्तींत व वागणुकींत विलक्षण फरक घडून आला. पण रशियांत चालविलेल्या क्रान्तिकारक चळवळीशीं त्याचा संबंध अनपेक्षित रीत्या जडल्यामुळें त्याला पाठशाळेंतून घालवून देण्यांत आलें. तेथून बाहेर पडल्यावर समाजवाद्यांचें वाङ्मय प्रयत्नानें मिळवून त्यानें त्याचा अभ्यास केला. शिवाय 'सोशल डेमोक्रॅटिक पार्टी' चा तो सभासद झाला. पुढें तो बाटुम या गांवीं आपल्या बोल्शेव्हिक पक्षाचें कार्य करण्याकरितां गेला असतां त्याला अटक होऊन हद्दपारीची शिक्षा झाली. स्टॅलिनला एकंदर सहा वेळां जरी शिक्षा भोगावी लागली तरी एकहि शिक्षा त्यानें संपूर्ण भोगली नाहीं. दैव अनुकूल असलें म्हणजे अशक्य वाटणारी गोष्ट शक्य कोटींत उतरते. त्याचा सुटकेचा प्रत्येक प्रयत्न यशस्वी झाला. शेतकरी व कामकरी यांची संघटना करून झारशाहीच्या जुलमी कारभाराला कायमचा आळा घालावा या

हेतूनें त्यानें विविध मार्गांनीं प्रचारकार्य केलें. रशियाचें आजचें सरकारचें मुखपत्र ‘ प्रवदा ’ याचें संपादकत्व आरंभापासून त्याच्याकडेच होतें. केवळ धडाडी, आत्मिक बल व करारी बाणा इ. गुणांच्या जोरावर स्टॅलिननें सर्व सत्ता काबीज केली. स्टॅलिनचा राजकीय मार्गदर्शक लेनिन याचा त्यावर विलक्षण लोभ जडला व पूर्ण विश्वास बसला. १९१४ चें महायुद्ध ही क्रांतिकारकांना अनुकूल संधि वाटून त्यांनीं मोठ्या शिस्तीनें १९१७ मध्यें बंड उभारून तें यशस्वी केलें. पुढें ऑक्टोबरमध्यें लेनिननें बोल्शेविकांची समिति नेमून सर्व सूत्रें आपल्या हातांत घेतलीं. स्टॅलिन, ट्रास्ट्की इ. लोक या समितीचे सभासद होते. लेनिनच्या पश्चात् बोल्शेविक पक्षांतील मतभेद वाढत जाऊन स्टॅलिननें सर्व सत्ता आपल्या हातांत घेऊन ट्राट्स्की व त्याचे अनुयायी यांचा कायमचा बंदोबस्त केला.

गरीब घराण्यांत जन्मलेला स्टॅलिन आज जरी रशियाचा सत्ताधीश आहे तरी त्याची राहणी अगदीं सामान्य माणसाप्रमाणें आहे. ज्या क्रेमलिन विभागांतील झारचे भव्य बादशाही प्रासाद त्यांच्या अलोट संपत्तीची साक्ष देतात त्याच ठिकाणच्या एका साध्या इमारतींत स्टॅलिनचें हल्लीं वास्तव्य आहे. त्याला कौटुंबिक सुख लाभलें नाहीं असें म्हणतात; पण त्याच्या खाजगी जीवनाची खरी माहिती आपल्याकडे फारशी उपलब्धच नाहीं असें म्हटलें तरी चालेल. ]

---

स्टॅलिनचें ‘ स्टॅलिन ’ हें नांव त्यानें धारण केलेल्या नांवांपैकीं एक नांव होय. लहानपणीं त्याचें नांव ‘ सोसो ’ ( Sosso ) असें होतें. हा सोसो मोठा खट्याळ मुलगा म्हणून प्रसिद्ध होता. रस्त्यांतून खाण्याचे पदार्थ विकणाऱ्या लोकांनाहि सोसो व त्याच्या संगतींत असणाऱ्या मुलांपासून सावध राहावें लागे.

* * *

सोसो व इतर मुलांचे खेळ म्हणजे लुटुपुटीच्या लढाया. एकदां तर या छोट्या वीरांनीं खोट्या लढाईंत खऱ्या दारूचा उपयोग

करून गवताच्या गंजीला आग लावली! ही आग सर्व गांवभर पसरली नाहीं हें नशीबच समजावयाचें!

* * *

सोसोच्या आई-वडिलांना आपल्या मुलाबद्दल अतिशय काळजी वाटे व त्याचें पुढें कसें होणार या विचारानें तीं चिंताग्रस्त असत. वडिलांनीं चोप द्यावा, आईनें समजुतीनें चार गोष्टी सांगाव्या, पण सोसोच्या वर्तनांत बिलकुल बदल झाला नाहीं.

* * *

लहानपणीं सोसो हा अंगानें किडकिडीत होता, पण त्याच्या डोळ्यांतील तेज त्याच्या करारी स्वभावाची खात्री पटवीत होतें. हाच करारी स्वभाव त्याला शेवटपर्यंत उपयोगीं पडला.

* * *

सोसोच्या वडिलांनीं त्याला पाठशाळेंत पाठवून धार्मिक शिक्षण देण्याचें ठरविलें; व त्याप्रमाणें टिफ्लिस या गांवीं त्याची रवानगी केली. धार्मिक शिक्षण घेणाऱ्यांचा काळा झगा त्यानें अंगावर चढविल्यावर त्याच्या खोडकर वृत्तींत अचानकपणें बदल घडून आला. पाठशाळेंत असतांना आदर्श विद्यार्थ्यांत जोसेफ विसारिओनोविच् ज्युगाच्विलि (Joseph Vissarionovitch Djougachwili —हें त्याचें संपूर्ण नांव) याची गणना होई.

* * *

पाठशाळेंतील सर्व अध्यापक जोसेफसंबंधीं चांगले उद्गार काढीत, यामुळें त्याच्या आईवडिलांना आपला मुलगा खूप निवळला म्हणून अतिशय धन्यता वाटे, व प्रेमातिशयानें त्यांच्या डोळ्यांतून कित्येक वेळां आनंदाश्रूहि वाहत.

* * *

रस्त्यानें हिंडत असतांना जोसेफला सहज अंजीर विकत घ्यावेसे वाटले व त्यानें खिसा चाचपून पाहिला. आपल्या खिशांत थोडेसे ‘ कोपेक्स् ’ ( रशियन नाणें ) आहेत असें पाहून त्यानें अंजीर विकत घेतले. त्या अंजीरविक्यानें एका छोट्याशा वर्तमान-पत्रांत कांहीं अंजीर व्यवस्थितपणें बांधून दिले. अंजीर खात असतां जोसेफचें लक्ष त्या कागदांतील मजकुराकडे जाऊन तो दचकला. उरलेले अंजीर फेंकून देऊन त्यानें त्या कागदांतील मजकूर मोठ्या हावरेपणानें अनेक वेळां वाचला. त्या कागदांत झारच्या जुलूम-शाहीचा धि:कार केलेला होता !

*　　*　　*

धर्मगुरूंचा गुरु म्हणून मानला जाणारा झार याच्यासंबंधीं अभद्र शब्द लिहिलेले पाहून त्याच्या अपक्व मनाला धक्काच बसला. ताबडतोब आपल्या गुरूला तें पत्रक दाखविण्याकरितां जोसेफ मनांतील खळबळ दाबीत पाठशाळेकडे जाऊं लागला.

*　　*　　*

जोसेफला त्याच्या खोलींत विपरीत प्रकार दृष्टीस पडला. गुप्त-पोलिस अध्यापकांच्या समवेत खोलींत शिरले व झडती संपल्यावर प्राध्यापकांचे पुढील शब्द त्याच्या कानीं पडले : “माझी खात्री होती कीं, जोसेफच्या खोलींत क्रांतिकारकांचें वाङ्मय सांपडणार नाहीं म्हणून....” हे उद्गार ऐकल्यावर जोसेफनें आपल्या खिशांतील तें पत्रक काढून गुरुजींना दाखविण्याऐवजीं त्यानें तें ‘ अग्नये स्वाहा ’ केलें ! त्याच्या मनांतील खळबळ मात्र वाढतच गेली. धार्मिक वातावरणाच्या पाठशाळेंत हा पोलिसांचा प्रवेश प्रथमचाच होता.

*　　*　　*

समाजवाद्यांनीं आपल्या प्रचाराचें जाळें गुप्त रीतीनें विस्तृत पसरलें होतें. खुद्द पाठशाळेंतहि समाजवादी लोकांचें वाङ्मय प्रसृत

झालें होतें. सरळ मनाच्या जोसेफला याची जाणीव कशी असणार? पोलिसांनीं पाठशाळेंतील दोन विद्यार्थ्यांना पकडून नेलें. हा देखावा जोसेफनें प्रत्यक्ष पाहिल्यावर त्याच्या मनावर विलक्षण परिणाम झाला. साम्यवादी वाङ्मय अधिक वाचावयाला मिळण्याबद्दल त्याची उत्कंठा वाढूं लागली.

* * *

रशियांत क्रांति घडवून आणण्याच्या हेतूनें लेनिननें हर तऱ्हेनें कामकरीवर्ग व शेतकरीवर्ग यांच्यांत विलक्षण जागृति उत्पन्न केली. खुद्द फळें विकणारे लोक व रस्त्यांतून इतर खाद्य-पेयें विकणार लोक लेनिनचेच हस्तक असत.

* * *

पाठशाळेंतील तीन-चार वर्षांचें शिक्षण पुरें करून एखादे ठिकाणीं धर्मगुरूचें कार्य करीत उदरनिर्वाह करावा, कीं पाठशाळा सोडून लेनिनचें शिष्यत्व पत्करून आयुष्याला वेगळेंच वळण द्यावें, हा मोठा पेंच अठरा वर्षांच्या जोसेफला पडला; पण याचा निकाल पाठशाळेंतील अध्यापकांनींच लावला. त्यांनीं त्याला त्याच्या राजकीय मतांतराबद्दल घालवून दिलें.

* * *

आई-वडिलांना शोकसागरांत लोटून कफल्लक जोसेफनें सार्वजनिक कार्यास सुरुवात केली. द. रशियांतील लेनिनच्या एका प्रतिनिधीची व समितीच्या इतर सभासदांची गांठ घेऊन त्यानें आपला मनोदय त्यांना कळविला व त्यांच्या अनुमतानें चालण्याचें त्यानें ठरविलें.

* * *

टिफ्लिस शहराच्या मध्यभागीं एक मोठी बाजारपेठ होती. या ठिकाणीं इतका अंधार होता कीं, सूर्यकिरण क्वचितच दुकानापर्यंत

पोहोंचे ! त्यामुळें या बाजारपेठेला ‘ अंधारांतील बाजारपेठ ’ असें लोक संबोधूं लागले. येथील एका दुकानांत स्टॅलिननें नौकरी पत्करिली व वाटेल तीं हलकीं कामें त्यानें या ठिकाणीं केलीं. तेथील कामकऱ्यांच्या गैरसोयी कोणत्या, त्यांची खरी परिस्थिति काय आहे याचें संपूर्ण ज्ञान व्हावें, हा मुख्य हेतु होता. हा हेतु पुष्कळ अंशीं सफल झाल्यावर या नवीन नोकरानें आपल्या धन्यापाशीं सहेतुक जास्त पगाराची मागणी केली. इतर लोकांना याचा मोठा अचंबा वाटला. मालकानें आपल्या उर्मट वृत्तीला अनुसरून स्टॅलिनवर शिव्यांचा भडिमार करून त्याला घालवून दिलें.

* * *

स्टॅलिननें तेथील बाजारांतील वीस हजार कामकऱ्यांचीं मनें संपाला तयार करून संप यशस्वी केला. धाकदपटशा, मारामारी, खून यांचाहि त्यानें जरूरीच्या वेळीं उपयोग केला. स्टॅलिनची ही पहिली मोठी कामगिरी सहकारी मित्रांच्या डोळयांत भरली.

* * *

गुप्त रीतीनें छापलेलीं पत्रकें पोलिसांना सांपडतांच जोसेफला अटक झाली. या वेळीं जोसेफनें आपलें जुनें नांव सोसो हें धारण केलें होतें. सोसोला तीन वर्षांची हद्दपारीची शिक्षा होऊन सैबेरियांत त्याची रवानगी झाली. ही त्याची पहिली शिक्षा (सन १९०२).

* * *

सैबेरियाच्या कोठल्या तरी एका खेडेगांवांत असतांना त्याला लेनिनकडून एक पत्र आलें. या पत्रानें स्टॅलिनला अतिशय आनंद झाला. लेनिननेंहि त्याची योग्यता ओळखून त्याला स्वपक्षांतील अधिकाराची जागा दिली.

* * *

स्टॅलिननें हद्दपारींतून आपली सुटका स्वत: करून घेऊन १९०५ सालीं फिनलंडमध्यें भरणाऱ्या पक्षाच्या वार्षिक सभेस तो हजर राहिला. या ठिकाणीं स्टॅलिन व पक्षाचा पुढारी लेनिन यांची प्रत्यक्ष गांठ पडली. स्टॅलिनची अशी अटकळ होती कीं, पक्षाचा सूत्रधार लेनिन हा सभेची वेळ होऊन गेली म्हणजे मोठ्या मानानें प्रवेश करील व नंतर सर्व अनुयायी उभे राहून त्याचें हार्दिक स्वागत करतील. पण स्टॅलिनचा हा सर्व अंदाज चुकला. लेनिन ठराविक वेळेपूर्वी कितीतरी वेळ आधीं येऊन एका कोपऱ्यांत आपल्या सहकाऱ्यांबरोबर विचारविनिमय करीत होता. हें दृश्य पाहिल्यावर लेनिनविषयीं त्याला अधिकच आदर वाटूं लागला.

* * *

१९०५ च्या क्रान्तिकारक चळवळींत स्टॅलिननें मोठ्या धैर्यानें व शिताफीनें कामगिरी केली. या वेळीं त्यानें 'डेव्हिड' व 'कोबा' अशीं नांवें धारण केलीं होतीं. पुढें १९०८ च्या दंगलींत स्टॅलिन 'निजेराझ्' या नांवानें अटक केला गेला व त्याला पुन्हां तीन वर्षांची हद्दपारी मिळाली. या वेळींहि त्यानें आपली सुटका करून घेऊन, परत तो सेंट पीटर्सबर्ग (रशियाची जुनी राजधानी) येथें दाखल होऊन कार्यास लागला.

* * *

स्टॅलिनला एकदां सहा वर्षांची सजा होऊन तो निर्वासित झाला; पण त्यानें कोणतीच शिक्षा पूर्ण भोगली नाहीं. सुटकेंतून पळून जाण्यास दैवानें त्याला हात दिला यांत शंका नाहीं. पोलिसांच्या हातावर तुरी देणें हा त्याच्या हातचा मळ असे.

* * *

स्टॅलिननें एकंदर सात-आठ खोटीं नांवें धारण केलीं होतीं. रशियांत प्रत्येक क्रांतिकारक मनुष्याला पहिला गुन्हा म्हणून फक्त

तीन वर्षांची हद्दपारी होई. निरनिराळ्या टोपण-नांवांखालीं स्टॅलिनचा प्रत्येक गुन्हा त्या नांवाखालीं नवीनच समजला जाई. ‘ स्टॅलिन ’ हें त्याचें शेवटचें टोपण-नांव. त्याचें मूळचें नांव ‘ ज्युगाचविली’, याचें रशियन रूपांतर ‘स्टॅलिन’ हें होय. ‘ज्यूगा’ ( Djuga ) म्हणजे पोलाद ( Steel ), याला रशियन भाषेंत ‘ स्टॅल ’ असा शब्द आहे, म्हणून स्टॅलिन.

* * *

स्टॅलिन या नांवानें तो वावरत असतां त्याच्या मित्रानें (?) त्याचा विश्वासघात करून त्याची इत्थंभूत माहिती व सर्व टोपण-नांवें ‘ओक्राना’ (Ochrana) म्हणजे गुप्तपोलिसजवळ दिलीं. इतकी सर्व माहिती पोलिसला मिळाल्यामुळें स्टॅलिन अगदीं थंडावला. स्टॅलिन या नांवाखालीं त्याला जबर शिक्षा म्हणजे आर्क्टिक महासागरापासून फक्त पंधराच मैल दक्षिणेस असलेल्या एका ओसाड खेडेगांवांत त्याची (जवळजवळ कायमची) रवानगी झाली! येथून परत येऊं असें त्याचें मनदेखील त्याला सांगेना. पण विधिघटना वेगळीच होती!

* * *

१९१२ मध्यें प्राग येथील कॉंग्रेसला स्टॅलिन हजर राहिला. त्या वेळीं त्याच्यावर ‘प्रवदा’ हें पक्षाचें मुखपत्र संपादित करण्याची जबाबदारी टाकण्यांत आली. यामुळें तो मोठ्या उत्साहानें परत रशियाला आला. इतर अज्ञातवासियांप्रमाणें त्याला रशियाबाहेर काळ काढतां आला असता, पण त्याचें मन त्याला स्वस्थ बसूं देईना. प्रवदा हें हल्लीं सोव्हिएट रशियाचें सरकारी मुखपत्र आहे.

* * *

लेनिनच्या विचारानुसार ‘ डयूमा ’च्या ( रशियन पार्लमेंट ) निवडणुकी लढविण्याचें स्टॅलिननें ठरविलें. पहिल्याच प्रथम त्यांनीं

सोळा जागा जिंकल्या. लेनिननें स्टॅलिनला पार्लमेंटमधील पक्षाचा प्रमुख नेमलें. स्टॅलिन पार्लमेंटाचा सभासद असल्यामुळें पोलिसलाहि ' ड्यूमा 'च्या संमतीशिवाय घराची झडती घेतां येईना.

* *

मॅलिनौस्की या सरकारी गुप्तहेरानें लेनिनचें अनुयायित्व पत्करलें होतें. याचा बहाणा बरोबर जमल्यामुळें ड्यूमाच्या निवडणुकींत तो यशस्वी झाला, आणि स्टॅलिनचा जिवलग मित्र म्हणून त्याचे-चजवळ राहिला. स्टॅलिन त्याच्याशीं अगदीं मनमोकळेपणानें बोले. पण या विश्वासघातक्यानें पोलिसजवळ त्याची सर्व माहिती दिली. बाकी विश्वासघातकी कसला? बोलूनचालून सरकारी नोकर ! या पात्रानें आपलें सोंग उत्तम बजाविलें एवढें मात्र खरें. यामुळेंच स्टॅलिनला अतिशय कडक शिक्षा झाली.

* * *

१९१४च्या महायुद्धानें स्टॅलिनला सुटकेचा अंधुक किरण दाखविला, आणि याच आशेवर तो जिवंत होता. या महायुद्धांत रशियन सरकार गुंतलेलें आहे ही संधि साधून १९१७ मध्यें मार्च महिन्यांत क्रांतिकारकांनीं यशस्वी बंड केलें. झारनें (रशियाचा बादशहा) राजपद सोडलें. सर्व कारभार क्रान्तिकारकांनीं नेमलेल्या मंत्रिमंडळाच्या हातांत आला.

* * *

१९०५ च्या अयशस्वी बंडानंतर स्वित्झर्लंडमध्यें वास्तव्य करून सर्व सूत्रें हालविणारा लेनिन बारा वर्षांनीं पुन्हां आपल्या मायभूमीला परत आला. जर्मन सरकारनें याला सुरक्षितपणें पोहोंचविण्याची जबाबदारी सहेतुक पत्करली होती. तो ज्या आगगाडीनें आला त्या बंदिस्त गाडीला ' Lenin's sealed coach ' असें

म्हणत, आणि या गाडींतून जाणाऱ्या जिवंत वस्तूला 'Living Ammunition' अशी संज्ञा दिली होती.

* * *

१९१७ च्या ऑक्टोबरमध्यें लेनिननें 'सोव्हिएट' रशिया म्हणजे 'कामकऱ्यांचा' रशिया बनविला, व त्यानें सर्व सत्ता त्यानें नेमलेल्या एका समितीकडे दिली. समितीचे सभासद:—लेनिन, ट्राट्स्की, स्टॅलिन, झिनोव्हिफ् इ. समाजवादांतील तत्त्वें नुसतीं पुस्तकांत न राहतां प्रत्यक्ष आचरणांत येऊं लागलीं, पण या सर्व गोष्टी परिणामीं कशा ठरतील हें आज निश्चित सांगतां येणार नाहीं.

* * *

लेनिनचे डावे व उजवे हात जे ट्राट्स्की व स्टॅलिन यांच्यांतील मतभेद इतके विकोपास गेले कीं, स्टॅलिननें ट्राट्स्कीला कायमचें हद्दपार केलें; शिवाय त्याच्या बरोबरीनें काम करणाऱ्या अनेक सहकाऱ्यांना त्यानें किरकोळ मतभेदाबद्दल देहान्त प्रायश्चित्त दिलें!

* * *

क्रेमलिन विभागांत रशियाचा झार राहत असे. स्टॅलिनहि तेथेंच राहतो. पण त्याची राहणी अगदीं साधी असल्यानें जेथें झारच्या नोकरवर्गाचें वास्तव्य असे त्याच इमारतींत यु. एस्. एस्. आर. ( Union of Soviet Socialist Republics ) चा सर्वाधिकारी राहतो!

समाप्त

REFBK-0005968

पृष्ठें १०३ ] [ किंमत ८ आणे

मुंबई इलाखा, मध्यप्रांत आणि वऱ्हाड, बडोदा, निजाम-
हैद्राबाद यांच्या सरकारी विद्याखात्यांनीं मंजूर केलेलें

# मोठ्या लोकांच्या छोट्या गोष्टी

लेखक—**शं. भा. गोंधळेकर**, एम्.ए., बी.टी.

प्रस्तावनालेखक—प्रिन्सिपॉल डॉ. **ग. स. महाजनी**

या पुस्तकांत भांडारकर, रानडे, तेलंग, चिपळूणकर,
आगरकर, लो. टिळक, ना. गोखले, कर्वे, केळकर,
रँ. परांजपे यांचा त्रोटक जीवन-क्रम देऊन त्यांच्या
थोर चारित्र्यावर प्रकाश पाडणाऱ्या अनेक
मनोरंजक व उद्‌बोधक गोष्टी दिल्या आहेत.
मुलांना अशा गोष्टी फारच आवडतात.